CMYK

सोलापूर

# तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | शनिवार, १३ डिसेंबर २०२५ । वर्ष ३ रे अंक २८३ । पाने १२ । किंमत रु. ६/- | ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com



# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानातून गावांच्या समृद्धीची दिशा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**नागपूर, दि. १२ डिसेंबर-**

राज्यात मागील काही दिवसात झालेल्या पूर परिस्थितीमुळे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या अंमलबजावणीत अडथळा निर्माण झाला होता. मात्र आता नव्याने अभियानाला सुरुवात करण्यात आली असून या अभियानाच्या अंमलबजावणीतून गावांच्या समृद्धीची दिशा मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीसांनी व्यक्त केला.

विधान भवन येथील मंत्रिपरिषद सभागृहात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान शीर्षक गीत लोकार्पण कार्यक्रम पार पडला. यावेळी दूरदृश्य प्रणालीद्वारे या कार्यक्रमात सहभागी झालेल्या सरपंच, ग्रामविकास अधिकारी, गटविकास अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मार्गदर्शन केले. यावेळी ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे उपस्थित होते.




मुख्यमंत्री म्हणाले, मागील दहा वर्षात राज्यामध्ये कुठल्याही अभियानाची यशस्वीता बघितली, तर त्यामध्ये लोकसहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे निदर्शनास येते. कुठलेही अभियान लोकसहभागाशिवाय यशस्वी होत नाही. जलयुक्त शिवार अभियान हे त्याचे मूर्तीमंत उदाहरण आहे. जलयुक्त शिवार अभियानामुळे जलसाक्षरता वाढून राज्य जलसंपन्न होण्यास मदत झाली. जलयुक्त शिवार अभियानाच्या अंमलबजावणीतून महाराष्ट्र रोल मॉडेल म्हणून देशात पुढे आले. यासोबतच नरेगा ११ कलमी कार्यक्रम, मागेल त्याला शेततळे अभियान यशस्वीपणे राबविण्यात आले. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबविण्यात येत आहे. लोकसहभागातून हे अभियान यशस्वी करावे. ग्रामपंचायत डिजिटल, स्वयं अर्थपूर्ण असाव्यात, तसेच गावांचा पर्यावरणपूरक विकास करण्यात यावा, यासाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान महत्त्वाचे ठरणार आहे. ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी अभियानाची पार्श्वभूमी सांगितली. ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाला अभिनेते भारत गणेशपुरे, संदीप पाठक, पृथ्वीक प्रताप, अभिनेत्री शिवाली परब, विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

### मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान

ग्रामीण भागात स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून काम करणाऱ्या ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद यांच्या स्तरावर केंद्र, राज्य शासनाच्या सर्व योजना अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी स्पर्धा व्हावी, या स्पर्धेत सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या पंचायतराज संस्थांना प्रोत्साहन देऊन त्यांची कार्यक्षमता वाढावी, यासाठी तालुका, जिल्हा, महसूल विभाग व राज्य अशा चार स्तरांवर स्पर्धात्मक स्वरुपात सन २०२५-२६ या वर्षापासून मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान'' राबविण्यात येत आहे.

### कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांवर

# आ. समाधान आवताडे यांनी सभागृहात मांडली भूमिका

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१२ डिसेंबर -**



राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत आरोग्य विभागातील कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांवर आ. समाधान आवताडे यांनी सभागृहात कर्मचारी हिताची भूमिका मांडून संबंधित कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांना वाचा फोडली आहे. नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनादरम्यान आ. आवताडे यांनी प्रश्नउत्तराच्या तासाला काही मागण्या केल्या आहेत. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत आरोग्य विभागातील कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत समाविष्ट करण्यासंबंधी शासन निर्णयाच्या अंमलबजावणीत होत असलेला विलंब, तसेच प्रलंबित वेतन, थकित पगार आणि इतर मान्य मागण्यांवरील कार्यवाही संदर्भात महत्त्वपूर्ण प्रश्न उपस्थित त्यांनी करून सभागृहाचे लक्ष वेधले आहे.

आमदार समाधान आवताडे यांनी सभागृहात मांडलेले मुद्दे -१० वर्षे सेवा पूर्ण असलेल्या छकच (छरींळेपरश्र कशरश्रींह चळीीळेप) कर्मचाऱ्यांना नियमित करण्याबाबत ४ नोव्हेंबर २०२५ रोजी घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी प्रत्यक्षात सुरू झाली आहे का? विलंबाचे कारण काय?, सणासुदीच्या काळातही पगार न मिळाल्यामुळे कंत्राटी कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली. जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई होणार का?, विमा संरक्षण, भविष्य निर्वाह निधी, लॉयल्टी बोनस आदी लाभांची अंमलबजावणी कोणत्या कालावधीत होणार? कर्मचारी अजूनही वंचित का?, न मान्य झालेल्या मागण्यांवर नेमलेल्या समितीची काय प्रगती आहे? त्यावर निर्णयासाठी शासनाने कोणती कालमर्यादा निश्चित केली आहे? अशा विविध मागण्यां संदर्भात त्यांनी म्हणणे मांडले.

> आरोग्यमंत्री मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिलेले उत्तर अतिशय समर्पक आणि संबंधित कर्मचाऱ्यांच्या आशा पल्लवीत करणारे असून यावर संबंधित खात्याने तसेच शासकीय आरोग्य व्यवस्थेने योग्य त्या दिशेने या कर्मचाऱ्यांचा विचार करून त्यांच्या पदरात अपेक्षित फळ देण्यासाठी राज्य सरकार राज्याचे मुख्यमंत्री तसेच दोन्ही उपमुख्यमंत्री व आरोग्य मंत्री हे वचनबद्ध असल्याचे आजच्या या प्रतिसादावरून स्पष्ट झाले.
>
> **- आ.आवताडे**

विधानसभा सभागृहात आमदार समाधान आवताडे यांनी उपस्थित केलेल्या या मागण्यांवर उत्तरो दखल शासनाची भूमिका व्यक्त करताना राज्याचे आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री ना.प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले की, या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत शासन पूर्णपणे संवेदनशील असून त्यांनी आरोग्य खात्यात आतापर्यंत केलेल्या समर्पक भावनेच्या सेवेचा शासनाला कोणत्याही प्रकारे विसर पडला नसून त्यांच्या सर्व मागण्यांवर संपूर्ण सरकार हे सकारात्मक असून अतिशय महत्त्वपूर्ण असणाऱ्या या प्रश्नांवर तसेच मागण्यांवर शासन योग्य आणि आवश्यक ती पावले उचलून या सर्व कर्मचाऱ्यांना अपेक्षित न्याय देईल असे सांगितले आहे.

# सोलापूरच्या पाणीपुरवठ्यासाठी आ. देवेंद्र कोठे विधानसभेत आक्रमक

- ✔ **ग्रामदैवत सिद्धरामेश्वर मंदिर सुशोभीकरणाची मागणी**
- ✔ **अतिरिक्त १० कोटी निधीची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

शहर मध्य विधानसभा मतदारसंघाचे आमदार देवेंद्र कोठे बुधवारी सोलापूरच्या पाणीपुरवठ्याबाबत विधानसभेत चांगलेच आक्रमक झाले. सोलापूर शहराला दररोज पाणीपुरवठा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने तत्वतः मंजुरी दिलेल्या ८९२ कोटी रुपयांच्या कामाची निविदा लवकरात लवकर काढण्याबाबत आमदार देवेंद्र कोठे यांनी शासनाकडे आग्रह धरला.

ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर मंदिराच्या ईशान्य प्रवेशद्वारा समोरील अतिक्रमण काढून हा परिसर सुशोभित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने १० कोटी रुपयांचा निधी देण्याची मागणीही आमदार कोठे यांनी यावेळी केली. यावेळी आमदार कोठे म्हणाले, समांतर जलवाहिनी पूर्ण होण्यासाठी मागील हिवाळी अधिवेशनात मागणी केल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्काळ ८९ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला. परंतु सोलापूर शहराला दररोज पाणीपुरवठा करण्यासाठी पाईपलाईन, पाण्याच्या टाक्या, अंतर्गत पाणीपुरवठा व्यवस्था यासाठी ८९२ कोटी रुपयांची आवश्यकता होती. या मागणीला देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंजुरी दिली आहे. ७ मार्च रोजी झालेल्या बजेट अधिवेशनाच्या काळात याबाबत बैठक आयोजित करून हा प्रस्ताव सादर करण्यात आला. त्याला तांत्रिक मान्यता देखील मिळाली. परंतु हा हे काम कोणत्या हेडमधून काम मंजूर करावे याबाबत वित्त सचिव आणि अन्य सचिवांमध्ये मतमतांतरे होती. परंतु मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूर शहर हे महत्त्वाचे शहर असून ही पाणीपुरवठा योजना कोणत्याही परिस्थितीत करायची आहे असे निर्देश अधिकाऱ्यांना दिले. पालकमंत्री जयकुमार गोरे देखील याबाबत सातत्याने पाठपुरावा करत आहेत. याकामाची निविदा आगामी आठ दिवसात काढण्याचे आश्वासन मुख्य सचिवांनी दिलेले आहे. मात्र प्रथम आणि दुसऱ्या टप्प्यातील



निधीची तरतूद लवकरात लवकर व्हावी, जेणेकरून सोलापूर शहराला दररोज पाणीपुरवठा करण्यासाठीच्या व्यवस्थेचे काम वेळेत पूर्ण होईल, असेही आमदार देवेंद्र कोठे याप्रसंगी म्हणाले. त्याचबरोबर ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर महाराजांनी १२ व्या शतकात लोकसहभागातून बांधलेला तलाव आणि कालांतराने तेथे बांधण्यात आलेले मंदिर हे अमृतसर येथील सुवर्ण मंदिराप्रमाणे आहे. या मंदिराच्या ईशान्य प्रवेशद्वाराला असलेल्या लक्ष्मी मार्केट परिसरातील अतिक्रमण काढून हे प्रवेशद्वार आणि हा परिसर सुशोभीकरण करण्यासाठी १० कोटी रुपयांचा निधी महाराष्ट्र शासनाने द्यावा. सोलापूरला लागून असलेल्या अक्कलकोट, तुळजापूर, पंढरपूर अशा मंदिरांना महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणावर भाविक येतात.

# राजकीय सुसंस्कृततेचा लौकिक जपणाऱ्या उत्तुंग नेतृत्वाला मुकलो

**नागपूर :** महाराष्ट्राच्या राजकीय क्षेत्राच्या शालीनता, सुसंस्कृततेचा लौकिक जपणारे आणि तो राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय पोहचविणारे नेतृत्व म्हणून ज्येष्ठ नेते शिवराज पाटील- चाकूरकर सदैव स्मरणात राहतील, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माजी लोकसभा अध्यक्ष, केंद्रीय मंत्री शिवराज पाटील - चाकूरकर यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. त्यांच्या निधनामुळे राजकारण- समाजकारणातील उत्तुंग अशा मार्गदर्शक नेतृत्वाला मुकलो आहोत, अशी भावना व्यक्त करून शोकसंदेशात मुख्यमंत्री म्हणतात, चाकूरकर यांनी लातूरचे नगराध्यक्ष म्हणून



राजकारणात पाऊल टाकले. महाराष्ट्राच्या विधानसभेचे उपाध्यक्ष, अध्यक्ष, संसदेच्या अनेकविध समित्यांचे सदस्य,आणि पुढे केंद्रातील विविध खात्यांचे मंत्री आणि लोकसभा अध्यक्ष, पंजाबचे राज्यपाल अशी त्यांची कारकिर्द राहीली. लोकसभा सदस्य म्हणून ते सातवेळा निवडून आले होते. लोकसभा अध्यक्ष म्हणून त्यांनी संसदेशी निगडित अनेक अभिनव उपक्रमांना आवर्जून चालना दिली. चाकूरकर यांच्या निधनामुळे राजकारण- समाजाकारणात सभ्यता, सुसंस्कृतता जपणारे, लोकशाहीवर गाढा विश्वास असणाऱ्या ज्येष्ठ नेतृत्वाला महाराष्ट्र सुपुत्राला आपण मुकलो आहोत.

# पुराची व्यथा मांडताना आ. अभिजीत पाटील गहिवरले

### सरकारने पूरग्रस्तांना विशेष पॅकेज देण्याची आ. पाटलांनी केली अधिवेशनात मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१२ डिसेंबर -**

माढा तालुक्यात मागील काही दिवसांपूर्वी झालेल्या अवकाळी पावसामुळे आणि भीषण पुर परिस्थितीमुळे अभूतपूर्व संकट ओढवले होते. सीना नदीला जवळपास ९०० क्युसेस पाण्याची क्षमता असताना एका रात्रीत तब्बल २लाख १२ हजार क्युसेस पाणी नदीपात्रात आले. यामुळे माढा तालुक्यातील १७ गावे पूर्णतः जलमय झाली. अनेकांच्या घरांवर २० ते २५ फूट पाणी आले मोठ्या प्रमाणात जनजीवन विस्कळीत झाले.



याच दरम्यान माढा तालुक्याचे विद्यमान आमदार अभिजीत पाटील यांच्या विनंतीवरून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सीना नदीच्या पुराची पाहणी केली. अतिशय भयान परिस्थितीमध्ये माढा तालुक्यातील नागरिकांनी या संकटाचा सामना केला.

> मी आमदार म्हणून गेल्या दहा दिवसांपासून सतत नागरिकांच्या सोबत राहून मदतीचा हात दिला परंतू मायबाप सरकारकडून मदतीची अपेक्षा आहे. ती लवकर करावी यासाठी मी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा करत राहणार आहे.
>
> **- आ. अभिजीत पाटील**

माढा तालुक्यावर १०० वर्षांत न आलेला असा महापूर ओढावला आहे. या संकटातून नागरिकांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. शासनाने जाहीर केलेले पॅकेज अपुरे असून, माढा तालुक्यास सोलापूर जिल्ह्याला स्वतंत्र विशेष पॅकेज देणे अत्यावश्यक आहे. नागपूर हिवाळी अधिवेशनामध्ये माढा तालुक्याचे विद्यमान आमदार अभिजीत पाटील यांनी पोटतिडकीने माढा मतदारसंघातील नागरिकांच्या अडीअडचणी आणि महापुरामध्ये विस्कटलेला संसार उभा राहण्यासाठी आमदार अभिजीत पाटील यांनी मायबाप सरकारकडे पोटतिडिकीने विशेष पॅकेजची मागणी केली.

# चाकूरकरांविषयी पवारांनी व्यक्त केल्या शोकसंवेदना

**नागपूर :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, लोकसभेचे माजी अध्यक्ष, देशाचे माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निधनाने देशाच्या राजकारणातील एक सभ्य,सुसंस्कृत आणि अभ्यासू व्यक्तिमत्व आपण गमावले आहे, अशी शोकसंवेदना उपमुख्यमंत्री अजित पवारांनी व्यक्त केली. शिवराज पाटील चाकूरकर यांनी लोकसेवेचा नवा आदर्श निर्माण केला होता. साधेपणा आणि नैतिक मूल्यांचे ते प्रतीक होते. आपल्या प्रदीर्घ राजकीय कारकिर्दीत लोकसभा अध्यक्ष, केंद्रीय मंत्री, महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, पंजाबचे राज्यपाल अशी विविध पदे भूषवत असताना त्यांनी राजकारणातील नैतिकता जपली.

# अक्कलकोटमधील केबल कनेक्शन घेतलेल्या शेतकऱ्यांचे १२ वर्षांपासून हाल

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १२ डिसेंबर-**

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यात महावितरण आपल्या दारी, योजनेतर्गत केबल कनेक्शन घेतलेल्या शेतकऱ्यांना मूलभूत सुविधा न पुरविल्याने रोहित्रे जळणे, बील वाढवून येत आहेत, तसेच मनुष्यहानी व पशुहानी होत आहे, गेल्या १२ वर्षांपासून अशा अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, अशी व्यथा आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी सभागृहासमोर मांडली.



ते म्हणाले, अक्कलकोट तालुक्यात ऊर्जा विभागाकडून होत असलेली दुटप्पी भूमिकेमुळे शेतकऱ्यांचे होत असलेले हाल विषद केले. २०१० ते १५ या कालावधीत महावितरण आपल्या दारी, ही योजना आणून सगळ्यांना केबलद्वारे कनेक्शन द्यायचे काम तत्कालीन शासनाने घेतला. मात्र त्यांना अद्याप इन्फ्रास्ट्रक्चर पुरविण्यात आलेले नाही. केवळ शेतकरी फक्त केबल वर आपले वीज कनेक्शन चालू होतात, त्यामुळे केबल चोरी होते. रोहित्रे जळतात, कमी वोल्टजे वीज मिळत असल्याने पिकाच्या नुकसानासह अनेक अडचणी उदभवित आहेत. मनुष्यहानी, पशुहानीचा धोका असून त्याकडे अद्याप दुर्लक्ष आहे. त्याउलट त्यानंतर लागू केलेल्या योजनेतील लाभार्थांना सगळ्या सोयी पुरवलेल्या आहेत, त्यामुळे केबल कनेक्शन घेतलेल्या शेतकऱ्यांना निधी उपलब्ध करून द्यावा. नवीन सौर कृषि पंप योजना खूप चांगली आहे.मात्र त्यातील त्रुटी दूर करण्याची गरज आहे. पाच, साडेपाच एचपी असलेल्याना बोअरची खोली जास्त असल्याने कमी पॉवर मिळते.

> **आ. सचिन कल्यानशेट्टींनी सभागृहात मांडल्या व्यथा**

नदीकिनारी पाईपलाईन असलेली संख्या खूप मोठी आहे. ती जागा दुसऱ्याची असल्याने त्याठिकाणी सोलर पॅनेल बसवू शकत नाही. कारण लांबी जास्त असल्यामुळे कॅपॅसिटी मोटर्स जास्त लागत असतात, त्यामुळे या अपवादात्मक बाबींचे निरकरण करून शेतकऱ्यांना नियमित वीज पुरवठा करण्याठी योग्य योजना राबवावी. अक्कलकोट तालुका मोठा असून १३१ महसुली गाव आहेत, याठिकाणी महावितरणची ९ शाखा आणि १६ उपकार्यालये,मात्र ग्राहक संख्या वाढत असल्याने नवीन उपकेंद्र सुरु करावीत,तसेच सौर पंपाबाबत महाराष्ट्र नियोजन आयोगाकडे नवीन धोरण मांडण्यात त्यामध्ये दिवसा वापर केलेल्या वीजचे शुल्क लागणार नाही, मात्र संध्याकाळी वापर केल्यास बील आकरण्याची प्रस्ताव मांडली आहे, ते शेतकऱ्यांवर अन्यायकारक असून ते ग्राह्य धरले जाऊ नये, तसेच महावितरण कंपनीकडून आउटसोर्सिंग करून पदे भरलेल्या कर्मचाऱ्यांची पिळवणूक केली जात आहे. त्यांना नियुक्तीसाठी पैसे घेतले जातात, नोकरीवरून काढून टाकण्याची धमकी देऊन त्यांच्या पगारातून कपात केली असल्याने याबाबत चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली.

# मुंबईसह व प्रमुख महानगरपालिका निवडणुका महायुती म्हणूनच लढणार : भाजपा प्रदेशाध्यक्ष

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १२ डिसेंबर-**

मुंबईसह राज्यातील प्रमुख महापालिकेच्या निवडणुका आम्ही महायुती म्हणूनच लढणार आहोत. त्याबाबत दोन्ही पक्षाशी सकारात्मक वाटाघाटी सुरु आहेत,जागावाटप हे लोकहित आणि स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन ठरविण्यात येणार आहे, अशी माहिती भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी शुक्रवारी दिली.

आगामी निवडणुकांच्या पाश्वभूमीवर महायुतीच्या वरिष्ठ नेत्यांमध्ये झालेल्या चर्चेनुसार गुरुवारी रात्री त्यांची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या देवगिरी निवासस्थानी बैठक झाली. त्याबाबत आज पत्रकारांशी बोलताना प्रदेशाध्यक्ष चव्हाण ते म्हणाले की , आगामी महापालिका व जिल्हा परिषद निवडणूकासंदर्भात कशा प्रकारे पुढे जायचे याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे व आपण स्वत: अशी आमची संयुक्त बैठक झाली. तसेच, भाजपाच्या कोअर कमिटीची ही बैठक झाली. महानगरपालिका निवडणूका जानेवारीमध्ये होण्याची शक्यता आहे. परंतू, जिल्हा परिषद निवडणूका मधील आरक्षणाचा प्रश्न उच्च न्यायालयात प्रलंबित असल्यामुळे या निवडणूका कदाचित लाबंणीवर जाण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. या अनुषंगाने फडणवीस यांनी संस्थांच्या निवडणूका महायुती मध्ये लढताना आगामी रणनिती आखण्याच्या दृष्टीने




काही पध्दती विकसित करण्याची गरज व्यक्त केली होती. मुंबई व अन्य महानगरपालिकेच्या निवडणूकांमध्ये महायुती व्हायला हवी अशा अपेक्षा बैठकीमध्ये सर्वांनी व्यक्त केली. त्यानुसार सर्व महानगरपालिका निवडणूकांमध्ये पक्षस्तरावर समित्या तयार करुन युतीचा फॉर्म्युला ठरविण्याचे ठरले आहे, असे सांगून ते म्हणाले, महापालिका निवडणूकांमध्ये प्रमुख पदाधिकाऱ्यांची कमिटी तयार करुन पुढील नियोजन करण्याच्या दृष्टीने चर्चा केली जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या नेतृत्वात सरकारमध्ये जनतेचे हिताला प्रथम प्राधान्य देणे गरजेचे आहे. तसेच, लोकहिताच्या व विकासाच्या योजना जनतेपर्यंत सकारात्मकरित्या पोहोचविणे हे महत्वाचे आहे. त्यामुळे बहुतेक ठिकाणी महायुतीमध्येच निवडणूका लढविल्या जातील, असे सांगताना रविंद्र चव्हाण यांनी सांगितले की, कालच्या बैठकीमध्येही मुंबई व अन्य महानगरपालिका निवडणूका या युती म्हणून लढल्या पाहिजे असा सकारात्मक विचार करण्यात आला. महायुतीबाबत आणि पुढील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संदर्भातील सर्व निर्णय हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह महायुतीमधील वरिष्ठ नेते वेळोवेळी निर्णय घेतील त्याचप्रमाणे महानगरपालिका निवडणूकांमधील जागावाटप हे लोकहित आणि स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन ठरविण्यात येईल, असेही चव्हाण यांनी स्पष्ट केले. महायुतीमध्ये भाजपा आणि शिवसेना यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय आणि अन्य घटकपक्षांचाही समावेश असल्याचे त्यांनी य सांगितले.

### मुंबईत नवाब मलिकांच्या नेतृत्वाला विरोध

राष्ट्रवादी अजित पवार गटाने मुंबई महापालिकेच्या निवडणुकासाठी पक्षाचे जेष्ठ नेते व माजी मंत्री नवाब मलिक यांच्याकडे जबाबदारी सोपविली आहे. त्याला भाजपाचा विरोध आहे. त्यामुळे जर मलिक यांच्याकडेच पक्षाने नेतृत्व दिल्यास राष्ट्रवादीला महायुतीत घेण्यास विरोध केला जाईल, असे चव्हाण यांनी स्पष्ट केले.

# महापालिका निवडणूक : युतीबाबत भाजपा प्रदेशाध्यक्ष चव्हाण व शिंदे यांच्यात बैठक

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १२ डिसेंबर-**

आगामी मुंबईसह राज्यातील प्रमुख शहरातील महापालिका निवडणुकीसंदर्भात शिवसेनेचे मुख्य नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्यात गुरुवारी रात्री बैठक झाली. नागपूरमधील हिवाळी अधिवेशन रविवारी संपल्यानंतर १५ डिसेंबरला राज्य निवडणूक आयोग राज्यातील महापालिकांच्या निवडणुकीचा कार्यक्रम घोषित करण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला असून भाजपा व शिवसेना यांनी मुंबई, ठाण्यासह राज्यातील काही महानगरपालिका निवडणुकीमध्ये एकत्र लढण्याबाबत सहमती दर्शविण्यात आली.

मुंबईत शिंदे व ठाण्यात भाजपा निम्या जादा लढण्यासाठी आग्रही आहे.त्यामुळे जागा वाटपाचा फॉर्मुला निश्चित करण्यासाठी अधिवेशन संपल्यानंतर बैठक घेऊन सविस्तर चर्चा करण्यात येणार असल्याचे सूत्रकदम सांगण्यात आले. राज्यातील महापालिका व जिल्हा परिषदेच्या निवडणुकांमध्ये भाजपाला नंबर वन बनावयाचे आहे, त्यामुळे जास्तीजास्त जागा निवडून आणण्यासाठी ग्राउंड लेव्हल वरून पूर्ण तयारी करण्यात येत आहे त्याबाबतचा सविस्तर अहवाल बनवून प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना अहवाल सादर केला होता त्यामध्ये प्रामुख्याने मुंबई, ठाणे, नवी मुंबई, मध्ये भाजपा



जास्त जागा लढवण्यावर भर देण्यात आला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिलेल्या सूचनेनुसार चव्हाण यांनी आज रात्री उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबरोबर प्राथमिक चर्चा केली.महायुती म्हणून निवडणुकाना सामोरे जाण्याबाबत त्याच्यात एकमत झाले. मात्र जागा वाटपाचा फार्मुला निश्चित करण्यासाठी पुन्हा एकत्र बसून चर्चा केली जाणार आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित



## विचारपुष्प



आपल्या विवेकानंद केंद्राच्या प्रशिक्षण अभ्यासक्रमातील मानववंशशास्त्रापासून समाजशास्त्र वा इतिहासापर्यंत आणि सामाजिक विकासापासून गीता उपनिषदापर्यंत विविध विषयांत आपण प्रावीण्य मिळविणे महत्त्वाचे असले तरी शारीरिक संस्कार आणि योग यांच्या माध्यमातून आपल्या विचारांनी संपूर्ण देश प्रभावित करून आवश्यक असलेली तरुण कार्यकर्त्यांची फौज आणि एक संघटनात्मक यंत्रणा आपल्याला देशभर उभी करावयाची आहे, याचा कोणीही विसर पडू देऊ नये.

**- एकनाथ रानडे**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह संस्थापक विवेकानंद शिला स्मारक व विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी

# भारत एक देश, एक राष्ट्र म्हणून जगला पाहिजे

## सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे प्रतिपादन

**अंदमान, १२ डिसेंबर**

स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे चरित्र परिपूर्णतेने भरलेले आहे. त्यांच्याकडे सर्व काही, प्रत्येक प्रकारची प्रतिभा होती. त्यांचे वर्णन करण्यासाठी अनेक विशेषणे लागतात. सावरकर यांच्या प्रत्येक कविता त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक अद्वितीय पैलू प्रकट करतात. त्यांचे व्यक्तिमत्त्व सर्व गोष्टींनी परिपूर्ण आहे. ते जन्मजात प्रतिभाशाली होते, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी शुक्रवारी येथे केले.

सावरकर प्रतिभावान होते. गायन, लेखन, नाटक, कविता सर्व काही त्यांच्याकडे होते आणि हे सर्व देशासाठी होते. सावरकर हे त्यांच्या देशभक्तीसाठी लक्षात राहतात. येथे 'तुमच्या तुकड्या'ची भाषा असू नये. संपूर्ण भारत एक देश, एक राष्ट्र म्हणून जगला पाहिजे. छोट्या छोट्या गोष्टींवरून फूट आणि संघर्ष होऊ नये. त्यांनी भाषेच्या परिपूर्णतेसाठी काम केले, असे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी सांगितले. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेचे अनावरण आणि 'सागरा प्राण तळमळला' या सांस्कृतिक कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह उपस्थित होते.

सावरकर यांनी ज्या गोष्टींवर काम केले, ते आपल्या जीवनात प्रत्यक्षात आणण्यासाठी आपल्याला प्रयत्न करावे लागतील. सावरकर यांनी राष्ट्राचे स्पष्ट दर्शन दिले. त्यांनी त्याला हिंदू राष्ट्र म्हटले. त्यांनी हे देखील स्पष्ट केले आहे की, 'भारताची भूमी ही सागरासारखी आहे. पूर्वजांची भूमी हिंदूंच्या पवित्र भूमीसारखी आहे,' असे विचारही सरसंघचालकांनी मांडले.

सावरकरांना गुलामगिरीत आणि स्वातंत्र्यादरम्यान दोन्ही त्रास सहन करावा लागला, परंतु त्यांनी कधीही देशाला दोष दिला नाही. दुर्लक्षित असूनही त्यांनी आपले जीवन देशासाठी समर्पित केले. १८५७ ते १९४७ पर्यंत देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करणारे, आपले प्राण अर्पण करणारे सर्व स्वातंत्र्य सैनिक एका आकाशगंगेसारखे आहेत. त्या आकाशगंगेतील सर्वांत तेजस्वी तारा म्हणजे वीर सावरकर होय, असे डॉ. मोहनजी भागवत यांनी नमूद केले. (वृत्तसंस्था)



रा. स्व. संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांच्या हस्ते स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेचे शुक्रवारी अंदमान येथे अनावरण झाले. यावेळी उपस्थित केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि मान्यवर

### सावरकरांनी कठीण दिवस येथे घालविले : अमित शाह

स्वातंत्र्यापूर्वी ज्यांना अंदमानात आणले जायचे, ते स्वतःहून परत येत नसत. त्यांचे कुटुंब त्यांना विसरत असत. त्या काळात कोणीही काळ्या पाण्याच्या शिक्षेतून परत येईल, अशी अपेक्षा करीत नव्हते. कोणी परतले तरी ते पूर्णपणे शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या उद्ध्वस्त झालेले असायचे. परंतु आज हे ठिकाण तीर्थक्षेत्र बनले आहे; कारण वीर सावरकरांनी त्यांच्या आयुष्यातील कठीण दिवस येथे घालवले होते, असे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सांगितले.

अंदमान हे ठिकाण सुभाषचंद्र बोस यांच्या जीवनाशी देखील जोडलेले आहे. ही भारताची पहिली भूमी होती, जी त्यांनी मुक्त केली. त्यांनी या भूमीला शहीद आणि स्वराज असे नाव देण्याचा सल्ला दिला, ही संकल्पना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राबवली आहे, असे अमित शाह यांनी सांगितले. 'सागरा प्राण तळमळला' हे मातृभूमीच्या तळमळीतून लिहिलेले गाणे आहे. ते इंग्लंडच्या समुद्र किनाऱ्यावर रचले गेले होते. या गाण्याची प्रत्येक ओळ आणि शब्द मातृभूमीवरील प्रेम प्रतिबिंबित करते. सावरकर लेखक आणि योद्धे होते, असेही ते म्हणाले.

# देशात प्रथमच डिजिटल जनगणना

## • दोन टप्प्यांत होणार • ११७१८ कोटी रुपयांची तरतूद

**नवी दिल्ली, १२ डिसेंबर**

दोन टप्प्यांत होणाऱ्या २०२७ च्या जनगणनेसाठी ११७१८ कोटी २४ लाख रुपयांच्या खर्चाला केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. यावेळी होणारी जनगणना ही प्रथमच डिजिटल तसेच जातीनिहाय राहणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा आणि अन्य निर्णय घेण्यात आले. मंत्रिमंडळातील निर्णयाची नंतर एका पत्रपरिषदेत माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी माहिती दिली. यावेळी प्रथम डिजिटल जनगणना केली जात आहे. डेटा सुरक्षेचे महत्व लक्षात घेऊन याचे डिजिटल डिझाईन तयार करण्यात आले आहे, असे ते म्हणाले.

एप्रिल ते सप्टेंबर २०२६ या पहिल्या टप्प्यातील जनगणनेत देशभरातील घरांची यादी करत त्यांची मोजणी केली जाईल. दुसऱ्या टप्प्यात फेब्रुवारी २०२७ पासून प्रत्यक्ष जनगणनेला प्रारंभ होईल, असे वैष्णव म्हणाले. लडाख, जम्मू काश्मीरचा बर्फाळ प्रदेश, उत्तराखंड आणि हिमाचलप्रदेशमधील दुर्गम भागातील जनगणना मात्र सप्टेंबर २०२६ मध्येच केली जाईल, असे ते म्हणाले.



डिजिटल जनगणनेत प्रत्येक घराचा जिओ टॅग केला जाणार असून यासंदर्भातील ॲपमध्ये १६ भाषांचा समावेश राहणार आहे. जनगणनेदरम्यान प्रत्येक व्यक्तीचे जन्मस्थान, वेगवेगळ्या शहरातील त्याचा प्रवास, सध्या त्याचे वास्तव्य कुठे आहे आणि त्याचे कारण काय याचा आढावा घेतला जाणार आहे.

**स्वातंत्र्यानंतर आठवी जनगणना**

२०२७ मध्ये होत असलेली जनगणना देशातील सोळावी तर स्वातंत्र्य प्राप्तीनंतरची आठवी जनगणना आहे.जनगणनेचे संचालन जनगणना अधिनियम १९४८ तसेच जनगणना नियम १९९० नुसार केले जाते. जनगणनेत घराची स्थिती, सुविधा आणि आर्थिक परिस्थिती, धर्म, जाती, अनुसूचित जाती आणि जमातीची संख्या, भाषा, शिक्षण, आर्थिक घडामोडी, प्रवासन, आणि प्रजनन दर यांचा आढावा घेतला जातो. जनगणनेचे सुरुवातीचे आकडे दहा दिवसात तर अंतिम आकडे सहा ते नऊ महिन्यात उपलब्ध होणार आहे. (तभा वृत्तसेवा)

### ३० लाख कर्मचारी होतील सहभागी

जनगणनेच्या राष्ट्रीय कार्यात देशभरात ३० लाख कर्मचारी आणि अधिकारी सहभागी होंतील, याकडे लक्ष वेधत वैष्णव म्हणाले की, जनगणनेतील माहितीची (डेटा) नोंद करण्यासाठी मोबाईल ॲप आणि त्याच्यावर देखरेख ठेवण्यासाठी केंद्रीय पोर्टलचा उपयोग केला जाईल, जेणेकरुन चांगल्या गुणवत्तेच्या माहितीचा संग्रह केला जाईल.

# तिकिटांचे दर वर्षभर नियंत्रित करणे अशक्य

## राम मोहन नायडू यांची लोकसभेत माहिती

**नवी दिल्ली, १२ डिसेंबर**

विमान कंपन्यांच्या भाडेवाढीवर वर्षभरासाठी मर्यादा घालणे शक्य नाही, देशभरातील विमानभाडे मर्यादित करणे सरकारसाठी व्यवहार्य ठरणार नाही. नियंत्रणमुक्त बाजारपेठ प्रवाशांसाठी फायदेशीर असल्याची माहिती केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री राम मोहन नायडू यांनी संसदेत बोलताना दिली.

विमान तिकीटांच्या दरवाढीवरील प्रश्नावर लोकसभेत उत्तर देताना नायडू म्हणाले, तिकिटांच्या किमती सामान्यतः सणासुदीच्या काळात वाढतात. विशिष्ट मार्गांवर आणि विशिष्ट वेळी मागणी वाढल्यामुळे उत्सवाच्या काळात विमानभाडे सहसा वाढत असे. मात्र, हे चढउतार हंगामी असतात. पण कोणत्याही क्षेत्रावर संपूर्ण वर्षासाठी भाडे मर्यादित ठेवण्यासाठी नियंत्रण आणणे शक्य नाही.



बाजारातील मागणी आणि पुरवठा यावर दर अवलंबून असते. इंडिगो विमानाच्या गोंधळानंतर काही कंपन्यांच्या विमान तिकिटांच्या किमती मोठ्या प्रमाणात वाढल्या होत्या. त्यामुळे विमानभाड्याचे नियमन करण्याचा सरकारचा काही विचार आहे का, असा प्रश्न लोकसभेत एका खासदारांनी उपस्थित केला होता. त्यांच्या या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री राम मोहन नायडू यांनी उपरोक्त माहिती दिली.

दरम्यान, इंडिगोने शुक्रवारी दिल्ली आणि बंगळुरू येथून उड्डाण होणारी एकूण १६०, तर देशभरातून २०० विमाने रद्द झाली. (वृत्तसंस्था)

## दिव्यांग यूपीएससी परीक्षार्थींना मिळणार पसंतीचे केंद्र


**नवी दिल्ली, १२ डिसेंबर**

केंद्रीय लोकसेवा आयोगाने आता आयएएस, आयपीएस आणि इतर सर्व यूपीएससीच्या दिव्यांग परीक्षार्थींना त्यांच्या पसंतीच्या केंद्रावर परीक्षा देण्याची सुविधा मिळणार असल्याची माहिती दिली. आयोगाच्या मते, दिव्यांग उमेदवारांना परीक्षेसाठी एका शहरातून दुसऱ्या शहरात प्रवास करताना अनेक अडचणी येतात. या समस्येचा विचार करून दिव्यांग उमेदवारांना अर्ज करताना त्यांचे पसंतीचे परीक्षा केंद्र निवडण्याची मुभा देण्यात आली आहे.

मागील पाच वर्षांतील परीक्षा केंद्रांच्या आकडेवारीनुसार दिल्ली, कटक, पटना आणि लखनऊसारखी काही केंद्रे लवकर भरून जातात. यामुळे दिव्यांग उमेदवारांना गैरसोय होते. नवीन निर्णयामुळे आता दिव्यांग परीक्षार्थीला त्याची पसंतीचे परीक्षा केंद्र मिळेत तसेच परीक्षेदरम्यान त्यांना जास्तीत जास्त सोय व आराम मिळेल. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### आठवड्याच्या शेवटी बाजाराची उसळी



**मुंबई** : अमेरिकन फेडने दर कपात केल्यानंतर जागतिक स्तरावरील सकारात्मक संकेताचा परिणाम शुक्रवारी शेअर बाजारावर दिसून आला. सेन्सेक्स आणि निफ्टीच्या निर्देशांकात सलग दुसऱ्या सत्रात आणि आठवड्याच्या शेवटी तेजी नोंदविण्यात आली. सेन्सेक्स ४५० अंकांनी अर्थात् ०.५३ टक्क्यांने वाढून ८५,२६७.६६ वर बंद झाला, तर निफ्टी १४८ अंकांनी अर्थात् ०.५७ टक्क्याने वाढून २६,०४६.९५ वर बंद झाला. बीएसई मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांक अनुक्रमे १.१४ टक्के आणि ०.६५ टक्क्याने वाढला. बीएसई सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल मागील सत्रातील ४६६.६ लाख कोटींवरून ४७० लाख कोटींपेक्षा जास्त झाले, ज्यामुळे गुंतवणूकदारांची संपत्ती एकाच सत्रात ३ लाख कोटींपेक्षा जास्त वाढली. निफ्टी मेटल निर्देशांक २.६३ टक्क्यांची सर्वाधिक वाढ नोंदवण्यात आली. निफ्टी रिॲल्टी इंडेक्स देखील १.५३ टक्क्यांच्या वाढीसह बंद झाला. दुसरीकडे, निफ्टी कंझ्युमर ड्युरेबल्स, निफ्टी ऑइल अँड गॅस, निफ्टी केमिकल्स आणि निफ्टी ऑटो इंडेक्स ०.६० ते १.४६ टक्क्यांनी वधारले.

## रक्त चंदनाच्या संवर्धनासाठी ६.२ कोटी रुपये

**नवी दिल्ली** : लुप्तप्राय होत असलेल्या रक्त चंदनाचे संवर्धन व्हावे यासाठी राष्ट्रीय जैवविविधता प्राधिकरणाने पाच राज्यांना ६.२ कोटी रुपयांचा निधी दिला आहे. शेतकरी आणि वनावर अवलंबून असलेल्या समुदायांचा जीवनमानाचा दर्जा सुधारण्यासाठी हा निधी देण्यात आला, असे पर्यावरण मंत्रालयाने सांगितले. या स्थानिक आणि जागतिक स्तरावर मौल्यवान प्रजातीचे संरक्षण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारे राज्य वन विभाग, राज्य जैवविविधता मंडळे आणि रक्त चंदन उत्पादकांसाठी निधी जारी करण्यात आला आहे. या ६.२ कोटी रुपयांपैकी १७.८ लाख रुपये तेलंगणातील शेतकऱ्यांना आणि १.१ कोटी रुपये आंध्र प्रदेशातील शेतकऱ्यांना दिले जातील. तामिळनाडू वन विभागाला २.९८ कोटी रुपये, कर्नाटक वन विभागाला १.०५ कोटी रुपये, महाराष्ट्र वन विभागाला ६९.२ लाख रुपये आणि तेलंगणा वन विभागाला ५.८ लाख रुपये मिळतील. आणखी १६ लाख रुपये राज्य जैवविविधता मंडळांना दिले जातील. आतापर्यंत, आंध्र प्रदेश, तेलंगणा, कर्नाटक, महाराष्ट्र, तामिळनाडू आणि ओडिशाच्या वन विभाग आणि राज्य जैवविविधता मंडळांसह, आंध्र प्रदेशातील १९८ आणि तामिळनाडूमधील १८ शेतकऱ्यांना फायदा झाला आहे.

# मुंबईत येणार सर्वात मोठा जीसीसी प्रोजेक्ट

## मायक्रोसॉफ्टसोबत एआय सहकार्याची घोषणा

### ४५ हजार रोजगार निर्माण होणार

**मुंबई, १२ डिसेंबर**

महाराष्ट्राला ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर हब बनवण्याच्या दिशेने हे अतिशय महत्त्वपूर्ण पाऊल असून ब्रुकफील्ड कंपनी मुंबईत सुमारे २० लाख चौरस फूट क्षेत्रावर आशियातील सर्वात मोठे जीसीसी अर्थात जागतिक क्षमता केंद्र उभारणार आहे. या प्रकल्पातून १५ हजार थेट आणि ३० हजार अप्रत्यक्ष असे एकूण ४५ हजार रोजगार निर्माण होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

जिओ कन्व्हेशन सेंटर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सोबत मायक्रोसॉफ्टचे सीईओ सत्या नडेला, सीईओ, एएनएसआर, विक्रम आहुजा, ब्रुकफिल्डचे अंकुर गुप्ता यांच्यासोबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. राज्यासाठी अनेक महत्त्वाच्या गुंतवणूक व तांत्रिक भागीदारी प्रकल्पाच्या अनुषंगाने यावेळी चर्चा करण्यात आली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातील प्रतिभा, पायाभूत सुविधा आणि उद्योगसुलभ वातावरणामुळे महाराष्ट्र जागतिक कॅपेबिलिटी सेंटरचे पसंतीचे ठिकाण ठरत आहे. नव्या जीसीसी धोरणामुळे मोठ्या प्रमाणात कौशल्याधारित रोजगारनिर्मिती आणि आर्थिक वृद्धी साधली जाईल. जागतिक लॉजिस्टिक्स क्षेत्रातील अग्रणी कंपनी फेड एक्स देखील मुंबई नवी मुंबई विमानतळ परिसरात आपल्या जीसीसी आणि इतर ऑपरेशन्ससाठी गुंतवणूक करण्यास उत्सुक आहे.

आगामी काळात मायक्रोसॉफ्ट मोठी गुंतवणूक करेल आणि महाराष्ट्राला कृत्रिम बुद्धिमत्तेचे केंद्र बनवण्यासाठी पुढाकार घेईल, असे मुख्यमंत्री म्हणाले. (तभा वृत्तसेवा)

### गुन्हे नियंत्रणात महाराष्ट्राने दिलेले मॉडेल देशभरासाठी दिशा देणारे



मुख्यमंत्री यांनी या ठिकाणी आयोजित मायक्रोसॉफ्ट एआय टूर कार्यक्रमात सहभाग घेतला. सत्या नडेला यांनी महाराष्ट्र सरकारसोबत विकसित केलेल्या क्राईम एआयओएस प्लॅटफॉर्मचे विशेष प्रदर्शन या कार्यक्रमात केले. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने गुन्हे नियंत्रणात महाराष्ट्राने दिलेले मॉडेल देशभरासाठी दिशा देणारे असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.



### पंतप्रधानांकडून पवारांना वाढदिवसाच्या शुभेच्छा

**मुंबई** : पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी ज्येष्ठ राजकारणी आणि माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांना त्यांच्या ८५ व्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. ज्येष्ठ नेते शरद पवार यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा! तुम्हाला दीर्घायुष्य आणि उत्तम आरोग्य लाभो!, असे फडणवीस यांनी एक्सवर पोस्ट करत लिहिले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पवार यांना फोन करून शुभेच्छा दिल्या. त्यांना चांगले आरोग्य आणि दीर्घायुष्य लाभो अशी आशा व्यक्त केली. पवारांनी अनेक दशकांपासून सार्वजनिक जीवनात दिलेल्या योगदानावर प्रकाश टाकत शिंदे यांनी पवारांना शतक पूर्ण करावे, अशा शब्दात शुभेच्छा दिल्या.

# पाच देशांच्या महासत्ता गटात भारत

**वॉशिंग्टन, १२ डिसेंबर**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जगातील शक्तिशाली देशांना एकत्र आणण्यासाठी कोर-५ अर्थात् महासत्ता गट तयार करण्याची योजना आखली असून त्यात भारताचा समावेश असेल. हा नवीन गट राहणार असून त्यात चीन, रशिया आणि जपान या देशांचादेखील समावेश राहणार आहे.

जागतिक परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे आणि युरोपच्या प्रभावाला आव्हान म्हणून नवीन गट तयार करण्याची ट्रम्प यांची रणनीती आहे. व्हाईट हाऊसने नुकत्याच प्रकाशित केलेल्या राष्ट्रीय सुरक्षा धोरणावर आधारित अहवाल जारी केला. त्यात नवीन हार्ड-पॉवर ग्रुपची कल्पना उघड झाली आहे.

कोर-५ (हार्ड-पॉवर ग्रुप) गटाचा त्यात उल्लेख आहे. त्यामध्ये अमेरिका, भारत, चीन, रशिया आणि जपान यांचा समावेश असेल. त्याचे मुख्य उद्दिष्ट प्रमुख शक्तींचा एक नवीन गट तयार करणे, विद्यमान युरोपाचे प्रभुत्व असलेल्या जी-७ आणि इतर पारंपरिक लोकशाही आणि संपत्ती-आधारित गटांच्या वर्चस्वावर मात करणे आहे.

# जगात भारी कोल्हापुरी!



## • पादत्राणे जाणार सातासमुद्रापार • जागतिक स्तरावर मिळणार ओळख

**कोल्हापूर, १२ डिसेंबर**

जगप्रसिद्ध कोल्हापुरी पादत्राणे आता जागतिक लक्झरी बाजारपेठेत झळकणार आहे. कोल्हापूरकरांच्या दीर्घकाळाच्या लढ्याला अखेर यश मिळाले आहे. प्राडा, लिडकॉम आणि लिडकार यांच्यात जागतिक विक्रीसाठी सामंजस्य करार मुंबईत झाला. या करारानंतर २६ फेब्रुवारीपासून प्राडाच्या जगभरातील ४० विक्री केंद्रांवर कोल्हापुरी पादत्राणे ग्राहकांसाठी उपलब्ध होणार आहेत.

पारंपरिक चर्मकलेचा वारसा सातासमुद्रापार नेण्याच्या दिशेने हा करार ऐतिहासिक आहे. मुंबईतील इटालियन वाणिज्य दूतावासात इटली-भारत व्यापारी परिषदेत हा करार करण्यात आला. पारंपरिक कोल्हापुरी पादत्राणे निर्मिती आणि प्राडाच्या आधुनिक, समकालीन डिझाईन्स यांचा संगम घडवून आणत जागतिक फॅशन क्षेत्रात एक अनोखा प्रयोग साकारण्याचे उद्दिष्ट यामागे आहे. हा प्रकल्प दीर्घ संवादाचा आणि पिढ्यान्‌पिढ्या पारंपरिक कलाकुसर जपणाऱ्या कारागिरांचा सन्मान करण्याच्या बांधिलकीचा परिणाम आहे, असे या उपक्रमाविषयी बोलताना लिडकॉमच्या व्यवस्थापकीय संचालक प्रेरणा देशभ्रतार यांनी सांगितले. प्राडासोबतचे सहकार्य हे नैतिक भागीदारीचे प्रतीक असून जागतिक ब्रँड स्थानिक कारागिरांच्या कौशल्याला योग्य ओळख आणि श्रेय देणार आहे. महाराष्ट्र सरकारलाही या उपक्रमाला पाठिंबा देताना समाधान असल्याचे त्यांनी सांगितले.

लिडकारच्या व्यवस्थापकीय संचालक वसुंधरा यांनीही या कराराला ऐतिहासिक म्हणत, कोल्हापुरी पादत्राणांचा वारसा कर्नाटक आणि महाराष्ट्रातील कारागिरांच्या पिढ्यान्‌पिढ्यांच्या कौशल्याचा अभिन्न भाग असल्याचे स्पष्ट केले. जीआय-टॅग मिळालेली ही परंपरा जपणे, कारागिरांना जागतिक संधी उपलब्ध करून देणे, त्यांना प्रशिक्षण, रोजगार आणि शाश्वत उपजीविका सुनिश्चित करणे हे लिडकारचे ध्येय असल्याचे त्यांनी सांगितले. प्राडासोबतची भागीदारी भारतीय कारागिरीला जागतिक प्रतिष्ठा मिळवून देणारी ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. (वृत्तसंस्था)

### प्राडाच्या 'मेड इन इंडिया' प्रकल्पाचा विस्तार


**जगभरातील उत्कृष्ट कारागिरांनी सहकार्य करून पारंपरिक कौशल्य आणि आधुनिक डिझाईन यांचा मेळ साधण्याचा यामागचा उद्देश आहे तसेच हा उपक्रम प्राडाच्या 'मेड इन इंडिया' प्रकल्पाचा विस्तार आहे. २०१९ मध्ये कोल्हापुरी चपलांना मिळालेल्या जीआय-टॅगमुळे त्यांची प्रामाणिकता आणि सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित झाले होते.**

# काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांचे निधन

## लातुरात आज शासकीय इतमामात होणार अंत्यसंस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. १२ डिसेंबर**

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांचे शुक्रवारी सकाळी साडेसहाच्या सुमारास वार्धक्यामुळे निधन झाले. मृत्यूसमयी ते ९० वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर शनिवारी, दि. १३ डिसेंबर २०२५ सकाळी ११ वाजता शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.



मागच्या काही दिवसांपासून वयोमानापरत्वे त्यांची प्रकृती ठीक नव्हती. त्यांच्यावर लातुरातील देवघर निवासस्थानी उपचार सुरु होते. उपचारादरम्यानच शुक्रवारी सकाळच्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या गांधी परिवाराशी घनिष्ठ संबंध असणाऱ्या प्रमुख नेत्यांपैकी शिवराज पाटील चाकूरकर एक होते. दि. १२ ऑक्टोबर १९३५ रोजी लातूर जिल्ह्यातील चाकूर येथील एका शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. कोणतीही कौटुंबिक राजकीय पार्श्वभूमी नसताना स्वकर्तृत्वावर त्यांनी राजकारणात मिळवलेले नेत्रदीपक यश खरोखर प्रेरणादायी असे आहे. तत्कालीन लातूर नगर परिषदेचे नगराध्यक्ष, लातूरचे आमदार, तब्बल सातवेळा लातूर लोकसभा मतदार संघाचे खासदार, केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री, लोकसभा सभापती, केंद्रीय गृहमंत्री , पंजाब - चंदीगडचे राज्यपाल म्हणूनही त्यांनी कार्य केले आहे. राजकारणात कार्यरत असतानाही एक निष्कलंक, स्वच्छ चारित्र्याचे नेते म्हणून त्यांची जीवनभर ओळख कायम होती. तत्वाधिनिष्ठित राजकारण करण्यावर त्यांचा नेहमीच भर राहिला आहे. त्यांची राजकीय कारकीर्द अशी राहिली आहे : लातूर नगर परिषदेचे अध्यक्ष दि. १ ऑगस्ट १९६६ ते दि. ३१ मार्च १९७० , आमदार लातूर : १९७२ ते १९८०, विधानसभा उपाध्यक्ष दि. ५ जुलै १९७७ ते दि. २ मार्च १९७८, विधानसभा अध्यक्ष महाराष्ट्र - १७ मार्च १९७८ ते ६ डिसेंबर १९७९, खासदार लातूर लोकसभा : वर्ष १९८० ते २००४, केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री - १९८० ते १९८२, केंद्रीय वाणिज्य मंत्री - १९८२ ते १९८३, केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्री - १९८३ ते १९८४, लोकसभा उपसभापती - १९ मार्च १९९० ते १३ मार्च १९९१, लोकसभा सभापती - १० जुलै १९९१ ते २२ मे १९९६, केंद्रीय गृहमंत्री - २२ मे २००४ ते ३० नोव्हेंबर २००८, राज्यसभा सदस्य - ५ जुलै २००४ ते २२ जानेवारी २०१०, राज्यपाल, पंजाब - २२ जानेवारी २०१० ते २१ जानेवारी २०१५.

शिवराज पाटील चाकूरकर यांच्या पार्थिवावर शनिवारी सकाळी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पुत्र शैलेश पाटील चाकूरकर, सून डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, दोन नाती असा परिवार आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# कुत्र्याच्या मौतीनं मेलात तरी कुत्रं विचारणार नाही!

'एव्हरी डॉग हॅज इट्स डे', अशी इंग्रजी म्हण आहे. कधी ना कधी प्रत्येकाला संधी मिळतेच, असा तिचा अर्थ. काही वेळा ती नकारात्मकरीत्या वापरली जाते. लायकी नसताना एखादी गोष्ट एखाद्याच्या हाती लागली तर हीच म्हण वेगळ्या संदर्भासह वापरतात. पण, सध्याचा काळ असा आहे की, 'डॉग्ज हॅव ऑल देअर डेज टू बाईट एनीबडी!...' सर्वत्र कुत्र्यांचेच दिवस आहेत. कुत्र्यांबद्दलच्या म्हणी इंग्रजीत आहेत, तशा अन्य भाषांतही आहेत. मराठी म्हणींच्या विश्वात आणि फिल्मी संवादात तर कुत्र्यांचा मुक्त संचार आहे. 'आंधळे दळते, कुत्रे पीठ खाते' इथपासून 'तुला कुत्रं विचारत नाही' ते 'कुत्ते की मौत मरेगा तू... ' किंवा 'कुत्ते मैं तेरा खून पी जाऊंगा' इथपर्यंत सर्वत्र कुत्रेच कुत्रे! माणसांचे माहिती नाही, पण सध्या कुत्र्यांचेच 'अच्छे दिन' आले आहेत. त्यांचा संचार आता गाव-शहरांच्या गल्ल्यांपर्यंत वाढलाय. ते इवल्या-इवल्या मुलांचे लचके तोडत आहेत, वृद्धांना जिवानिशी ठार करीत आहेत. ही समस्या गंभीर आहे, हे मानायला आपले मायबाप सरकार तयार नाही. सर्वोच्च न्यायालय ते राज्याचे विधिमंडळ पातळीवर त्यांच्यासाठी चर्चा झाल्या. काल-परवा हिवाळी अधिवेशनात वाघ-बिबट्यांसह भटके कुत्रेही गाजले. या विषयावर बैठक होणार आहे म्हणतात. मग एखादी समिती नेमली जाईल, तिचा अहवाल पुढच्या वर्षी येईल, मग त्या अहवालावर विचार करण्यासाठी एखादा अभ्यासगट, त्या अभ्यासगटाच्या शिफारसींचा विचार करण्यासाठी उपगट... असेच हे सुरू राहणार आहे. तरीही आपण मात्र सरकारी कामाची ही पद्धत समजून घ्यायला हवी. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर सरकारने जीआर काढला ही केवढी मोठी कामगिरी. पण, त्याचे सामान्यांना कौतुक नाही. त्याच्या अंमलबजावणीकडे कुणाचे लक्ष नाही हा भाग सोडा. कारण सरकारकडे तेवढा वेळच नाही! २०२४ मध्ये देशभरात ३७ लाख लोकांना कुत्र्यांनी चावा घेतला. छोट्या मुलांचे जीव कुत्र्यांनी घेतल्याच्या घटना घडल्या. जगभरात दरवर्षी कुत्रे चावल्यामुळे साठ हजारावर मृत्यू होतात, असे आकडेवारी सांगते. पण, काहीही घडू द्या; आंधळे दळते आणि कुत्रे पीठ खातेच! जागतिक आरोग्य संघटना म्हणते की, जगभरात रेबीजने जेवढे मृत्यू होतात, त्यापैकी ३६ टक्के एकट्या भारतात होतात. त्यातही महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, बिहारसारख्या राज्यांत कुत्रे चावण्याच्या आणि त्यामुळे मृत्यू झाल्याच्या घटनांचे प्रमाण अधिक आहे. विकासाच्या दिशेने वेगाने घोडदौड करीत असलेल्या महाराष्ट्राची तुलना यूपी-बिहारशी याबाबतीत व्हावी, याचे वाईट वाटते. पण, त्याची दखल घेणार कोण? एकट्या चंद्रपूर जिल्ह्यात पाच-सहा वर्षांत ४४ हजार कुत्र्यांनी लोकांना चावा घेतला. गेल्या सहा-सात वर्षांत एकट्या महाराष्ट्रात तीस लाखांवर कुत्र्यांनी माणसांना चावा घेतला. दररोजच्या श्वान चाव्यांची सरासरी संख्या १३०० च्या वर. संशोधकांचा असा अंदाज आहे की, लांडगा हा कुत्र्यांचा पूर्वज असावा. कुत्रा आत्ता-आत्तापर्यंत निष्ठावंत-प्रेमळ वगैरे वागला. आता तो त्याच्या पूर्वजासारखा वागून लांडग्यागत लचके तोडू लागला आहे. त्याच्याबद्दलचा हळवा भाव आता कामाचा नाही. पण, सरकारला हळवे राहण्याशिवाय पर्याय दिसत नाही. कुत्र्यांच्या उत्पत्तीवर कुणाचेच नियंत्रण नाही. वाघाने-बिबट्याने मारले तर २५ लाख मिळतात. ७५ वर्षांचा माणूस मेला तरी २५ लाख, तरणाबांड माणूस जिवानिशी गेला तरी तेवढेच. छोटा असला तरी २५ लाख. हे तार्किकदृष्ट्या बरोबर नाही. एखाद्याचे उर्वरित आयुष्य लक्षात घेऊन भरपाई दिली पाहिजे आणि त्यासोबत काही निश्चित रक्कम अनुदान म्हणून दिली पाहिजे. पण, हे सारे ठरते मंत्र्यांच्या घोषणेवर. गेल्या दोनेक दशकांत वनमंत्र्यांच्या औदार्यामुळे दोन-तीन लाखांवरून वाढत-वाढत ही भरपाई २५ लाखांवर आली. आता २५ चे ५० लाख होतील की १ कोटी होतील, एवढेच आपण पाहायचे. खरे तर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशामुळे हा विषय अजेंडावर तरी आला. तोवर कायदा होता, कुत्रे होते आणि सरकारही होते. पण, काहीच घडत नव्हते. कुत्र्यांच्या निर्बीजीकरणाची किंवा रेबीजच्या लसींची सोय जिल्हास्थानी जेमतेम आहे. त्याखाली तर ती जवळजवळ नाहीच.

वाघ-बिबटे गावाकडे येऊ लागले आणि शहरांमध्ये तर भटक्या कुत्र्यांचे थैमान. दुसरीकडे श्वानप्रेमी मंडळी कोकलत असतात. ज्यांनी कुत्री पाळली आहेत, त्यातील बहुतांशी लोक त्यांना इतरांना चावे घेण्यासाठी सोडून देतात. कुत्र्याने चावा घेतलेली व्यक्ती रेबीजने तडफडून मरते. पण, त्यांचा कुणीही वाली नाही. सरकारकडे तर अशा किरकोळ गोष्टींसाठी वेळच नाही. त्यामुळे अशा जिवांना कुत्रं विचारत नाही आणि अक्षरशः सांगायचे तर कुत्रेही त्यांचे हाल खात नाहीत. आता नवे पिल्लू सोडले गेले. जंगलांमधून बिबटे गावात येतात तर त्यांच्यासाठी जंगलातच कुत्रे सोडा म्हणतात. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाला हे मान्य नाही. तसे केले तर कुत्र्यांचे भयंकर आजार जंगलातल्या प्राण्यांना होऊ शकतील. खरे तर बिबटे हे गावांमध्ये कुत्र्यांना खायला येत आहेत. गावांमधील कुत्र्यांची संख्या कमी झाली तर बिबटे येणार नाहीत. मग टूम निघाली की, बकऱ्या जंगलात सोडा म्हणजे वाघ गावांकडे येणार नाहीत. त्यासाठी पशुसंवर्धन खात्याला टेंडर वगैरे काढावे लागेल. शिवाय, जंगलात सोडलेल्या बकऱ्या वाघांनी खाल्ल्या की माणसांनी हे पाहायचा कोणताच मार्ग उपलब्ध नाही ही आनंदाचीच बाब म्हणावी लागेल. स्थानिक स्वराज्य संस्थांकडे कुत्र्यांच्या नियंत्रणाची जबाबदारी कायद्याने आहे. त्यासाठी सरकार निधी देते. दशक-दशक निधी संपत नाही. मात्र, कंत्राटदारांचे पोट त्यावर चालते. एका वस्तीतले कुत्रे पकडायचे आणि दुसऱ्या वस्तीत नेऊन सोडायचे. एक कुत्रा पकडण्याचे पाचशे ते हजार रुपये. कुत्रा किंवा कुत्रीच्या नसबंदीचीही सोय आहे म्हणतात. पण, कोणती नस कुठे दबते कुणास ठावूक, कुत्री वाढतच असतात. कुत्रे वाढत राहतील तर कंत्राटदारांचे पोट चालत राहील हा साधा तर्क असावा. कुत्र्यांच्या जिवावर कंत्राटदार गब्बर झाले आहेत. एरवीही सारा देश गब्बर कंत्राटदारांच्या भरवशावर चालत असेल तर येथेही सरकारचा इलाज नाही, हे आपण समजून घेतले पाहिजे. जे सरकार कुत्रे पकडू शकत नसेल, ते बिबट्याला कसे पकडणार, असे राष्ट्रवादीचे जयंत पाटील गमतीत म्हणाले. ते विरोधात असल्यामुळे असे बोलणारच. विरोधकांना गांभीर्याने थोडेच घ्यायचे असते! सरकार चालवायचे असेल तर गांभीर्याने घेण्याचे विषयच वेगळे असतात. शेतकरी मरत असतात, तसे कुत्रे चावतच असतात. सामान्यांनी समजून घ्यायचे असते की, सरकारचे नाईलाज सरकारएवढेच मोठे असतात. त्यात कुत्र्या-बित्र्यांच्या भानगडी सामान्यांनी पाहायच्या असतात. हा विषय सरकारच्या कक्षेत येत नाही, अशी घोषणा केली जाणार नाही हे नक्की. कारण कायद्याची अडचण आहे. कायदा असला तरी त्याची अंमलबजावणी जशी पूर्वीच्या सरकारांनी केली नाही, तसे हेही सरकार करणार नाही. ज्याला जगायचे असेल त्याने एक तर घरात राहावे किंवा कारने फिरावे. नाही तरी समृद्धी वाढत चालली आहे. त्यामुळे कारची संख्या वाढली पाहिजे. कुत्र्यांच्या भीतीने का होईना, ऑटोमोबाईल उद्योगाला अधिकचे अच्छे दिन येतील, ही त्यामागची दूरदृष्टी असावी. कुत्र्यांची संख्या कमी केली तर माणसांची चपळता नाहीशी होऊन राज्याची उत्पादकता कमी होईल, अशी भीतीही सरकारला आहेच. अशावेळी कैचीत सापडलेल्या सरकारने काय करायचे?... भटके कुत्रे कमी करून राज्याचा जीडीपी कमी करायचा, की त्यांची संख्या वाढती राहावी यासाठी निष्काम कर्मयोगी बनून जीडीपीत भर घालायची?... प्रश्न साधा आहे, पण उत्तर साधे नाही. त्यामुळे आपण एवढेच समजून घ्यायचे की, आपण कुत्र्याच्या मौतीनं मेलो तरी आपल्याला कुत्रं विचारणार नाही हे गृहीत धरतो ना? मग सरकारसारख्या एवढ्या मोठ्या व अत्यंत महत्त्वाची कामे असलेल्या यंत्रणेकडून काय अपेक्षा करताय?


## यंगिस्तान

# धुरंधर आणि राजकीय इच्छाशक्ती

जयेश शत्रुघ्न मेस्त्री

आदित्य धर दिग्दर्शित 'धुरंधर' या चित्रपटाची चर्चा सगळीकडे सुरू आहे. या चित्रपटाने चांगली कमाई केलीच आहे, पण कमाईपेक्षाही याची चर्चा अधिक झाली आहे. प्रशंसकांनी स्तुतिसुमनांच्या माळाच्या माळाच निर्मिण्याचा ध्यास घेतला आहे आणि टीकाकारांनी दूषणे देण्याकरिता वापरण्यात येणाऱ्या गलिच्छ शब्दांचा साठा मोकळा केला आहे. क्वचितच इतके यश एखाद्या चित्रपटाला लाभते. बऱ्याचदा चर्चा होऊनही चित्रपट चांगली कमाई करत नाही. तर कमाई करूनही प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवण्यास अपयशी ठरतो. मात्र धुरंधरने या सगळ्या बेड्या मोडलेल्या आहेत. चित्रपट गुप्तहेरावर आधारित असला तरी त्याचा जॉनर हा स्पाय थ्रिलर नसून क्राईम थ्रिलर आहे. पाकिस्तानातील गँगवॉरचा संबंध गुप्तहेराशी लावण्यात दिग्दर्शकाला यश आले आहे आणि तेथील गुंडांचा विक्षिप्त, विद्रूप, हिडिस आणि मानवतेला शाप ठरणारा चेहरा दाखवण्यातही त्याला यश लाभले आहे. १९९९ रोजीचा आयसी-८१४ प्लेन हायजॅक, २००१ चा संसद हल्ला, २००८ मधील २६/११ हल्ला या तीन महत्त्वाच्या घटना चित्रपटांत येतात. २६/११ या प्रसंग तर थोडासा डॉम्युमेंटरी शैलीत घेण्याचा प्रयत्न झाला आहे. आदित्य धर हा 'उरी-द सर्जिकल स्ट्राईक' या चित्रपटाचा दिग्दर्शक आहे आणि दिग्दर्शक म्हणून 'धुरंधर' हा त्याचा दुसरा चित्रपट. 'बारामुल्ला' या नुकत्याच गाजलेल्या चित्रपटाचा तो पटकथालेखक आणि निर्माताही आहे. त्यामुळे देशभक्ती हा त्याच्या एकंदर चित्रपटांचा सूर दिसतो. मात्र देशभक्ती दाखवताना तो उजवा किंवा डावा असा भेद करत नाही. धुरंधरच्या बाबतीत बोलायचं झालं तर आदित्य धरला जे अपेक्षित असेल ते असेल मात्र त्यातून राजकीय इच्छाशक्तीचा कमकुवतपणा सपशेल दिसतो. स्वयंघोषित बळजबरीचे पुरोगामी आणि नक्षली प्रवृत्तीच्या लोकांना ठसका लागून त्यांचा जीव बेहाल होतोय त्यामागे हे महत्त्वाचे कारण आहे. डॉ. मनमोहन सिंग २००४ ते २०१४ या काळात देशाचे पंतप्रधान होते. म्हणजे २६/११ हल्ल्यावेळी डॉ. मनमोहन सिंग तर प्लेन हायजॅक आणि संसद हल्ल्यावेळी वाजपेयी पंतप्रधान होते. तरी सुद्धा चित्रपट पाहताना पुरोगाम्यांना इतका त्रास का झाला असावा? याचं उत्तर जाणून घ्यायचं असेल तर पुरोगामी विश्व आपल्याला समजून घ्यावं लागेल.

पुरोगामित्वाची चळवळ भारतामध्ये ब्रिटिश काळात सुरू झाली. तरी त्याही आधीपासून भारतात वेगवेगळी मते अस्तित्वात होती. बुद्धकाळाच्या सुमारे ५०० वर्षांपूर्वीही वेगळी मते मांडली जात होती. मात्र स्वातंत्र्यानंतर पुरोगामी चळवळीने विद्रूप रूप धारण केले. हिंदू विरोध हा या चळवळीचा केंद्रबिंदू झाला होता. त्यामुळे या चळवळीतील वैचारिक अधिष्ठान नाहीसे झाले. ही पुरोगामी चळवळ कशासाठी आहे याचा विसर पडून किंबहुना विसर पडावा याच हेतूने पुढे ही चळवळ सुरू राहिली. हिंदू विरोध करण्यासाठी त्यांना ब्राह्मण विरोध करणे क्रमप्राप्त होते. कारण विरोध, बंड हे बऱ्याचदा प्रस्थापित विरुद्ध विस्थापित असे होते. भारतातील प्रस्थापित म्हणजेच सवर्ण व ब्राह्मण या सवर्णांचे प्रतीक. हिंदू हा ब्राह्मणांचा धर्म आहे असे सांगून हिंदू धर्मावर तसेच हिंदुत्व या राजकीय सैद्धांतिक विचारावर घाला घालण्याचा



प्रयत्न आजही होत आहे. सध्या या पुरोगाम्यांना हिंदू धर्म यापेक्षा हिंदुत्व हा अस्सल पुरोगामी विचारांनी नटलेला सिद्धांत अधिक धोकादायक वाटतो. कारण या विचारात असीम देशभक्तीची, देशासाठी वाट्टेल तो त्याग करण्याची, स्वतःच्या देहाची समिधा या देश-यज्ञात अर्पण करण्याची प्रेरणा आहे. हिंदुत्वाची व्याख्या अनेकांनी केलेली आहे. मात्र सावरकरांनी केलेली व्याख्या खूप गाजली. समर्थकच नव्हे तर विरोधकांनीही ही व्याख्या टीका म्हणून का होईना, पण डोक्यावर घेतली आणि पुरोगाम्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांनंतर आधुनिक भारतातले सावरकर हे हिंदूंचे प्रमुख नेते असल्याचे मान्यही केले. म्हणूनच जिन्ना सुभाषबाबूंना हिंदूंचे नेते म्हणून सावरकरांची भेट घ्यायला सांगतात. आजही राहुल गांधी सावरकरांवर गलिच्छ आरोप करतात ते याच कारणासाठी. राहुल गांधी हे स्वतःला या पुरोगामी विश्वाचा नेता मानतात आणि सावरकर हे त्यांचे प्रमुख विरोधक आहेत. आता या पुरोगामी विश्वाने केवळ हिंदू विरोध इतकेच ध्येय न ठेवता हिंदू विरोध करण्यासाठी देश विरोध हाही हेतू सर्वोच्च मानत आहेत. तुम्ही जर यांची विधाने, यांच्या कृती, यांची मते बारकाईने लक्षात घेतली तर तुम्हाला कळेल की या जयचंदाची औलादी आहेत. यांनी तर आता रँडला मारणाऱ्या देशभक्त चापेकर बंधूंना व्हिलन ठरवण्याचा आणि रँडला हीरो ठरवण्याचाही बेत आखलेला आहे. हे स्लो पॉयजन ते कदाचित इंग्रजांचे हस्तकच असल्याने देत असावेत. हे जिहादी अतिरेकी व नक्षलींचे शुभचिंतक आहेत. भारतातले जे मूळ आहे, ते भारताचे शत्रू आहे, असा नॅरेटिव्ह हे लोक पसरवत आहेत. जेव्हा जेव्हा अतिरेकी हल्ला होतो तेव्हा हे भारतातल्या सरकारला दोष देतात (अर्थात असे हल्ले हे सरकारचे अपयश असतेच.) पण ज्यांनी हल्ला केला त्या जिहादी अतिरेक्यांविषयी यांच्या मनात प्रचंड आदर आणि प्रेमभाव असतो. पहलगाम हल्ला झाला तेव्हा अतिरेक्यांची बाजू मांडण्यासाठी हे पुरोगामी लोक जिवाच्या आकांताने धावत आले. ही पुरोगामी विचारधारा मूळच्या पुरोगामी या शब्दाला बाधक आहे. कारण मूळ पुरोगामी चळवळ या देशद्रोह्यांनी काबीज केली आहे. ही देशद्रोही मानसिकता अनेक काळापासून देशात अस्तित्वात आहे. आपल्याकडे अनेक आक्रमक आलेत. त्या आक्रमकांना या देशद्रोह्यांनी मदत केली आहे. हिंदूंना किंवा मूलवासीयांना विरोध करण्यासाठी आणि त्यांच्यावर सत्ता मिळवण्यासाठी या लोकांनी परकीय शक्तींना आश्रय दिला. आजही टूलकिट गँगच्या माध्यमातून ही गोष्ट सहज सिद्ध करता येते. सीएए आणि एनआरसीच्या विरोधात झालेल्या दंगलीला कोणी पाठिंबा दिला हे तुम्हा सर्वांना माहीतच आहे. प्रदूषणविरोधी आंदोलनात निर्दयी, खुनी माओवादी माडवी हिडमाचे गुणगान का? या प्रश्नाचे उत्तर फार कठीण नाही. रामाला विरोध आणि बाबरला समर्थन का? अफलझलखानाचे लांगूलचालन का? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे देण्याची गरज आहे काय?

धुरंधर या चित्रपटाला जो विरोध होतोय, त्याची ही पृष्ठभूमी आहे. लेखाची मर्यादा म्हणून मी फार विस्तृत स्वरूपात इथे मांडू शकत नाही. यासाठी मी वाचकांची क्षमा मागतो. मात्र आपल्याला परिस्थितीचे गांभीर्य लक्षात आले असेल अशी आशा बाळगतो. मी वर म्हटल्याप्रमाणे धुरंधर भारतातील कोणत्याच जमातीवर लक्ष्य करत नाही. उलट तो पाकिस्तानचा गलिच्छ चेहरा उघड करतो. यामुळे पाकिस्तानी नागरिकांना त्रास होतोय, हे आपण समजू शकतो. पण पुरोगाम्यांना का त्रास होतोय? याचं उत्तर म्हणजे उपरोक्त स्पष्टीकरण आहे. धुरंधरच्या निमित्ताने राजकीय इच्छाशक्ती काय असते हे आपल्याला कळतं. पाकिस्तानी गँगस्टर कशाप्रकारे बनावट भारतीय चलनी नोटांचा व्यापार करायचे हे कळतं आणि म्हणूनच नोटबंदी का आवश्यक होती हेही कळतं. ल्यारी या पाकमधील शहरातील गँग्स आणि उत्तर भारतातील गँग्स यांचा उल्लेख चित्रपटात येतो. आज या गँगस्टर्सवर कशाप्रकारे नियंत्रण मिळवण्यात यूपी शासन यशस्वी झाले आहे हेही लक्षात येते. काश्मीर हा भारताचा भाग नाही असे उघडपणे बोलणारे काश्मिरी आणि आता दबक्या आवाजातही बोलण्यास घाबरणारे काश्मिरी यांतील भेद आपल्याला कळतो. त्यामुळे राजकीय इच्छाशक्ती फार महत्त्वाची आहे. इतक्या वर्षांत निर्माण केलेली घाण एक कांडी फिरवून जादूने स्वच्छ होणार नाही. कदाचित घाण निर्माण करण्यात जितकी वर्षे खर्च झाली, किमान तितकी वर्षे तरी घाण साफ करायला लागतील. पण घाण साफ झाली पाहिजे ही राजकीय इच्छाशक्ती तर हवीच ना? धुरंधर सुप्तपणे या राजकीय इच्छाशक्तीवर भाष्य करतो. पुरोगाम्यांना दुःख होण्याचे हे महत्त्वाचे कारण आहे. कारण राजकीय इच्छाशक्ती म्हणजेच पुरोगामित्वाचा बुरखा पांघरलेल्या या माफियांचा, गुंडांचा, राक्षसांचा, देशद्रोह्यांचा अंत!

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

# आजारापेक्षा उपचार भारी ठरू नये!

विजय कुळकर्णी

आजारापेक्षा उपचार भारी ठरू नये, असे म्हणण्याची स्थिती एस. टी. महामंडळांच्या राज्यातील विविध आगारांवर आली आहे. राज्य परिवहन महामंडळाला तोट्यातून बाहेर काढण्यासाठी सरकारचे प्रयत्न सुरू आहेत. त्याचाच एक भाग म्हणून एस. टी. महामंडळाच्या ताफ्यात इलेक्ट्रिक बसेस दाखल झाल्या आहेत. या बसेस आगारांसाठी खर्चीक ठरत आहेत. शिवाई ही ई-बस महामंडळाच्या ताफ्यात दाखल होत आहे. आजपर्यंत ५५० पेक्षा जास्त बसेस राज्यातील विविध आगारांत पोहोचल्या आहेत. या बसचे ७४ रु. प्रतिकिलोमीटर या आगारांना भरावे लागणार आहेत. या बसेस लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी धावणार आहेत. एकदा चार्ज केल्यावर ३०० कि. मी. ही बस धावणार आहे. त्यामुळे इंधनावर डिझेलच्या तुलनेत या बसचा खर्च लक्षणीयरीत्या कमी होणार आहे. सर्व्हिसिंगचा खर्च देखील कमी होणार आहे. त्यामुळे आर्थिक बचत होणार असल्याचे सांगितले जात आहे. एका बसला पूर्ण चार्जिंगसाठी किमान ३ तास लागणार आहेत. सध्या बुलढाणा जिल्ह्यातील सात पैकी ४ आगारांना टप्प्याटप्प्याने १५० ई-बसेस मिळणार आहेत. मात्र, या बसचे प्रवासी भाडे वर्तमान बसेसपेक्षा जास्त असल्याने ते प्रवाशांना परवडणारे नसल्याचे प्रवाशांचे म्हणणे आहे. सध्या खामगाव-अकोला धावणाऱ्या लालपरीचे तिकीट ९१ रु. आहे. तर ४४ आसनी शिवाई ई-बसचे तिकीट १४४ रु. व ३५ आसनी ई-बसचे तिकीट १३१ रु. आहे. त्यामुळे सर्वसामान्य प्रवासी या बसने प्रवास करणे टाळत आहेत. परिणामी एस. टी. आगारांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. त्यामुळे अनेक आगारप्रमुखांनी या बसेस घेण्यास नापसंती दर्शविण्याचा प्रयत्न केला. पण, महामंडळाचा निर्णय असल्याने त्यांना या बसेस आगारात दाखल करून घ्याव्या लागल्या किंवा लागत आहेत. तसेच, बुलढाणा जिल्ह्याचा विचार करता ई-बस चार्जिंगसाठी आवश्यक सुविधा नाही. एका खाजगी कंपनीला बुलढाणा, चिखली, मलकापूर, खामगाव आणि शेगाव येथील आगारांमध्ये चार्जिंग सेंटर उभारण्याचे कंत्राट देण्यात आले असल्याची माहिती आहे. बुलढाणा व खामगाव येथील काम अंतिम टप्प्यात असल्याचे सांगण्यात येते. मात्र, ही सुविधा अजून कार्यान्वित न झाल्याने ई-बस सेवा सुरू होण्यास आणखी विलंब लागणार आहे.

ई-बस सेवेतील इतर अनेक तांत्रिक अडचणींसोबतच प्रवास भाडे ही देखील महत्त्वाची समस्या आहे. सर्वसामान्य प्रवाशांना परवडेल, एवढे भाडे आकारण्यात यावे, अशी प्रवाशांची मागणी आहे. कारण, साध्या बसने प्रवाशांना सवलतीच्या दरातील प्रवास भाड्याचा देखील लाभ मिळतो. महिलांना अर्धे तिकीट आकारले जाते. ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास सवलतीला लाभ मिळतो. याशिवाय दिव्यांग व इतर प्रवास सवलतधारकांना या बसने प्रवास करता येईल की नाही, ते अजून निश्चित नाही. सरकारने प्रवास सवलत दिल्यामुळे महिला, ज्येष्ठ नागरिक प्रवाशांची संख्या लक्षणीयरीत्या वाढली आहे. प्रवासी घेण्यासाठी सध्या सुरू असलेल्या बसेसची संख्या कमी पडत आहे. त्यातही नादुरुस्त बसेसची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. ई-बसेस लवकरात लवकर सुरू झाल्यास जुन्या बसेसवरील ताण कमी होईल. तसेच, ई-बसेसच्या प्रवास भाड्यात काही कपात केल्यास सर्वसामान्य प्रवासी त्या बसेसने प्रवास करण्यास नक्कीच पसंती देतील. यापूर्वी महामंडळाने शिवशाही ही बससेवा सुरू केली होती. या बसचे तिकीटही सुरुवातीला जास्त होते. प्रवाशांना कोणतीही सवलत या बसमध्ये मिळत नव्हती. त्यामुळे सुरुवातीला या बससेवेला कमी प्रतिसाद मिळाला. मात्र, प्रवास भाडे कमी केल्यावर शिवशाहीने देखील प्रवास करण्यास प्रवाशांनी पसंती दिली. वातानुकूलित प्रवासाचा आनंद प्रवाशांना मिळाला आणि मिळत आहे. तसेच, शिवाई या ई-बस सेवेचे देखील आहे. या बसचे प्रवासी भाडे कमी करून राज्य परिवहन महामंडळाने प्रवाशांना दिलासा द्यावा. तसेच, राज्यातील सर्व आगारांत ई-बसेस व चार्जिंग स्थानकांची उभारणी लवकरात लवकर करावी, अशी अपेक्षा यानिमित्ताने व्यक्त कराविशी वाटते.

८८०६००६१४९

# डॉ. बाबा आढाव आणि पन्नालाल सुराणा : दोन ज्येष्ठ समाजसेवकांचे जाणे : सामाजिक चळवळीची मोठी हानी

आपल्याला लाभलेले दीर्घायुष्य अखेरपर्यंत समाजाच्या कल्याणाचा विचार प्रत्यक्ष कृतीद्वारे आचरुन नैतिकतेचा आदर्श प्रस्थापित करणारे दोन ज्येष्ठ समाजसेवक पन्नालाल सुराणा आणि डॉ बाबा आढाव ह्यांचे जाणे सामाजिक चळवळीची फार मोठी हानी मानावी लागेल. २ डिसेंबर रोजी पन्नालाल सुराणा (वय ९३) आणि ८ डिसेंबर रोजी डॉ बाबा आढाव(वय ९५) ह्यांचे अवघ्या एका आठवड्यात निधन झाले ह्याची खंत त्यांचे अनेक चाहते व्यक्त करीत आहेत. दोघेही अखेरच्या दिवसापर्यंत कार्यमग्न होते,सच्चे मित्र होते, दोघे समवयस्क होते,दोघांनी काही लढ्यांचे एकत्रितपणे नेतृत्व केले,समाजात पुरोगामी विचार रुजावेत, कष्टकऱ्यांच्या कल्याणासाठी सतत संघर्ष करावा ह्याच समाजवादी मूल्यांसाठी दोघांनी अखंड प्रयत्न केले!

पन्नालाल सुराणा तथा भाऊ ह्यांनी प्रजा समाजवादी पक्षाच्या माध्यमातून कामास सुरुवात करून विनोबा भावेंच्या भूदान चळवळीत अनेक वर्षे सक्रिय राहिले.राष्ट्र सेवा दलाचे अध्यक्ष,राज्य जनता पक्षाचे सरचिटणीस,आसू येथे कृषी संशोधन केंद्राची स्थापना आणि १९९३ नंतर भूकंपग्रस्त मुलांसाठी आपले घर निवासी शाळा ही त्यांची प्रमुख कार्यक्षेत्रे होती. मराठवाडा दैनिकाचे संपादक म्हणून त्यांनी काही वर्षे काम पाहिले. त्यांच्या पत्नी डॉ वीणा सुराणा ह्याही अनेक आंदोलनात सहभागी होत असत. भाऊंनी विविध विषयांवर पुस्तके लिहिली. त्यात कथा





वीणाची, बुलंद आवाज (प्रमिला दंडवते चरित्र), गांधीजींची ओळख आणि एका समाजवाद्याची पायपीट हे आत्मकथन अशा पुस्तकांचा समावेश आहे. समाजवादी विचारवंत हीच त्यांची सार्थ ओळख ठरेल.

डॉ बाबा आढाव ह्यांनी संयुक्त महाराष्ट्र, गोवा मुक्ती चळवळ ह्यात भाग घेतला. सम ाजवादी विचारसरणीचा पगडा त्यांच्या व्यक्तित्वात जाणवतो.स्वतःची चांगली वैद्यकीय प्रॅक्टीस सोडून त्यांनी असंघटित,कष्टकरी, हमाल बंधू, रिक्षा चालक आणि बांधकाम क्षेत्रातील कामगारांसाठी आपले जीवन झोकून दिले.१९६३ मध्ये हमाल पंचायत स्थापन करून मोठा लढा यशस्वी केला. एक गाव एक पाणवठा ह्या चळवळीने त्यांनी व्यापक जनजागृती केली. ५३ वेळा विविध आंदोलनांच्या परिणाम स्वरूप त्यांनी कारावास भोगावा लागला आहे. कोणताही शासकीय पुरस्कार त्यांनी स्वीकारला नाही.१९७४ मध्ये त्यांनी कष्टाची भाकर केंद्र सुरू केले,पुढे त्याच्या अनेक शाखा सुरू झाल्या आणि हा अभिनव उपक्रम यशस्वी झाला.महात्मा फुले समता प्रतिष्ठान स्थापन करून त्यांनी विधायक कार्याला विचारांची जोड दिली, दरवर्षी फुले,आंबेडकर व्याख्यानमाला ते आयोजित करीत असत. डॉ बाबा आढाव आणि पन्नालाल सुराणा,दोघेही अनेक लढ्यात एकत्र सहभागी होते. पंढरपूर येथे यज्ञविरोधी आंदोलनात दोघांना विरोधकांचा रोष पत्करावा लागला होता. पन्नालाल सुराणा ह्यांना लाठी प्रहाराने डोक्यास दुखापत झाली होती असे बाबांनी त्यांच्याशी मागील महिन्यात १३ नोव्हेंबर रोजी झालेल्या प्रत्यक्ष भेटीत मला आणि श्रीनिवास गडकरी ह्यांना सांगितले होते.खूप मनमोकळा संवाद आम्ही साधला होता.आपल्या मोठेपणाचा कोणताही लवलेश दोघांच्या मनात नव्हता,त्यांना भेटण्यासाठी कोणतीही पूर्व परवानगी घ्यावी लागत नसे इतके ते साधे आणि सहजपणे उपलब्ध असत. समाजवादी नेते सार्वजनिक आणि खाश्रगी आयुष्यात आपल्या तत्वांशी बांधिलकी जोपासत असत हे मी माझे वडील, बाबा कुसूरकर, ह्यांच्या वागण्या बोलण्यातून पाहिले आहे. साधी राहणी, स्पष्ट विचार आणि कोणत्याही लाभासाठी तत्वांना मुरड न घालणे ही समान वैशिष्ट्ये सर्व समाजवादी नेत्यांमध्ये दिसून येतात.तोच अनुभव पन्नालाल सुराणा आणि डॉ बाबा आढाव ह्यांच्या भेटीत आला.

डॉ बाबा आढाव आणि पन्नालाल सुराणा दोघेही समाजवादी तत्वे कायम राहतील आणि ह्या तत्त्वांचे जतन पुढील पिढी अवश्य करेल हा ठाम विश्वास बाळगून होते.त्यांचे कार्य अखंड सुरू राहील आणि तीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल अशी भावना व्यक्त करून दोन्ही नेत्यांच्या निस्पृह, निःस्वार्थी, मूल्याधिष्ठित समर्पित कार्यास लाख लाख सलाम !

- संजीव प्रभाकर कुसूरकर

## वाचक पत्रे

### संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश काळाची गरज

नुकताच २६ नोव्हेंबरला संपूर्ण देशात संविधानाचा अमृत महोत्सव साजरा करण्यात आला. अमृत महोत्सवी संविधान दिनानिमित्त संपूर्ण देशात संविधानाचा जागर करण्यात आला. ठिकठिकाणी विविध उपक्रमांद्वारे संविधानाचे महत्त्व अधोरेखित करणारे कार्यक्रम, उपक्रम राबवण्यात आले. मात्र संविधान दिन हा फक्त एक दिवसाचा सोहळा ठरता कामा नये. वास्तविक संपूर्ण वर्षभर संविधानाचा जागर व्हायला हवा. संविधान लागू होऊन आज ७६ वर्षे उलटली तरी नागरिकांना आपले हक्क आणि अधिकार माहीत नाहीत म्हणूनच संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश करण्याची वेळ आली आहे. संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश करावा ही खूप जुनी मागणी आहे. मात्र त्याला अद्याप म्हणावा तसा प्रतिसाद मिळत नाही. आज आपल्या देशात लाखो विद्यार्थी पदवीधर होतात पण आपल्या संविधानाचा अभ्यास अतिशय कमी विद्यार्थ्यांना असतो. उच्चशिक्षित असूनही संविधानाची जुजबी माहितीही विद्यार्थ्यांना नसते. संविधानाबाबत उच्चशिक्षित विद्यार्थी अज्ञानीच असतात. त्यांचे हे अज्ञान दूर होण्यासाठी संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश होणे गरजेचे आहे. भारतीय संविधानात नागरिकांचे मूलभूत हक्क, कर्तव्य, अधिकार यांचा समावेश आहेच पण देशाचा आदर्श कारभार कसा करावा याचेही नियम आहेत. समता, बंधुता यांचीही शिकवण संविधानात आहे. संविधानामुळेच देश अखंड आहे. तो लोकशाहीचा पाया आहे. आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे. संविधान आपला राष्ट्रीय ग्रंथ आहे. भारताचे संविधान शालेय स्तरावरच विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवले तर राज्याच्या आणि राष्ट्राच्या उभारणीत ते योग्य दिशेने आपापल्या क्षेत्रात कार्य करू शकतील म्हणूनच हा विषय अभ्यासक्रमात समाविष्ट होणे ही काळाची गरज आहे.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

### ईपीएस ९५ च्या पेन्शनर्सना न्याय द्या

आपल्या देशात २०१४ ला सर्व जनतेच्या मनातलं सरकार म्हणजेच मोदी सरकार स्थापन झाले. तेव्हापासून आजपर्यंत १ कोटीच्या वर ईपीएस ९५ चे पेन्शनर्स एका चांगल्या निर्णयाची वाट बघत आहेत. कमीत कमी १००० रुपये पेन्शनमध्ये वाढ होऊन ५००० रुपये व्हावी आणि त्यावर महागाई भत्ता मिळावा इतकी साधी आणि छोटी मागणी सरकारकडे पेन्शनर्स करत आहेत. पंतप्रधान मोदी यांच्याकडून ही अपेक्षा आहे. पंतप्रधान मोदी यांनी अनेक कल्याणकारी योजना आणल्यात. जनतेच्या भल्यासाठी अनेक कामे केलीत. आयुष्मान योजना, पंतप्रधान आवास योजना, या सर्व योजना केवळ मोदी सरकारच आणू शकतात आणि राबवू शकतात. या आधीच्या सरकारकडून कधीच अपेक्षा केली नव्हती कारण ती पूर्ण होणार नव्हतीच. परंतु मोदी सरकार हे प्रधान सेवक आहेत. जनतेच्या मागण्यांचा जवळून अभ्यास आहे. त्यामुळे या सरकारकडून ईपीएस पेन्शनधारकांना अपेक्षा आहेत. कारण सध्या अतिशय हलाखीचे जीवन पेन्शनर्स जगत आहेत. आता नुकतेच संसदेच्या अधिवेशनात या विषयावर प्रश्नोत्तरे झालीत. उत्तर देताना सरकारने ईपीएस पेन्शन फंडामध्ये निधीची कमतरता असल्यामुळे सध्या पेन्शनमध्ये वाढ होणार नाही हे स्पष्ट केले त्यामुळे इतक्या वर्षांपासून आतुरतेने वाट बघत जीवन जगत असणारा वर्ग निराश झाला. आता कोणाकडे न्याय मागावा हा प्रश्न त्यांना भेडसावत आहे. केंद्रातले सरकार हे गोरगरिबांचे, वंचितांचे सरकार म्हणून काम करत आहे आणि तसा लौकिकही आहे. त्याप्रमाणे सर्व पेन्शनधारकांची विनंती आहे की परत एकदा या प्रश्नाचा गांभीर्याने विचार करून त्यांना योग्य न्याय द्यावा.

**सुनील बोक्षे**/७५८८१७७४६२

## आजचे संघगीत-७१

शनिवार, १३ डिसेंबर २०२५

### मन माझे विसावले रे संघमंदिरी स्थिरावले

मन माझे विसावले रे संघमंदिरी स्थिरावले ॥धृ.॥

किती भटकलो रानोमाळी एकलाच मी सांजसकाळी
भोंवतालचे भान नच मुळी ध्येयशून्य जीवित थकले रे ॥१॥

तोच कुठुनसा ये आर्त स्वर वीणा छे, ना सतार नच तर
सनई न मुरली पार्थिव नच स्वर स्वर्गीय गीत मज गमले रे ॥२॥

हे ताऱ्यांचे निगूढ गूंजन जळत्या ज्योतीचे संवेदन
फुटत्या लाटांचे प्रस्फुंदन हृद्भाव सर्व हे अवतरले रे ॥३॥

प्रौढांचे समतोल समीक्षण तरुणांचे दाहक कर्तेपण
बालांचे ते विभूतिपूजन छेडिता तंतु हे स्वर घुमले रे ॥४॥

येथ सुरांची नसे सजावट लटक्या शब्दांची नच वटवट
दांभिकतेची तात्त्विक लटपट बोलते हृदय हे जळते रे ॥५॥

आयुष्याचे गीतच गमले त्यागाच्या रागात गाइले
कर्तव्याचे सूरच सगळे गंभीर उरी वरवर हसले रे ॥६॥

हळू हळू हृदयांत प्रगटली अनंत रूपे गीतामधली
हृदयाहृदयी एकच झाली ते गीतच जीवन बनले रे ॥७॥

## महत्वाचे...



### शिवसाम्राज्य प्रतिष्ठानचा वर्धापनदिन उत्साहात

**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

शिवसाम्राज्य सामाजिक प्रतिष्ठानचा पाचवा वर्धापनदिन उत्साहात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीचे पूजन करून करण्यात आली. संस्थेने गेल्या पाच वर्षांत केलेल्या उपक्रमांची माहिती यावेळी सादर करण्यात आली. कार्यक्रमात संस्थापक अध्यक्ष दिनेश वरपे, छत्रपती ब्रिगेडचे अध्यक्ष श्याम कदम, अरविंद शेळके, मल्लु सलगरे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी आकाश रेवने, गौरीशंकर वरपे, करण सिद्धगवळी, सुरज हिरेमठ, हरीकांत माडेकर, किरण शिरकुल, रवी सिद्धगवळी, सुमित मंद्रुपकर उपस्थित होते.



### महापालिकेच्या वतीने संतश्री बुरुड केतेश्वर महाराज यांना अभिवादन

**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

महानगरपालिकेच्या वतीने संतश्री बुरुड केतेश्वर महाराज जयंती दिनानिमित्त कौन्सिल हॉल येथील आयुक्त यांच्या कार्यालयात संतश्री बुरुड केतेश्वर महाराज यांच्या प्रतिमेस उपायुक्त आशिष लोकरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी अजितकुमार खानसोळे, नागनाथ सुरवसे, युवराज सुरवसे, संजय वडतिले, अरुण साळुंखे, मारुती साळुंखे, परमेश्वर वडतिले, दशरथ वडतीले, पंडित वडतीले, कृष्णकुमार कुकडे, शिवानंद वडतिले, कृष्णांत साळुंखे, संतोष वडतिले, योगेश वडतीले, विष्णू साळुंखे उपस्थित होते.



### खमितकर विद्यामंदिरचे स्नेहसंमेलन उत्साहात

**सोलापूर, दि. ११ डिसेंबर-**

श्री. ल.अ.खमितकर विद्यामंदिरचे वार्षिक स्नेहसंमेलन हुतात्मा स्मृती मंदिर येथे संपन्न झाला. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून संस्थेचे अध्यक्ष सूर्यकांत शहा व संस्थेचे सचिव अजितनाथ उपाध्ये उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून श्री. स्वामी समर्थ अन्नछत्र, अक्कलकोटचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सिव्हिल इंजिनियर प्रतिक कांबळे ,णमोकार तिर्थ ट्रस्ट अक्कलकोटचे राहुल आळंद, केंद्रप्रमुख वाघमोडे, संस्थेचे विश्वस्त सुशिला उपाध्ये, देवेंद्र शटगार, मुख्याध्यापक रमेश यादवाड, मुख्याध्यापिका दर्शना उपाध्ये उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते नटराज मूर्ती पूजन, दीपप्रज्वलन व फीत कापून या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांचे विद्यामंदिरच्या वतीने शाल बुके व फेटा बांधून स्वागत सत्कार करण्यात आला. स्नेहसंमेलनात विद्यामंदिरचे विद्यार्थी शिवबा राजे, राधाकृष्ण गीत, सिंदूर ऑपरेशन, कोळी गीत, पंजाबी गीत, नारीशक्ती, मोबाईल थीम, रामायण इ.चे सादरीकरण करून उपस्थितांचे मने जिंकले. या स्नेहसंमेलनास प्र. मुख्याध्यापिका प्रतिभा शटगार उपस्थित होते. सूत्रसंचालन हर्षदा सुपाते तर आभार आरती उपाध्ये यांनी मानले.



### शिवसेना ओबीसी सेल उपाजिल्हाप्रमुखपदी रमजान शेख

**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

शिवसेना सोलापूर शहर-जिल्हा कार्यालय येथे मौजे तळे हिप्परगा येथील वडार समाजाचे प्रमुख इरप्पा चव्हाण व त्यांच्या कार्यकर्त्यांनी शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांच्या हस्ते जाहीर प्रवेश केला. याप्रसंगी अमोल शिंदे यांनी त्यांचे स्वागत केले. शिवसैनिक रमजान शेख यांची ओबीसी सेल उपाजिल्हाप्रमुख पदी निवड करण्यात आली. याप्रसंगी उपजिल्हाप्रमुख तुकाराम मस्के, तालुका प्रमुख राजकुमार शिंदे, ओबीसी सेल जिल्हाप्रमुख प्रभाकर गायकवाड, ओबीसी सेल महिला जिल्हाप्रमुख कृष्णा बिरादार, ओबीसी सेल तालुकाप्रमुख कुमार धुमाळ, समर्थ मोटे, राष्ट्रीय कर्मचारी सेनेचे शरद काटे, हिप्परगा शाखाप्रमुख नागेश माने, विठ्ठल ननवरे, अनिल अलकुंटे, ओंकार भोसले, केशव धुमाळ, रमेश जाधव उपस्थित होते.



### महापालिकेच्या वतीने डॉ. कृ. भि.अंत्रोळीकर यांना अभिवादन

**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने डॉ. कृ. भि. अंत्रोळीकर यांच्या जयंती दिनी दत्त चौक येथील डॉ. कृ. भि. अंत्रोळीकर यांच्या पुतळ्यास विभागीय अधिकारी विजय लोखंडे व महापालिकेचे कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी अजितकुमार खानसोळे, यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी जनसंपर्क अधिकारी गणेश बिराजदार, मोहन अंत्रोळीकर उपस्थित होते.

# सर्वसामान्यांसाठी आरोग्यसेवा सुलभ करणे ही काळाची गरज

## आमदार सुभाष देशमुख; ‘लोकमंगल संजीवनी मेडिकल’चे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

जुळे सोलापूर परिसरातील मोठा आधार ठरणाऱ्या मोफत ‘लोकमंगल संजीवनी मेडिकलचा शुभारंभ आमदार सुभाष देशमुख यांच्या हस्ते उत्साहात पार पडला. सर्वसामान्यांसाठी आरोग्यसेवा सहज उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. समाजाच्या हितासाठी लोकमंगल परिवाराकडून उचललेले हे एक महत्त्वाचे पाऊल आहे, असे देशमुख यांनी स्पष्ट केले.



टाकळीकर मंगल कार्यालयाजवळ सुरू झालेल्या या मोफत मेडिकलच्या उद्घाटन प्रसंगी आरोग्य क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. यामध्ये जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, वस्तू सेवाकर व सीमा शुल्क विभागाचे अधीक्षक महेश देशमुख, डॉ. वैशंपायन स्मृती शा.वै.म.चे अधिष्ठाता डॉ. ऋत्विक जयकर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, श्री. छ. शिवाजी सर्वो पचार रुग्णालयाच्या जनसंपर्क अधिकारी डॉ. अग्रजा वारेकर-चिटणीस, प्रवचनकार डॉ . जयंत करंदीकर, तसेच लोकमंगल फाउंडेशनचे अध्यक्ष श्री. रोहन देशमुख यांचा समावेश होता. यावेळी या उपक्रमास सहकार्य केल्याबद्दल टाकळीकर दांपत्यांचा आमदार सुभाष देशमुख यांनी सत्कार केला या कार्यक्रमाच्या शेवटी अनेक दानशूर व्यक्तींनी या उपक्रमास सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. या उपक्रमाद्वारे गरजू व सामान्य नागरिकांना औषधे आणि प्राथमिक वैद्यकीय सुविधा पूर्णपणे मोफत उपलब्ध होणार आहेत. लोकमंगल परिवाराने आरोग्य सेवेच्या क्षेत्रात सामाजिक बांधिलकी जोपासत केलेल्या या पुढाकाराचे मान्यवरांनी कौतुक केले. कार्यक्रमास लोकमंगलचे कार्यकर्ते आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मोफत मेडिकल सुरू झाल्याने नागरिकांना आता वैद्यकीय मदतीचा एक विश्वासार्ह व मोफत पर्याय उपलब्ध झाला आहे.

## शेटे वस्ती ब्रिज परिसरात महापालिकेची अतिक्रमण विरोधी कारवाई

### पर्यायी मार्गावरील अतिक्रमित २० खोके केले निष्काशीत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

रेल्वे ब्रिज वाहतुकीसाठी बंद केल्याने पर्यायी मार्गावरील अतिक्रमण हटविण्याची मोहीम महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाने आज राबविली. शेटे वस्ती ब्रिज परिसरातील या मार्गावर असलेली अतिक्रमित २० खोके जेसीबीच्या साह्याने जागेवरच निष्काशीत करण्यात आली.



साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक नजीक असलेल्या रेल्वे ब्रिजचे पाडकाम हाती घेण्यात येणार आहे. त्यासाठी या रेल्वे ब्रिजवरील वाहतूक आजपासून बंद करण्यात आली आहे. यादरम्यान, नागरिकांसाठी पर्यायी मार्ग उपलब्ध करण्यात आला आहे. या पर्यायी मार्गावर शेटे वस्ती ब्रिजच्या परिसरामध्ये विविध अपार्टमेंट समोर रस्त्याच्या कडेला रहदारीस अडथळा ठरणारी खोकी होती. अशी एकूण पंधरा ते वीस अतिक्रमित खोकी आज अतिक्रमण प्रतिबंधक पथकाने जेसीबीच्या साह्याने निष्काशीत केली. या परिसरात केदारनाथ अपार्टमेंट, खमितकर अपार्टमेंटसमोरील रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यात आले. पोलीस बंदोबस्तात ही कारवाई करण्यात आली.

महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार उपअभियंता तपन डंके यांच्या नियंत्रणाखाली आणि महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे अधीक्षक जगन्नाथ बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली. सोलापूर शहरातील नागरिक व व्यवसायिकांनी रस्त्यावर अडथळा ठरेल अशा पद्धतीने अतिक्रमण करू नये. नियमानुसार आपला व्यवसाय करावा अन्यथा कारवाई करण्यात येईल, असा इशारा महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे अधीक्षक जगन्नाथ बनसोडे यांनी दिला आहे.

## बेगम पेठसह शहरात तीन ठिकाणचे अतिक्रमण हटविले

### कारवाईदरम्यान अधिकाऱ्यांसमवेत शाब्दिक चकमक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने आज शहरात बेगम पेठ, मधला मारुती आणि कन्ना चौक परिसरात अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात आली. यामध्ये बेगम पेठेत अतिक्रमण काढत असताना अधिकाऱ्यांबरोबर शाब्दिक चकमक झाली. पोलीस बंदोबस्तात अखेर अतिक्रमण काढण्यात आले.



महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने सोलापुरात रस्त्यावर अडथळा ठरणारी अतिक्रमणे काढण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. दरम्यान, आज गुरुवारी अतिक्रमण विरोधी पथकाने सोलापूर शहरात विविध तीन ठिकाणी अतिक्रमण काढले. सकाळच्या सत्रात

बेगम पेठ येथे कारवाई करण्यात आली. या ठिकाणी शिवसेना कार्यालयाच्या आजूबाजूला असलेले अतिक्रमण काढण्यात आले. त्यानंतर मुतारी पाडून त्या ठिकाणची वडापावची टपरी जेसीबीच्या साह्याने निष्काशीत करण्यात आली. त्यानंतर मधला मारुती येथे कारवाई करण्यात आली. येथील हाराच्या दुकानांसमोर असलेल्या बामट्या व इतर साहित्य काढण्यात आले. त्यानंतर सायंकाळच्या सत्रात कन्ना चौक येथे रस्त्यावर अडथळा ठरणारी बँजो पार्टीची चार चाकी गाडी जप्त करण्यात आली.

या कारवाईत एक चार चाकी हातगाडीही जप्त केली आहे, अशी माहिती महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे अधीक्षक जगन्नाथ बनसोडे यांनी दिली.


महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार उपअभियंता तपन डंके यांच्या नियंत्रणाखाली आणि महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे अधीक्षक जगन्नाथ बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली. सोलापूर शहरातील नागरिक व व्यवसायिकांनी रस्त्यावर अडथळा ठरेल अशा पद्धतीने अतिक्रमण करू नये.

नियमानुसार आपला व्यवसाय करावा अन्यथा कारवाई करण्यात येईल, असा इशारा महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे अधीक्षक जगन्नाथ बनसोडे यांनी दिला आहे.

## आजपासून सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव दिल्लीत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ डिसेंबर-**

सेव्ह कल्चर सेव्ह भारत फाउंडेशनच्या प्रस्तुतीत आणि ‘सनातन संस्थे’च्या वतीने दिल्ली येथील भारत मंडपम येथे १३ व १४ डिसेंबर या कालावधीत सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. सोलापूर जिल्ह्यातून चंद्रकांत रमणशेट्टी, प्रसाद पंडित, उमाकांत चौंडे, चंद्रशेखर वारद, गोपाळ सोमाणी आदी रवाना झाले आहेत. ‘सनातन संस्कृती संवाद’, सांस्कृतिक-सामाजिक घडामोडी, राष्ट्रीय सुरक्षा, दहशतवाद-नक्षलवादाची पार्श्वभूमी, संरक्षणनीती आणि ‘विश्वकल्याणकारी सनातन राष्ट्र’ या विषयांवर विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.



श्रीराम जन्मभूमी न्यासचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेवगिरी महाराज, केंद्रीय पर्यटन व सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंह शेखावत, केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री संजय शेठ, केंद्रीय उर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक, दिल्लीचे सांस्कृतिक मंत्री कपिल मिश्रा, छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज खासदार छत्रपती उदयनराजे भोसले, भारताचे माजी सरन्यायाधीश उदय लळित, संरक्षण तज्ञ संजय अग्रवाल, राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे सदस्य प्रियांक कानुनगो, भारताचे माजी माहिती आयुक्त उदय माहूरकर, डॉ. नरेशपुरी महाराज, सनातन संस्थेच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी बिंदा सिंगबाळ आणि अंजली गाडगीळ, विष्णू शंकर जैन, सुरेश चव्हाणके यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे, असे सांगण्यात आले.

**सोलापुर महानगरपालिका, सोलापुर**
‘इंद्रभुवन’ पुण्यश्लोक अप्पासाहेब वारद पथ,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापुर - ४१३ ००१

**ई निविदा सुचना क्र. ०१**

सोलापूर महानगरपालिका, सोलापूर मधील भुमी व मालमत्ता विभाग अंतर्गत सन २०२५-२६ हुतात्मा स्मृती मंदिर व शुभराय आर्ट गॅलरी इमारत देखभाल व दुरुस्ती व इतर अनुषंगिक अंतर्गत खाली नमुद कामाकरिता ब-१ नमुन्यामध्ये दोन लिफाफा पद्धतीने (ई निविदा पध्दतीच्या) नोंदणीकृत कंत्राटदार अथवा सार्वजनिक बांधकाम विभागाकडील समतुल्य नोंदणीकृत कंत्राटदाराकडून ई निविदा मागविण्यात येत आहे. वरील कामाची निविदा केवळ ई निविदा पद्धतीने सादर करायच्या आहे. निविदेच्या विस्तृत नमुना महाराष्ट्र शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि. १३/१२/२०२५ पासून पाहणेस उपलब्ध आहे.

Tender Id:- 2025_SMC_1259137-1

सही/-
**(आशिष सुमन सुधाकरराव लोकरे)**
उपायुक्त तथा नियंत्रण अधिकारी
भुमी व मालमत्ता कार्यालय, सो.म.पा.

**Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project (www.smart-mh.org)**
**E-TENDER NOTICE NO : 2025_DOAWB_1258065**
**(Supply, Installation, Commissioning and Testing of 4 TPH Fully Automatic rice Mill Machinery)**
The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded SMART Project. **Vidarbha Baliraja Farmer Producer Company Ltd. At – Sakoli, Ta- Sakoli, Dist-Bhandara** is one of the beneficiaries under the project and inviting online bids on **https://mahatenders.gov.in** for above mentioned Machinery. The last date for submission of online bid is **13/01/2026 up to 01.00 PM.** Any updates or notices shall be published on aforementioned website only.
**District Implementation Unit, SMART Project, Dist.: Bhandara**

**हरवले आहे**

आमच्या कै. ज्ञानोबा कादे (दाजी) सार्वजनिक वाचनालय, वाळुज, ता. मोहोळ, जि. सोलापूर नोंदणी क्र. ए फ- ७७२७, सोलापूर आणि महा. १२१६२/२००२ या न्यासाचे हे दोन्ही नोंदणी प्रमाणपत्र मोहोळ तहसिल परीसरात गहाळ झालेले आहे. याबाबत रितसर तक्रार मा. पोलीस निरीक्षक, पोलिस ठाणे, मोहोळ, जि. सोलापूर येथे नोंद केली असून सदर प्रमाणपत्र कोणास मिळाले असतील ते खालील पत्त्यावर देण्याची विनंती आहे.

कै. ज्ञानोबा कादे (दाजी) सार्वजनिक वाचनालय,
वाळुज, ता. मोहोळ, जि. सोलापूर
श्री संदिप श्रीनिवास कादे- सचिव
रा.मु.पो. वाळुज, ता. मोहोळ, जि. सोलापूर
मो. क्र. ९७६३५३४५४५

**सही/-**
**सचिव**
**कै. ज्ञानोबा कादे (दाजी) सार्वजनिक वाचनालय,**
वाळुज, ता. मोहोळ, जि. सोलापूर

**जाहीर नोटीस**

सोलापूरातील तमाम लोकांना विषेशतः सोलापूर शहर हद्दीतील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णनः-** डिस्ट्रिक्ट व सब डिस्ट्रिक्ट सोलापूर पैकी, तालुका उत्तर सोलापूर पैकी, सोलापूर महानगरपालिका हद्दीतील सर्व्हे नंबर ५१०/१, ५१०/२+३, ५११/२ व ५१२ पैकी ‘‘वसंतविहार गुलमोहर’’ टॉवर १ मधील तिसरा मजला फ्लॅट नंबर ३०४ तसेच टॉवर ३ मधील पाचवा मजला फ्लॅट नंबर ५०१ बांधकामासह जागा.

वर नमूद दोन्ही फ्लॅट जागा ही आमचे अशिल विकास श्रीनिवास सोनी, रा. सोलापूर यांचे मालकी व कब्जे वहिवाटीची आहे. आमचे अशिल हे वर नमूद मिळकत पंधे इन्फ्राकॉन्स प्रा.लि. चे डायरेक्टर श्रीमती रोहिणी अनिल पंधे यांचे क.ज.कु.मू. चंदनसिंग रणजितसिंग राठोड यांचेकडून खरेदीने घेतली आहे.

वर नमूद मिळकत टॉवर १ मधील तिसरा मजला फ्लॅट नंबर ३०४ नोंदणीकृत दस्त नं. २१७३ दिनांक २४/०३/२०२१ रोजीचे दस्ताने व टॉवर ३ मधील पाचवा मजला फ्लॅट नंबर ५०१ नोंदणीकृत दस्त नं. २१७५ दिनांक २४/०३/२०२१ रोजीचे दस्ताने कायमस्वरूपी खरेदी घेतलेली आहे. तरी नोंदणीकृत दस्त नं. २१७३ व २१७५ हे दोन्ही दस्त व इतर महत्त्वाची कागदपत्रे बॅग मध्ये घालून सदर बॅग दुचाकीला मागे लावून दिनांक ०७/१२/२०२५ रोजी संध्याकाळी साडेआठचे दरम्यान, नवी पेठ पासून ते सात रस्ता येथे राहत्या घरी येत असताना, गाडीस लावलेली बॅग रस्त्यात कोठेतरी निघून पडली आहे. आमचे अशिल लगेचच त्याचवेळी रात्री व त्यानंतर रोज शोध घेतला, शेवटी कागदपत्राची बॅग आढळून आली नाही, गहाळ झालेली आहे. सदरचे कागदपत्र हे आमचे अशिलाचे अत्यंत महत्त्वाचे कागदपत्र आहेत.

तरी सदर नोंदणीकृत दस्त नं. २१७३ व २१७५ हे दोन्ही खरेदीखत दस्त व इतर महत्त्वाची कागदपत्रे असलेली बॅग कोणास मिळाली असल्यास ती खालील नमूद पत्त्यावर लवकरात लवकर आणून देऊन सहकार्य करावे. याकरिता सदरचे जाहीर प्रसिध्दीकरण करण्यात आले आहे. तारीखः १२/१२/२०२५

**सही/-**
**ॲड. नितिन ना. लोंढे**
**प्लॉट नं. २८, राघवेंद्र नगर, माळी नगर,**
**एमआयडीसी, सोलापूर-४१३००६**
**मो.नं. ९७६४४१०९२१ ७७२०८१८८५९**
**अशील- विकास श्रीनिवास सोनी तर्फे ॲडव्होकेट**

**जाहीर समन्स**

**सोलापूर येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**
**(मा. श्री.ओ.एस.पाटील साहेब)**

रे.मु.नं. २४/२०१९
निशाण क. ३३

**अश्विनी सोमनाथ भोसले** -- **वादी**
**विरूध्द**
सोमनाथ किसन भोसले, वगैरे १२ -- प्रतिवादी

प्रति -
४) **अर्चना आनंद हजारे,** रा. हजारे गल्ली,
रा. मंगळवेढा, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर.
७ क) **सौ. अपर्णा उर्फ अर्पिता ज्ञानेश्वर सुरवसे,**
रा. कोंडी, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर.
१०) **राजशेखर बसवण्णा हरकारे,**
रा. कोंडी, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर.
११) **संतोष शहाजी डिकरे,**
रा. कोंडी, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर.

ज्याअर्थी उपरोक्त वादी यांनी तुमच्या विरूध्द निरंतर ताकीदीचा व सरस निरस मानाने वाटप होऊन मिळण्यासाठीचा दावा या न्यायालयात दावा दाखल केलेला आहे. सदर दाव्याचे संदर्भात आपले म्हणणे मांडण्यासाठी दि. ९/१/२०२६ रोजी मध्यान्ही ११.०० वाजता या न्यायालयात स्वतः अगर वकीलामार्फत हजर होण्यासाठी तुम्हाला बोलावण्यात येत आहे व आपल्या बचावाच्या पुष्टयर्थ तुम्ही ज्यांचा आधार घेऊ इच्छिता असे सर्व दस्तऐवज त्या दिवशी रुजू करण्याचा तुम्हाला आदेश देण्यात येत आहे.

सदर समन्स प्रसिध्द होऊनही आपण गैरहजर राहील्यास तुमच्या गैरहजेरीत दिला जाईल, याची दखल घ्यावी. दाव्याची सुनावणी होऊन निर्णय दिला.

हे जाहीर समन्स आज दि. २८/११/२५ रोजी माझे सहीनिशी व शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे.

**सही/-**
**लिपीक**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**व स्तर सोलापूर**

**जाहीर प्रसिध्दीकरण**

दि.कि.अ.नं. १२९/२०२५
पुढील नेमली तारीखः १७/०१/२०२६
नि. ५

**बार्शी येथील मे. सि. ज. ज्यू. डी. साहेब यांचे कोर्टात**

१) रुक्मिणी कोंडीबा सुतार
वयः५५ वर्षे, धंदाः घरकाम -- **अर्जदार**
राःढोराळे, ता. बार्शी जिः सोलापूर
**विरुद्ध**
**कोणीही नाही** -- **सामनेवाला**

**अर्ज Bombay Regulation VIII प्रमाणे**

ज्या अर्थी अर्जदार यांचे मयत वडील श्री. काशिनाथ विश्वनाथ सुतार यांचा मृत्यू दि २८/११/२०११ रोजी रा. यावली, ता. बार्शी, जि. सोलापूर या ठिकाणी वृद्धापकाळाने मृत्यू झाला आहे. व अर्जदार यांच्या आई श्रीमती मथुरा काशिनाथ सुतार यांचा मृत्यू ता. ०५/०१/२०२१ रोजी मौजे यावली, ता. बार्शी, जि. सोलापूर या ठिकाणी वृद्धापकाळाने मृत्यू झाला आहे. व अर्जदार हे त्यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे त्यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे करिता बार्शी येथील दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर बार्शी येथे अर्जदारांनी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मयत श्री. काशिनाथ विश्वनाथ सुतार व मथुरा काशिनाथ सुतार यांना इतर कोणी वारस नाहीत. असेल तर त्याबाबत काही म्हणणे असल्यास जाहीर प्रसिद्धीकरणापासून ३० दिवसांचे आत अथवा पुढील नेमलेली तारीख १७/१/२०२६ रोजी मे. कोर्टात हजर राहून आपले म्हणणे व हरकत लेखी स्वरुपात पुराव्यानिशी दाखल करावी अन्यथा मुदतीत कोणाचीही हरकत वा म्हणणे आले नाही तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदार यांना अर्जाप्रमाणे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. हे प्रसिद्धीकरण मे. कोर्टाचे सही शिक्क्यानिशी दिले असे. ता. १०/१२/२०२५

**सही/-**
**कनिष्ठ लिपिक**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर,**
**बार्शी. ता बार्शी, जि. सोलापूर**

**जाहीर प्रसिध्दीकरण**

दि.कि.अ.नं. १०८/२०२५
पुढील नेमली तारीखः ०६/०१/२०२६
नि. ५

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ञ ज्यू. डि. सो. यांचे कोर्टात**

१) **संजय श्रीधर काटमोरे,** वय ५६ वर्षे, धंदा- शेती,
रा. पिंपरी, (पा), ता. बाशी, जि. सोलापूर
२) **रुपाबाई श्रीधर काटमोरे,** वय-७५ वर्षे,
धंदा-घरकाम, रा. सदर -- **अर्जदार**
३) **सुजाता भास्कर काशिद,** वय-७५ वर्षे,
धंदा-घरकाम, रा. सदर
४) **संगीता राजकुमार भड,** वय-५० वर्षे,
धंदा-घरकाम, रा. गौडगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर
**विरुध्द**
**कोणीही नाही** -- **सा.वाला**

**ज्याअर्थी,** यातील अर्जदार नं. १, ३ ते ४ यांचे वडिल व अर्जदार नं. २ चे पती मयत श्रीधर सुब्राव काटमोरे यांचे दि. २७/०४/२०२१ रोजी कोव्हीड १९ मुळे बार्शी येथील रुग्णालयात मृत्यु झाला आहे. सदर मृत्युची नोंद बार्शी नगरपालिकेत झालेली आहे. मयत श्रीधर सुब्राव काटमोरे हे सेवानिवृत्त ग्रामविकास अधिकारी होते व त्यांचे बँक ऑफ इंडिया शाखा पानगाव येथे सेव्हींग खाते होते. त्याचा खाते नं. ०७२५१०११०००३१६९ असा आहे. सदर सेव्हींग खात्यामध्ये र.रु. ६९,१३१/- रुपये आहे. सदर रक्कम यातील अर्जदारांना बँक मॅनेजर यांना दि. १०/०७/२०२५ रोजी मागितले असता त्याने अर्जदारांना तुम्ही मयत श्रीधर सुव्राव काटमोरे यांचे अर्जदार कायदेशीर वारस असल्याने त्याचे वारस प्रमाणपत्र मागितले व ते मे. कोर्टातुन आणण्यास सांगितले आहे. त्यामुळे सदरचा अर्ज दाखल केलेला आहे..

त्या अर्थी सदर अर्जदार यांचे व्यतिरीक्त मयत श्रीधर सुनाव काटमोरे यांचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क हित संबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रसिध्दी करणापासून ३० दिवसाचे आत किंवा नेमली ता. ०६/०१/२०२६ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही. तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल. हे जाहिर प्रसिध्दीकरण कोर्टाचे सही शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे दि. १८/११/२०२५

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय**
**क स्तर बार्शी**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**क स्तर बार्शी**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### पंतप्रधानांनी केले ज्युनियर पुरुष हॉकी संघाचे अभिनंदन

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय ज्युनियर पुरुष हॉकी संघाचे एफआयएच हॉकी पुरुष



ज्युनियर विश्वचषक २०२५ मध्ये इतिहास रचल्याबद्दल अभिनंदन केले. या प्रतिष्ठित जागतिक स्पर्धेत भारताने पहिले कांस्यपदक जिंकल्याबद्दल पंतप्रधानांनी तरुण आणि उत्साही संघाचे कौतुक केले. ते म्हणाले की, ही उल्लेखनीय कामगिरी भारताच्या तरुणांची प्रतिभा, दृढनिश्चय आणि चिकाटी दर्शवते. एक्सवरील एका पोस्टमध्ये नरेंद्र मोदी यांनी म्हटले की, एफआयएच हॉकी पुरुष ज्युनियर विश्वचषक २०२५ मध्ये इतिहास रचल्याबद्दल आमच्या ज्युनियर पुरुष हॉकी संघाचे अभिनंदन! आमच्या तरुण आणि उत्साही संघाने या प्रतिष्ठित स्पर्धेत भारताचे पहिले कांस्यपदक जिंकले आहे. ही उल्लेखनीय कामगिरी देशभरातील असंख्य तरुण खेळाडूंना प्रेरणा देते.

### तुषार आवताडे याची राष्ट्रीय योगासन स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

येथील तुषार रमेश अवताडे यांची वेल्स विद्यापीठ चेन्नई (तामिळनाडू) येथे १८ ते २२ डिसेंबर दरम्यान होणाऱ्या



अखिल भारतीय आंतर विद्यापीठ योगासन स्पर्धेसाठी निवड झाली. तुषारची सलग सहावे वर्षी ही निवड झाली. तुषारने केंद्रीय आयुष मंत्रालयाच्या योगा वेलनेस इंस्ट्रक्टर या परीक्षेत यश संपादन केले आहे. तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातून योग शिक्षक पदविका संपादन केली आहे. तुषारने सोलापूर शहरात विविध भागात नि:शुल्क योगासन शिबिरे घेत योगाचा प्रचार प्रसार केला आहे. तुषारला जागतिक योगासन खेळाडू प्रा. तृप्ती आवताडेंचे मार्गदर्शन लाभत आहे.



### सांगोला महाविद्यालयाच्या राजमानेला ब्राँझ पदक

**सांगोला, दि. १२ डिसेंबर-**

जयपुर, राजस्थान येथे नुकत्याच झालेल्या खेलो इंडिया स्पर्धेत सांगोला महाविद्यालयाची विद्यार्थिनी किरण राजमाने हिने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करुन १० मीटर एअर रायफल स्पर्धेमध्ये ब्राँझ पदक मिळवले. या यशाबदद्ल संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड, उपाध्यक्ष तात्यासाहेब केदार व प्रा.पी.सी.झपके, खजिनदार नागेश गुळमिरे, सचिव ॲड. उदयबापू घोंगडे, सहसचिव साहेबराव ढेकळे तसेच खेळाडूस मार्गदर्शन करणारे प्र.प्राचार्य डॉ.सुरेश भोसले व क्रीडा शिक्षक प्रा.जगदीश चेडे यांनी खेळाडूचे सन्मान करून अभिनंदन केले.

### जलतरण तलावासाठी केलेली शुल्कवाढ मागे घ्यावी; अन्यथा आंदोलन

**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

महापालिका जलतरण तलावाच्या शुल्कामध्ये करण्यात आलेली अन्यायकारक व भरमसाठ वाढ आहे. ती तात्काळ मागे घेण्यात यावी, अशा मागणी माजी उपमहापौर राजेश काळे यांनी महापालिका आयुक्तांनी केली आहे. महानगरपालिका प्रशासनाच्या माध्यमातून जलतरण तलावाच्या शुल्कामध्ये नुकतीच केलेली दरवाढ ही नागरिकांच्या दृष्टीने अवाजवी, धक्कादायक व अन्यायकारक आहे. पूर्वी मासिक शुल्क रु. १ हजार व वार्षिक शुल्क रु. ८ हजार असताना आता मासिक रु. २ हजार व दैनिक रु. २०० इतकी दुप्पट दरवाढ करण्यात आली असून वार्षिक शुल्क सुविधा पूर्णतः बंद केले आहे. जलतरण हा केवळ छंद नसून आरोग्य, शिस्त व व्यसनमुक्त जीवनशैलीसाठीचा आधारस्तंभ आहे. विद्यार्थी, युवक, ज्येष्ठ नागरिक आणि खेळाडूंना जलतरणापासून दूर लोटणारी अशी धोरणे भविष्यात मोठ्या परिणामांस कारणीभूत ठरू शकतात. तरीही तात्काळ फेरविचार करून वाढविलेले शुल्क त्वरित मागे घ्यावे. अन्यथा सोलापूर शहरातील नागरिक व जलतरणपटू संघटना आंदोलन करतील असा इशारा या निवेदनात देण्यात आला आहे.

# सूर्यवंशीच्या विक्रमी खेळीने भारताचा दणदणीत विजय

**सामनावीर वैभवच्या ९५ चेंडूंत तडाखेबंद १७१ धावा ● यूएईचा २३४ धावांनी दारुण पराभव**

◆ **दुबई, १२ डिसेंबर**

अल्पावधीत आपल्या तडाखेबंद फलंदाजीने क्रिकेट रसिकांचा चाहता झालेल्या वैभव सूर्यवंशीच्या ९५ चेंडूत १७१ धावांच्या खेळीमुळे भारताने १९ वर्षांखालील एकदिवसीय आशिया कपच्या शुक्रवारी येथे झालेल्या पहिल्या सामन्यात यूएईचा २३४ धावांच्या मोठ्या फरकाने पराभव केला. १४ वर्षीय वैभव सूर्यवंशीने ९ चौकार आणि १४ षटकार मारले. त्यामुळे १९ वर्षांखालील एकदिवसीय क्रिकेटमध्ये एका डावात सर्वाधिक षटकार मारण्याचा विक्रम झाला.

सूर्यवंशीच्या फोटक खेळीव्यतिरिक्त, विहान मल्होत्रा (५५ चेंडूत ६९) आणि आरोन जॉर्ज (७३ चेंडूत ६९) यांच्या अर्धशतकांमुळे भारताने ५० षटकांत ६ बाद ४३३ धावा केल्या. ही भारताची १९ वर्षांखालील एकदिवसीय सामन्यातील सर्वोच्च धावसंख्या आहे आणि आशिया कपच्या इतिहासातीलही सर्वोच्च धावसंख्या आहे. लक्ष्याचा पाठलाग करताना, यूएई संघ कधीही भारताला आव्हान देण्याच्या स्थितीत दिसत नव्हता. पृथ्वी मधू (५०) आणि उद्दीश सुरी (नाबाद ७८) यांच्या अर्धशतकांमुळे संघाने ७ बाद १९९ धावांपर्यंत मजल मारली.



सूर्यवंशीच्या १७१ धावा ही युवा एकदिवसीय सामन्यात भारतीय खेळाडूंकडून दुसऱ्या क्रमांकाची सर्वोच्च धावसंख्या आहे. हा विक्रम अंबाती रायुडूच्या नावावर आहे. त्याने २००२ मध्ये इंग्लंडविरुद्ध नाबाद १७७ धावा केल्या होत्या. १९ वर्षांखालील एकदिवसीय सामन्यात ही नववी सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्या आहे.

प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित करण्यात आलेल्या सूर्यवंशीने यूएई गोलंदाजांना अक्षरशः फोडून काढले. त्याने ३० चेंडूत आपले अर्धशतक आणि नंतर आपले शतक पूर्ण केले. त्याने आरोन जॉर्जसोबत दुसऱ्या गड्यासाठी २१२ धावांची भागीदारी केली. ३३ व्या षटकात फिरकी गोलंदाज सुरीने त्याला बाद केले. तो बाद झाल्यानंतर, मधल्या फळीने आपला वेग कायम ठेवला. वेदांत त्रिवेदी (३४ चेंडूत ३८), अभिज्ञान कुंडू (१७ चेंडूत नाबाद ३२) आणि कनिष्क चौहान (१२ चेंडूत २८) यांनी धावांचा वेग कायम ठेवला आणि भारताला ४०० धावांचा टप्पा ओलांडून दिला.

लक्ष्याचा पाठलाग करताना, यूएईने ५३ धावांत सहा गडी गमावले. त्यानंतर सुरी आणि मधू यांनी १४४ चेंडूत सातव्या गड्यासाठी ८५ धावांची भागीदारी करून पराभवाचे अंतर कमी केले. सुरीने एक टोक सांभाळून ठेवले होते. भारताकडून नऊ खेळाडूंनी गोलंदाजी केली. भारताकडून किशन सिंह, हेनिल पटेल, खिलेन पटेल आणि विहान मल्होत्राने प्रत्येकी १ आणि दीपेश देवेंद्रनने दोन गडी बाद केले. ◂(वृत्तसंस्था)

### सर्वांत तरुण फलंदाज

वैभव सूर्यवंशीने युवा एकदिवसीय सामन्यात भारतासाठी दुसऱ्या क्रमांकाची सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्या केली. गेल्या महिन्यात, दोहा येथे झालेल्या रायझिंग स्टार्स आशिया कपमध्ये, सूर्यवंशीने ४२ चेंडूत १४४ धावा केल्या, जे टी-२० मध्ये भारतीय संघाचे संयुक्त तिसरे सर्वात जलद शतक होते. सूर्यवंशी पुढील महिन्यात नामिबिया आणि झिम्बाब्वे येथे होणाऱ्या १९ वर्षांखालील विश्वचषकासाठी निश्चित मानला जात आहे. त्याने अलिकडेच सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये ६१ चेंडूत १०८ धावा केल्या आणि स्पर्धेच्या इतिहासात शतक करणारा दुसरा सर्वांत तरुण फलंदाज (१४ वर्षांचा) ठरला.

# शुभमन गिलने मुक्तपणे खेळावे

**सहायक प्रशिक्षक टेन डोइशेटचे मत**

◆ **मुल्लानपूर, १२ डिसेंबर**

स्टार फलंदाज शुभमन गिलने टी-२० क्रिकेटमध्ये पुनरागमन केल्यापासून खूप दबावात आहे आणि संघाला असे वाटते की त्याने आयपीएलसारखी मुक्तपणे फलंदाजी करावी, असे मत भारतीय संघाचे सहायक प्रशिक्षक रायन टेन डोइशेट यांनी व्यक्त केले.

गिल सप्टेंबरमध्ये आशिया कपमध्ये टी-२० संघात परतला. त्याने टॉप ऑर्डरमध्ये संजू सॅमसनची जागा घेतली होती, परंतु त्याला धावा करण्यात संघर्ष करावा लागला आहे. त्यामुळे पुढील वर्षी फेब्रुवारी-मार्चमध्ये होणाऱ्या टी-२० विश्वचषकापूर्वी संघातील त्याच्या स्थानाबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दुसऱ्या टी-२० सामन्यात भारताच्या पराभवानंतर, टेन डोइशेटने पत्रकारांना सांगितले की गिलला सर्वात लहान स्वरूपात थोडे अधिक आरामदायी होण्याची आवश्यकता आहे आणि गेल्या महिन्यात ऑस्ट्रेलिया दौऱ्याच्या शेवटी त्याने याची चिन्हे दाखवली.



इंग्लंडमध्ये त्याने ज्या पद्धतीने कर्णधारपद स्वीकारले आणि ज्या पद्धतीने त्याने आघाडीवरून नेतृत्व केले त्यावरून टी-२० संघासाठी त्याच्या हेतूंमध्ये काही प्रमाणात फरक पडतो, असे टेन डोइशेट यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले, काहीही असले तरी, तो थोडा जास्त काळजी घेणारा आहे आणि कदाचित त्याच्या भूमिकेत थोडा जास्तच कडक आहे. ऑस्ट्रेलिया दौऱ्याच्या शेवटी, आम्ही ती जबाबदारी कमी करण्याबद्दल आणि मोकळेपणाने खेळण्याबद्दल चर्चा केली. विशेषतः अशा भूमिकेत जिथे तुम्हाला वाटते की तुम्हाला संघातील तुमचे स्थान योग्य ठरवण्याची आवश्यकता आहे.

आम्हाला त्याने असे करायचे नाही. आयपीएलमध्ये तो जितक्या मुक्तपणे खेळला तितक्याच मुक्तपणे त्याने खेळावे. आम्हाला त्याच्या प्रतिभेवर विश्वास आहे आणि आम्हाला विश्वास आहे की तो चांगली कामगिरी करेल. सूर्यकुमार यादवबद्दलही हेच आहे. टेन डोईनेट यांनी सूयकुमार यादवचे समर्थन केले, जो गेल्या वर्षी कर्णधारपद स्वीकारल्यापासून सातत्याने कामगिरी करत नाही आहे. सूर्यकुमार हा एक उत्तम खेळाडू आहे आणि त्याच्यासारख्या खेळाडूंकडून आम्हाला खूप अपेक्षा आहेत. जर तुम्ही भारतासाठी तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करणार असाल तर धावा काढण्याचा दबाव जाणवणे स्वाभाविक आहे. ◂(वृत्तसंस्था)



# श्री चतुरबाई श्राविका विद्यालयात वार्षिक क्रीडा सप्ताहास सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

श्री चतुरबाई श्राविका प्राथमिक विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी वार्षिक क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन अत्यंत उत्साही वातावरणात झाले.

याचे उद्घाटन म.न.पा प्राथमिक शिक्षण मंडळ प्रशासनाधिकारी मल्हारी माने, जि. प. माध्यमिकचे उपशिक्षणाधिकारी सुरेश वाघमारे, पोलिस उपनिरीक्षक नागेश येळ्ळे, पोलीस उपनिरीक्षक श्री. भोसले, पोलिस अंमलदार अनिता मोरे यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी संस्थेचे विश्वस्त देवई शहा मुख्याध्यापिका देशमाने, बालमंदिर विभाग मुख्याध्यापिका सौ काटकर, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य उपस्थित होते. प्रथम इयत्ता चौथीच्या विद्यार्थिनींनी औक्षण करून व सुंदर स्वागत गीताने व नृत्याने पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन क्रीडा साहित्य पूजन व मशाल पेटवून करण्यात आली यानंतर विद्यार्थ्यांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने संचलन केले आणि पाहुण्यांना सलामी दिली.

शाळेच्या क्रीडांगणावर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते फुगे सोडण्यात आले. या उद्घाटन सोहळ्यामध्ये विद्यार्थ्यांनी सूर्यनमस्कार देशभक्ती नृत्य मानवी मनोरे लेझीम सादरीकरण केले. तसेच रिबीन कवायत ,पिंगपाँग कवायत, कमळ फुल कवायत, बांबू कवायत ,डंबेल्स कवायत, बॉल कवायत ,रिंग कवायत ,अम्ब्रेला कवायत व घुंगुरकाटी कवायत अशा विविध ससाहित्य संगीतकवायत प्रकार सादर केले.



### सन्मान दिव्यांगांचा

**सोलापूर :** नुकत्याच झालेल्या दिव्यांगाच्या पहिल्या विश्वकरंडक टी-२० क्रिकेट स्पर्धेतील विजेती दृष्टिहीन क्रिकेटपटू गंगा कदम व तिचे प्रशिक्षक राज शेळके यांचा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# विद्यापीठ बास्केटबॉल संघात सोशलचे तिघे

**राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवात सहभाग**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ डिसेंबर-**

सोलापूर विद्यापीठ बास्केबॉल संघात सोशल महाविद्यालयाच्या तिघांची निवड झाली. मोईन सय्यद, मोहम्मद दानिश शेख व ऊसेफ नगार या तीन खेळाडूंची निवड करण्यात आली.

रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य क्रीडा महोत्सव बास्केटबॉल स्पर्धेत हे सहभागी झाले होते. त्यांना शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक डॉ.मुश्ताक शेख व तलहा शेख यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे प्रभारी प्राचार्य डॉ.आय.जे.तांबोळी आदींनी अभिनंदन केले.



# महाराष्ट्र सॉफ्ट टेनिस संघात सोलापूरच्या ५ खेळाडूंचा समावेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

शालेय महाराष्ट्र सॉफ्ट टेनिस संघात येथील पाच खेळाडूंची १४ व १७ वर्षाखाली गटात निवड झाली. तनुज संचेती (केएलई इंग्लिश मीडियम स्कूल), आर्य पवार (मेहता प्रशाला), ऋषिकेश चव्हाण(लिटल फ्लॉवर कॉन्व्हेंट स्कूल), मृण्मयी गायकवाड (ऑर्किड इंग्लिश मीडियम स्कूल) व विपश्यना सोनवणे (शांती इंग्लिश स्कूल) हे निवड झालेले खेळाडू आहेत.

देवास (मध्य प्रदेश) येथे ११ ते १४ डिसेंबर दरम्यान सुरू असलेल्या शालेय राष्ट्रीय सॉफ्ट टेनिस स्पर्धेत ते सहभागी झाले आहेत. बारामती येथे झालेल्या शालेय राज्य स्पर्धेत १४ वर्षाखालीगटात एकेरीत तनुज संचेतीने सुवर्ण, आर्य पवारने रौप्य तर ऋषीकेश चव्हाणने कास्य पटकावले.

१४ वर्षाखालील मुलीच्या गटात मृण्मयी गायकवाडने रौप्य संपादिले. तसेच १७ वर्षाखालील मुलींच्या गटात विपश्यना सोनवणेने रौप्य पटकाविले. या स्पर्धेत पुणे विभागाच्या संघाने १४ वर्षाखालील मुला मुलींच्या संघाने सुवर्ण तर १७ वर्षाखालील मुलांच्या संघाने कास्य तर मुलींच्या संघाने रौप्य पदक प्राप्त केले. त्यांना सुधीर सालगुडे महेश झांबरे, शिवाजी वसपटे, अक्षय गवळी, पूजा सालगुडे, बालाजी केदार, चंद्रकांत वाघमोडे व गणेश बंडगर यांचे मार्गदर्शन लाभले.

त्यांचे संघटनेचे अध्यक्ष सिद्धेश्वर पाटील, सचिव प्राध्यापक संतोष गवळी, राज्य लॉन टेनिस मानद सचिव राजीव देसाई, सहसचिव शिवाजी वसपटे यांनी अभिनंदन केले .

# क्रीडा आरोग्यमय जीवनाचा आधार : मोहन डांगरे



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ डिसेंबर-**

दयानंद काशिनाथ आसावा प्रशालेत आयोजित वार्षिक शालेय क्रीडा महोत्सव स्पर्धेला उत्साहपूर्ण प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाची सुरुवात हँडबॉल मैदानाचे पूजन करून झाली.

दिवसभर क्रीडा प्रकारात हँडबॉल, सॉफ्टबॉल, डॉजबॉल, १०० मीटर धावणे या स्पर्धा उत्साहात पार पडल्या. यांचे उद्घाटन आई प्रतिष्ठान अध्यक्ष मोहन डांगरे यांनी केले. ते म्हणाले, जिंकणे किंवा हरणे हा खेळाचा एक भाग आहे पण प्रत्येक स्पर्धकाने प्रामाणिकपणे केलेला प्रयत्न हा खरा विजय असतो. मुख्याध्यापक संतोष हंपे यांनी मार्गदर्शन केले. क्रीडाशिक्षक प्रमोद कुनगुलवार व क्रीडाशिक्षिका मनीषा पाटील यांनी स्पर्धा पार पाडल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लक्ष्मण जगताप सर यांनी केले.

# तामिळनाडूच्या लक्ष्मी अरुणकुमार हिला दुहेरी मुकुट

**एमएसएलटीए एआयटीए महिलांच्या राष्ट्रीय मानांकन लॉन टेनिस स्पर्धा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ डिसेंबर-**

सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेने (एसडीएलटीए) यांच्या वतीने आयोजित व महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना पुरस्कृत व अखिल भारतीय लॉन टेनिस संघटनेच्या अधिपत्याखाली महिलांच्या १ लाख बक्षीस रकमेच्या राष्ट्रीय मानांकन लॉन टेनिस (एकेरी व दुहेरी) स्पर्धेत तामिळनाडूच्या लक्ष्मी अरुणकुमार हिने एकेरी व दुहेरी या दोन्ही गटात विजेतेपद पटकावत दुहेरी मुकुट संपादन केला.

जिल्हा क्रीडा संकुल येथील एम.एस.एल.टी.ए टेनिस सेंटरच्या मैदानावर पार पडलेल्या या स्पर्धेत एकेरीत अंतिम फेरीत आठव्या मानांकित तामिळनाडूच्या लक्ष्मी अरुणकुमारने सातव्या मानांकित आंध्रप्रदेशच्या रेश्मा छल्लारापूचा ६-२, ७-६(९-७) असा पराभव करून विजेतेपद पटकावले. हा सामना १तास ३०मिनिटे चालला. पहिल्या सेटमध्ये लक्ष्मीने रेश्माची सहाव्या गेममध्ये सर्व्हिस रोखली व हा सेट ६-२ असा जिंकून विजेतपदाच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकले. दुसऱ्या सेटमध्ये पिछाडीवर असलेल्या रेश्माने जोरदार खेळ केला.



या सेटमध्ये दोन्ही खेळाडूंनी आपापल्या सर्व्हिस राखल्या. त्यामुळे हा सेट टायब्रेकमध्ये गेला. टायब्रेकमध्ये लक्ष्मीने आपला खेळ उंचावत हा सेट रेश्मा विरुद्ध ७-६(९-७) असा जिंकून विजेतपदावर आपले नाव कोरले. स्पर्धेतील विजेत्या खेळाडूला करंडक व १२,५००रुपये, तर उपविजेत्या खेळाडूला करंडक व ८४००रुपये अशी पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण टेनिसपटू डॉ. राजश्री मेरू यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी आंतरराष्ट्रीय टेनिसपटू संध्याराणी बंडगर, एमएसएलटीएचे मानद सह सचिव राजीव देसाई, स्पर्धा निरीक्षक प्रवीण झिटे आदी मान्यवर उपस्थित होते.

# सोलापूरचे किशोर व किशोरी संघ जाहीर

**किशोर संघाचे शिबिर वेळापूरला, किशोरीचे सोलापुरात**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ डिसेंबर-**

वीट(ता. करमाळा) येथे झालेल्या जिल्हा अजिंक्यपद खो-खो स्पर्धेतून सोलापूर जिल्ह्याचे किशोर व किशोरी संघ सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनचे सचिव उमाकांत गायकवाड यांनी जाहीर केले.

हे संघ निवड समिती सदस्य सुरेश खुर्द-भोसले, श्रीरंग बनसोडे, दादासाहेब बर्डे व अजित बनकर या निवड समिती सदस्यांनी निवडले. या संघाचे स्पर्धापूर्व प्रशिक्षण शिबिर किशोर गटाचे लोकविकास विद्यालय वेळापूर (ता. माळशिरस) व किशोरी गटाचे शिबिर ह. दे. प्रशालेच्या मैदानावर १७ डिसेंबरपासून सुरु होईल. निवडलेल्या किशोर खेळाडूंनी अजित बनकर (मो. ८६०५३१८३७६) व किशोरींनी सुनील चव्हाण (मो.७५८८७९७३६५) यांच्याकडे १७ डिसेंबरला सायंकाळी पाच वाजेपर्यंत उपस्थिती नोंदवावी. जे खेळाडू उपस्थिती नोंदविणार नाहीत. त्यानंतर राखीव खेळाडूंना संधी देण्यात येईल याची नोंद घ्यावी, असे श्री. गायकवाड यांनी कळविले आहे.

**संघ : किशोर :** संस्कार उपासे, यश खेडेकर, वेदांत भोसले, पवन जाधव (आदर्श, शेवते, ता. पंढरपूर), तुषार कोरे, चन्नवीर मंठूर, विनायक स्वामी (ए.एम.डोणज, मंगळवेढा), स्वप्नील गुंड



(खंडोबाची वाडी, मोहोळ), प्रीतम पवार (दिनबंधू मंद्रूप), सार्थक साळुंके (उत्कर्ष), आदित्य ढेरे, सार्थक ढेरे (न्यू सोलापूर), यश बनसोडे, यश कदम (लोकविकास वेळापूर), श्रेयश जाधव (मरवेड, मंगळवेढा).

**किशोरी :** ऋतूजा सुरवसे, कार्तिकी यलमार, समृद्धी यलमार, श्रेया यलमार, भक्ती चौधरी (कल्याणराव काळे स्पोर्टस् क्लब वाडीकुरोली, पंढरपूर), अमृता ढेरे, आसावरी जाधव, आर्या काळे, प्रतीक्षा कांबळे (न्यू सोलापूर क्लब), राधिका कोळवले, अनुराधा देशमुख (अजनाळे), पवित्रा नागलगाव, अक्षता गंगोडा (समृद्धी स्पोर्टस्, सोलापूर), रिया चव्हाण (उत्कर्ष,सोलापूर), गौरी शिंगण(शाहू स्पोर्टस्).

# ऊस दराबाबत शेतकरी संघटनेचे उपोषण, तीन ते चार जणांची प्रकृती खालावत चालली



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १२ डिसेंबर-**
तालुक्यातील वाखरी येथे सुरु असलेल्या उसदरासाठीच्या आंदोलनाचा शुक्रवारी पाचवा दिवस आहे. मात्र अजून देखील सोलापूर जिल्ह्यातील साखर कारखानदारांनी उसदराबाबतची आपली भूमिका जाहीर केलेली नाही. त्यामुळे येथील उपोषणकर्ते तथा शेतकरी संघटनेचे समाधान फाटे यांनी आता आपण उपचार देखील घेणार नाही आहोत. तसेच उसदरा बाबत निर्णय घेतला गेला नाही तर उद्या पासून पाणी देखील वर्ज्य करणार असल्याचा इशारा यावेळी त्यांनी दिला. दरम्यान शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी श्रीपूर येथील पांडुरंग कारखान्याकडे आपला मोर्चा वळविला असून हा कारखाना देखील शेतकऱ्यांनी बंद पाडला आहे.

सोलापूर जिल्ह्यातील ऊसाला प्रतिटन ३ हजार ५०० रुपये दर मिळालाच पाहिजे या मागणीसाठी वाखरी (ता. पंढरपूर) येथील पालखी तळावर गेल्या पाच दिवसांपासून शेतकरी संघटनेचे पदाधिकारी आंदोलन करीत आहेत. जिल्ह्यातील साखरसम्राटांनी तसेच शासनाने हे आंदोलन गांभिर्याने घ्यावे यासाठी वाखरी येथे गुरुवारी (ता.११) रास्ता रोको आंदोलन देखील करण्यात आले. या बरोबरच येथील सिताराम कारखान्यावरील ऊसाच्या गव्हाणीत देखील शेतकरी संघटनेच्या आंदोलकांनी उड्या घेऊन आंदोलन तीव्र केले. मात्र तरी देखील उसदरावर तोडगा काही निघाला नाही. त्यामुळे शेतकरी संघटनेचे पदाधिकारी आणि शेतकऱ्यांनी शुक्रवारी आपला मोर्चा श्रीपूर (ता.माळशिरस) येथील पांडुरंग सहकारी साखर कारखान्याकडे वळविला. त्या ठिकाणी देखील कार्यकर्त्यांनी कारखान्यातील उसाच्या गव्हाणीत उड्या मारुन कारखाना बंद पाडला. यावेळी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी आणि उस उत्पादक शेतकऱ्यांनी चक्क उसाच्या गव्हाणीत ठिय्या मारुन भजन देखील केले.

### सातारा जिल्ह्यात दर मिळतो मग सोलापूर जिल्ह्यात का नाही?

एकीकडे शेजारील सातारा जिल्ह्यातील कारखान्यांना आपल्याच जिल्ह्यातील काही भागातून उस पुरवठा होत आहे. या उसाला ३ हजार ५०० रुपयांचा दर भेट आहे. विशेष म्हणजे या कारखान्यांना ऊस नेत असताना लांबची वाहतूक आहे. मग आपल्या जिल्ह्यातील साखर कारखान्यांना तेवढाच उसदर देण्यासाठी काहीच अडचण असण्याचे कारण नाही असा सवाल देखील उपोषणकर्ते उपस्थित करीत आहेत.

### ...मात्र चर्चेला कोणीच नाही

स्वाभीमानी शेतकरी संघटनेसह इतर सर्व शेतकरी संघटनेने एकत्रितपणे सोलापूर जिल्ह्यातील साखर् कारखान्यांनी उसाला प्रतिटन ३ हजार ५०० रुपये दर मिळावा यासाठी बेमुदत उपोषणाचे हत्यार उपसले आहे. या आंदोलनाचा आज पाचवा दिवस आहे. माढ्याचे आमदार अभिजीत पाटील यांनी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात प्रश्न उपस्थित करुन वाखरी येथे सुरु असलेल्या आंदोलनाकडे शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केलेला आहे. मात्र उसदराची कोंडी अद्याप पर्यंत सुटलेली नाही. जिल्ह्यातील साखर कारखानदार उपोषणकर्त्यांच्या चर्चेसाठी पुढे येत नाहीत.

## महत्वाचे...



## प्रश्नमंजूषा स्पर्धेत केकडे कॉलेज तृतीय

**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**
श्रद्धेय श्रीमान भाऊसाहेब गांधी जन्मशताब्दी महोत्सव २०२५ निमित,वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स अंतर्गत भगवान महावीर अध्ययन केंद्र व श्री भाऊसाहेब गांधी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय अहिंसा तत्त्वज्ञान प्रश्नमंजूषा स्पर्धेत कनिष्ठ महाविद्यालय गटात, मातोश्री गंगुबाई केकडे ज्यु.कॉलेज सोलापूर मधील विज्ञान शाखेतील, स्वाती लोला, स्नेहा सपाटे, नंदिनी बोद्दूल, स्नेहा सामल यांनी तृतीय क्रमांक मिळवला. त्यांना प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह व ६०० रू.रोख बक्षिस म्हणून देण्यात आले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ.सूर्यप्रकाश कोठे, उपाध्यक्ष आ.देवेंद्र कोठे, खजिनदार प्रथमेश कोठे, संस्था सदस्या डॉ. राधिका चिलका, प्राचार्य सतीश मल्लाव, मुख्याध्यापिका तनुजा मारपल्ली,विभाग प्रमुख प्रा. नवनाथ व्हटकर यांनी अभिनंदन केले. सहभागी स्पर्धकांना प्रा.डॉ. प्रशांत चाबुकस्वार यांचे मार्गदर्शन लाभले.



## बोगस मतदारांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी

**अक्कलकोट, दि.१२ डिसेंबर-**
तालुक्यातील सिन्नर येथे बोगस मतदार यादीची छाननी करून बोगस मतदारांवर व बीएलओवर कायदेशीर कारवाई करण्याबाबत तहसीलदार विनायक मगर यांना सिन्नर येथील ग्रामस्थांनी निवेदनद्वारे मागणी केले आहे. अक्कलकोट तालुक्यातील सिन्नर गावातील मतदार याद्यांची पहाणी केली असता अनेक मतदार हे आमच्या गावातील नाहीत. ते परराज्यातील आहेत, त्यांनी निश्चित माहिती आम्हांला देखील नाही. परंतु ते मतदार आमच्या गावातील नाहीत. त्यामुळे भविष्यात आमच्या गावात निवडणूका झाल्यानंतर या बाहेरील मतदार आमच्या गावात येऊन मतदान करण्याची दाट शक्यता आहे, तरी याबाबत योग्य ती चौकशी करून सबंधीत मतदारांवर व छाननी केलेल्या बीएलओवर कायदेशीर कारवाई करण्याचे मागणी राजशेखर हणमंतराव हौदे, शिवलिंगय्या संगय्या पुजारी, जगदिश विठ्ठल उजनी यांनी केली आहे. यावेळी तहसीलदार यांना निवेदन देताना अक्कलकोट शिवसेना तालुका प्रमुख बाबासाहेब पाटील, बसवराज हौदे, राजशेखर हौदे, दत्ता यंकची आदिजण उपस्थित होते.




## अक्कलकोट येथे गोपीनाथ मुंडे यांना श्रध्दांजली

**अक्कलकोट दि. १२ डिसेंबर**
स्व.गोपीनाथ मुंडे अमर रहे रहे! अमर रहे! अशी घोषणा देत अक्कलकोट येथे गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठान वतीने भाजपाचे जेष्ठ नेते मल्लिनाथ स्वामी यांच्या प्रमुख उपस्थित श्रद्धांजली वाहण्यात आला. गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठान संस्थापक अध्यक्ष प्रा. परमेश्वर आरबाळे वतीने अक्कलकोट येथे मंगरूळे बायपास चौकात स्व.गोपीनाथ मुंडे यांना श्रद्धांजली वाहण्यात आला.यावेळी भाजपाचे काशिनाथ गळोरगी, बसवराज बिराजदार, भाजपाचे माजी चिटणीस दयानंद बिडवे,कांबळे, माजी नगरसेवक काशिनाथ घोडके, बिडचे अॅड. नवनाथ धस, अडत व्यापारी विजयकुमार बिराजदार आदी जण उपस्थित होते.

## माढा महाविद्यालयात आयबीपीएस स्पर्धा परीक्षा कार्यशाळा

**माढा, दि. १२ डिसेंबर-**
रयत शिक्षण संस्थेच्या माढा महाविद्यालयात पीएम. उषा योजनेअंतर्गत आय.बी.पी.एस. स्पर्धा परीक्षा कार्यशाळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. सदर कार्यशाळेत डॉ. प्रदीप जगताप, सुकेश पांडे, पारितोष पांडे, डॉ. सुहास शिंदे, प्रा. इलाही तांबोळी तसेच डॉ. शशिकांत गायकवाड यांनी विविध विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्श केले. ही कार्यशाळा अर्थशास्त्र विभाग, वाणिज्य विभाग व रयत स्पर्धा परीक्षा अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली. कार्यशाळेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील हेळकर, प्रा. अशोक लोंढे व डॉ. घनश्याम हराळे यांच्या मार्गदर्शनाखाली पी. एम. उषा समन्वयक डॉ. सतीश घाडगे, प्रा. शुभम चवरे, प्रा. समाधान कदम व प्रा. संकल्प बारबोले यांनी योगदान दिले.

## लक्ष्मीबाई संगा यांचे निधन



**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**
लक्ष्मीबाई कृष्णप्पा संगा (वय ८४) यांचे शुक्रवार दिनांक १२ डिसेंबर रोजी दुपारी २.५० मिनिटांनी आजाराने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा शनिवार दि. १३ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता राहते घर पद्मशाली शिक्षण संस्था हौसिंग सोसायटी येथून निघणार आहे. अंत्यविधी पद्मशाली स्मशानभूमी शांतीधाम येथे होणार आहे. त्या नारायण कुचन प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक पुलकेशी संगा यांच्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## गंभीर गुन्ह्यातील सराईत गुन्हेगार स्थानबध्द; सांगोला पोलिसांची कामगिरी

**सांगोला, दि. १२ डिसेंबर-**
गणेश चंद्रकांत दिघे (रा.वाढेगाव, ता.सांगोला, जि.सोलापूर) याच्या विरुध्द सांगोला पोलीस ठाणे येथे शरीराविषयक, मालाविषयक असे ६ गंभीर गुन्हे दाखल होते. म्हणून त्याच्यावर वारंवार प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली होती. परंतू त्याच्या वर्तनामध्ये कोणत्याही प्रकारची सुधारणा झालेली नसल्यामुळे त्यास स्थानबध्द करण्याची आवश्यकता भासल्याने सांगोला पोलीस ठाणेकडून प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. त्यावर गुरुवार दि.११ डिसेंबर रोजी जिल्हादंडाधिकारी, सोलापुर यांनी स्थानबध्द करुन येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे येथे जमा करणे संदर्भात आदेश निर्गमीत केले होते.

सदर प्राप्त आदेशाप्रमाणे एम.पी.डी.ए कायद्यातील तरतुदी नुसार गणेश दिघे याचा सांगोला पोलीस ठाणेकडील डी.बी. पथकाने त्याच्या राहते घरी शोध घेतला असता तो मिळून आला. त्याला शासकीय वाहनातून शुक्रवार दि.१२ डिसेंबर रोजी मध्यवर्ती कारागृह येरवडा, पुणे येथे दाखल करण्यात आले. सदरची कामगिरी पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर, मंगळवेढा उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.बसवराज शिवपुजे यांच्या मार्गदर्शनाखाली सांगोला पोलीस निरीक्षक विनोद घुगे, पोसई.चंद्रकांत पुजारी, पोहेकॉ.अस्लम काझी, पोहेकॉ. मच्छिंद्र राजगे, पोकॉ.मारुती पांढरे, पोकॉ.राजु आवटे, स्थानिक गुन्हे शाखेचे शाखेचे पोहेकॉ.अनिश शेख यांनी केली.

# भ्रष्टाचार करणारे तलाठी ग्रामसेवक यांची चौकशी करून निलंबित करा

## आमदार राजू खरे यांची हिवाळी अधिवेशनात मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. १२ डिसेंबर-**
मोहोळ तालुक्यातील महावितरणचे लांबोटी सब स्टेशन येथे कार्यरत असणारे ओंकार विष्णू साठे यांच्यासह सीना नदीकाठच्या गावात बोगस नुकसान भरपाई दाखवून भ्रष्टाचार करणारे तलाठी ग्रामसेवक यांची चौकशी करून त्यांना निलंबित करण्यात यावे, अशी मागणी मोहोळचे आमदार राजू खरे यांनी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनामध्ये सभागृहात केली. यामुळे शेतकऱ्यांना त्रास देणारे वीज मंडळाचे अधिकारी आणि तलाठी व ग्रामसेवक यांचे धाबे दणाणले आहेत.

मोहोळचे आमदार राजू खरे भ्रष्टाचाराबाबत सभागृहाचे लक्ष वेधताना म्हणाले की, मोहोळ तालुक्यात सीनानदी काठच्या गावामध्ये आलेल्या सप्टेंबर २०२५ महिन्यात आलेल्या प्रचंड महापुरामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. अशा प्रकारचा पूर गेल्या शंभर वर्षात आला नाही असे ९०ते ९५ वर्षाच्या नागरिकांनी सांगितल्याचे उद्गत करून आमदार खरे म्हणाले की



या नुकसानीमध्ये शेतकऱ्याचे सर्वस्व वाहून गेले. पिके वाहून गेली. घरे घरातील साहित्य वाहून गेले यामुळे या नदीकाठच्या गावात शेतकरी हा पुरता रिकामा झाला आहे. त्या शेतकऱ्याला बळ देण्यासाठी नुकसान भरपाई पोटी शासनाने ३२ हजार कोटी रुपयांचा निधी मंजूर केला त्याबद्दल प्रथमतः सरकारचे अभिनंदन करतो. पुढे बोलताना त्यांनी त्या सरकारी पैशाचा विनीयोग सरकारी बाबू म्हणून काम पाहणारे तलाठी ग्रामसेवक यांनी ज्यांचे काहीही नुकसान झाले नाही अशा शेतकऱ्यांकडून पैसे घेऊन नुकसान दाखवलेले आहे .परंतु ज्यांचे खरेच नुकसान झाले आहे त्यांना शासनाच्या लाभापासून वंचित ठेवलेले आहे. या प्रकरणाची चौकशी करण्यात यावी व फेरपंचनामे करण्यात यावे खऱ्या अर्थाने नुकसान होऊनही केवळ तलाठी आणि ग्रामसेवक यांना पैसे दिले नाहीत म्हणून त्यांचे झालेले नुकसान नोंदीमध्ये घेतले नाही अशा प्रकार नदीकाठच्या

तरटगाव, शिंगोली बुद्रुक टाकळी, गुंजेगाव नांदगाव, लांबोटी अशा दहा ते बारा गावात झाले आहेत.या प्रकरणाची चौकशी करून त्या तलाठी व ग्रामसेवक यांना निलंबित करण्यात यावे.

तसेच पुरामध्ये वाहून गेलेले वीज मंडळाचे डीपी त्वरित सुरू होणे गरजेचे आहे. अद्याप पर्यंत ते काम पूर्ण झाले नाही असते भांबेवाडी लांबोटी अशी बारा गावे लांबोटीच्या अंतर्गत येतात परंतु पूर ओसरल्यापासून अद्याप पर्यंत डीपी उभा करण्याचे काम झाले नाही. लाईटच नसल्यामुळे पिकांना आणि पिण्यासाठी पाणी पाणी यासाठी शेतकऱ्यांचे हाल होत आहेत. परंतु लांबोटी सब स्टेशनचे अधिकारी ओंकार विष्णू साठे हे पुरामध्ये वाहून गेलेले वीज मंडळाचे डीपी बसवण्यासाठी पैशाची मागणी करीत आहेत.२५ ते ३० हजार रुपये जे देतील त्यांचे काम प्राधान्याने केले जात आहे त्यामुळे शेतकऱ्यांना पाण्यासाठी अडचण होत आहे याही प्रकाराकडे लक्ष देण्यात यावे व या पैसे खाणाऱ्या विद्युत मंडळाच्या अभियंत्याला निलंबित करावे अशी मागणी आमदार राजू खरे यांनी सभागृहामध्ये केली. त्याचबरोबर सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्र राजे भोसले यांच्याकडे या मतदारसंघातील पूरग्रस्त भागातील रस्त्यांना निधी द्यावा आणि या लोकांची सुविधा करावी अशी मागणी केली.



## ‘स्वेरी’मध्ये अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटरसाठी नीति आयोगाबरोबर सामंजस्य करार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १२ डिसेंबर -**
येथील स्वेरीमध्ये महाविद्यालया मध्ये ‘अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटर (एसीआयसी) स्थापन करण्याबाबत नीति आयोगासोबत सामंजस्य करार करण्यात आला.

अटल इनोव्हेशन मिशनचे कार्यक्रम प्रमुख प्रतीक देशमुख म्हणाले की, ‘नीती आयोगाच्या माध्यमातून समाजातील समस्या सोडविण्यासाठी इनोव्हेशन सेंटर स्थापीत केले जाणार आहे. याद्वारे आपण समाजातील समस्यांचे निराकरण करत राहू. यासाठी आपले उत्पादन, नवनवीन संकल्पना यांना येथे वाव दिला जाणार आहे.

आपले उत्पादन हे समाजाच्या उन्नतीसाठी व फायद्यासाठी असेल. अशा उत्पादनाच्या निर्मितीला या केंद्राद्वारे प्रेरणा दिली जाईल. सदरचे केंद्र हे अटल इनोव्हेशन मिशन (एआयएम), नीति आयोग, भारत सरकार समर्थित आहे.

यावेळी स्वेरी व एसीआयसी- स्वेरी पंढरपूर अराईज फौंडेशन यांचा नीति आयोग यांच्याबरोबर सामंजस्य करार करण्यात आला. स्वेरीच्या माध्यमातून या केंद्राद्वारे उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी आवश्यक सुविधा व विविध उपक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. या केंद्राची निर्मिती ही संशोधन आणि विकासाचा एक भाग आहे. हे केंद्र विकसित भारत २०४७ च्या वाटचालीत सहाय्यभूत ठरेल.

यावेळी अटल इनोव्हेशन मिशनचे नावीन्यपूर्ण उपक्रम प्रमुख वितस्ता तिवारी, दीपाक्षी जिंदाल, सरपंच पांडुरंग देवमारे, पंढरपूरच्या प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ. स्नेहा रोंगे, सचिव डॉ. सूरज रोंगे आदींसह स्वेरीचे माजी अध्यक्ष आणि विश्वस्त एन.एम.पाटील, धनंजय सालविठ्ठल, एन.एस. कागदे, आर. बी. रिसवडकर, विश्वस्त एच.एम.बागल, बी.डी.रोंगे, विश्वस्त, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार उपस्थित होते.

## पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी मंगळवेढा पोलीस स्टेशनची केली वार्षिक तपासणी



**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा दि. १२ डिसेंबर-**
सोलापूर जिल्हा ग्रामीणचे पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी मंगळवेढा पोलीस स्टेशनला भेट देवून तब्बल ७ तास कसून चौकशी करीत वार्षिक तपासणी केली. दरम्यान प्रारंभी पोलीस अधिक्षकांना पोलीस खात्याच्यावतीने मानवंदना देण्यात आली.

पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी हे गूरूवार सकाळी ११ वाजता पोलीस स्टेशनला दाखल होऊन सायंकाळी ६ पर्यंत यांनी पोलीस स्टेशन परिसर तसेच पोलीस स्टेशन मधील स्वच्छता व निटनेटकेपणा याची पाहणी केली.

या दरम्यान पोलीस स्टेशन मधील वर्षानुवर्षे प्रलंबीत असलेल्या मुद्देमालाची येथील पोलीस अधिकार्यांनी निर्गती केल्याने याबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. पोलीस स्टेशन मध्ये येणार तक्रारदार यांना लवकरात लवकर न्याय मिळावा यासाठी त्यांनी शासनाने नव्याने अंमलात आणलेल्या कायद्यानुसार गुन्ह्याची उकल ३०,६०,९० दिवसात पुर्ण करुन गुन्हे तपास पुर्ण करण्याच्या सुचना केल्या. येथील अभिलेखाची पाहणी करुन काही महत्वाच्या सुचना दिल्या. ज्या अधिकारी व कर्मचार्यांनी उत्कृष्ट काम केले आहे त्यांचे अभिनंदन करुन पुढील कामासा शुभेच्छा दिल्या तर ज्यांनी आपल्याकडील दाखल गुन्हे पेंडींग ठेवले त्यांची मात्र चांगलीच कानउघडणी केली.

सर्व बीट अंमलदारांना गावामध्ये ग्रामसुरक्षा दल कार्यान्वीत करुन गुन्हे नियंत्रण करणेबाबत योग्य ते मार्गदर्शन केले. पोलीस ठाणे हद्दीतील रेकॉर्डवरील गुन्हेगारांना पोलीस स्टेशनला बोलावून त्यांना गुन्हेगारी प्रवृत्तीपासून मन परिवर्तन करण्यासाठी योग्य ते त्यांना मार्गदर्शन केले. पोलीस कर्मचारी यांची बैठक घेवून त्यांच्या अडीअडचणी समजून घेवून निराकारण केले. नव्याने सुरु करण्यात आलेल्या वारंवार होणार्या घरफोड्या,दरोडे,अपघात यावर नियंत्रण ठेवण्यासाठी क्राईम मॅपींग करुन त्यावर नियंत्रण ठेवून जनतेच्या मनामध्ये सुरक्षेची भावना निर्माण करण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनेची माहिती देण्यात आली.

# अधिकारी मनोज राऊतांनी घेतले दिव्यांग विद्यार्थ्यांसमवेत जेवण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**
नुकताच जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी पदाचा पदभार घेतलेले दक्षिण सोलापूरचे गटविकास अधिकारी मनोज राऊत यांनी अचानक करमाळा येथील मुकबधीर शाळेला भेट देऊन चक्क विद्यार्थ्यांसमवेत जेवण केले. साहजिकच राऊत हे सामाजिक जाणिवेच्या नात्याने काम करीत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

जिल्हा दिव्यांग कल्याण सक्षमीकरण अधिकारी पदाचा पदभार घेण्यासाठी कोणी इच्छुक नव्हते तेव्हा

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी पंधरा दिवसांपूर्वी राऊत यांच्याकडे पदभार दिला. राऊत यांनीही या विभागामध्ये सामाजिक जाणिवेच्या नात्याने काम करण्याचे ठरविले. त्यानुसार त्यांनी जिल्ह्यातील दिव्यांग शाळांना भेटी देण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. पूर्वनियोजित भेट न देता अचानक शाळेला भेट देऊन संबंधित शाळेने विद्यार्थ्यांना भौतिक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत का.तिथला शैक्षणिक दर्जा,आहाराचा दर्जा कसा आहे, विद्यार्थ्यांची उपस्थिती किती आहे,या बाबी ते कटाक्षाने पाहत आहेत. दोन दिवसांसाठी करमाळा गट विकास अधिकारी पदाचा पदभार राऊत यांच्याकडे होता.तेव्हा गुरुवारी सायंकाळी सहा वाजता करमाळा देवीचा माळ येथील कमला भवानी मुकबधीर शाळेला अचानक भेट दिली.तेव्हा विद्यार्थी जेवण करीत असल्याचे त्यांनी पाहिले. मी अधिकारी आहे,हा विचार बाजूला ठेवून ते देखील विद्यार्थ्यांच्या रांगेत बसले आणि जे विद्यार्थ्यांच्या ताटात होते तेच जेवण त्यांनी घेतले.



> दिव्यांग विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा मिळाव्यात, यासाठी आपली भूमिका आग्रही राहील.दिव्यांगांचे सक्षमीकरण झाले पाहिजे,या भूमिकेतून राज्य शासनाने कार्यप्रणाली अवलंबिली आहे. या कार्यप्रणालीची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्याची जबाबदारी आम्हा अधिका-यांची आहे,त्याच भूमिकेतून आपण पारदर्शक कारभार करणार आहोत.
> **- मनोज राऊत,**
> **जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, सोलापूर.**

## महत्वाचे...



### लोकनेते स्व.गोपीनाथ मुंडे यांच्या जयंतीनिमित्त मोफत नेत्र तपासणी

**सोलापूर, दि.१२ डिसेंबर-**

लोकनेते स्व.गोपीनाथ मुंडे यांच्या ७६ व्या जयंती निमित्त चन्नवीर चिट्टे मित्र परिवार व लायन्स क्लबच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी व चष्मे वाटप व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याद्वारे १२३ लाभार्थ्यांना मोफत चष्मे वाटप, ७६ रूग्णांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर यांच्या हस्ते आणि भीमाशंकर पद्मगोंडा, संजय होमकर, विजय कुलथे, अक्षय अंजिखाने, जयवंत थोरात, सतीश पारेल्ली, नागेश ताटी यांच्या प्रमुख उपस्थितीत शिबीराचे उद्घाटन करण्यात आले. चन्नवीर चिट्टे यांनी प्रास्ताविक केले. लायन्स क्लबचे जनसंपर्क अधिकारी सुवर्णा काळे, शीतल गायकवाड यांनीही मनोगत व्यक्तअ केले. नेत्रतज्ञ महासिध्द म्हमाणे राहुल येमूल यांनी रुग्णसेवा बजाविली. सागर अतनुरे यांनी सूत्रसंचालन केले. सद्दाम कोसगीकर यांनी आभार मानले. शिबीराच्या यशस्वीतेसाठी श्रीनिवास दासरी, कल्याण करजगी, रवि कोळी, महेश हलसगी, सोमनाथ कलशेट्टी, किरण वल्लाल, रवि शहापूरकर, साईनाथ सज्जे, गुरूनाथ कोळी, जगदीश यनगुंडी,ओम जमादार, गणेश गुल्लापल्ली, करण हलसगी, सिकंदर कतारी, नितीन हलसगी, अंबादास पाटील, अनिल दासरी, रेवणसिध्द बिराजदार आदींनी परिश्रम घेतले.



### ड्रेनेज लाईन फुटल्याने घरात शिरले मैलामिश्रित पाणी

**सोलापूर, दि.१२ डिसेंबर-**

५४ मीटरचे काम करत असताना देशमुख पाटील वस्ती येथील ड्रेनेज लाईन फुटल्याने घरांमध्ये मैलामिश्रित पाणी शिरले. नागरिकांना डासाचा प्रादुर्भाव होत असल्याने व घाण वास सुटत असल्याने नाहक त्रास होत आहे. येथील समस्या लवकरात लवकर सोडवाव्यात, अशी मागणी एकता बहुउद्देशीय सामाजिक संस्थेने महापालिका आयुक्त यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सचिन शिराळकर यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आलेल्या या निवेदनात म्हटले आहे की, सोलापूर शहर व कोल्हापूर राष्ट्रीय महामार्गाला जोडणारा भय्या चौक, मरिआई चौक दादरा पूल पाडल्यानंतर पर्यायी रस्ता म्हणून देशमुख पाटील वस्ती येथे ५४ मीटर रस्ता तयार करत असताना तेथे असलेली ड्रेनेज लाईन फुटून सर्व मैलामिश्रीत पाणी रहिवाशांच्या घरात जात आहे.



### बाजार समिती येथे सिमेंट काँक्रीट रस्ता, प्रसाधनगृहाची बांधणी सुरु

**सोलापूर, दि.१२ डिसेंबर-**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात विविध विकास कामांना गती येत आहे. काँक्रीट रस्ते तसेच बाजार समितीमधील विविध घटकांना उपयुक्त ठरण्यासाठी प्रसाधनगृह उभारण्यात येत आहे. सभापती दिलीप माने यांच्या नेतृत्वाखाली संचालक मंडळांनी विविध विकासकामांना मासिक बैठकीत मंजुरी दिल्याचे सांगण्यात आले. कांदा सेलहॉलचे रस्ते खराब झाल्याने येथील रस्त्यांची पुनर्बांधणी करण्यात येत आहे. सिमेंट काँक्रीट रस्त्याचे उद्धाटन करण्यात येऊन प्रत्यक्षात कामाला सुरुवात झाली आहे. त्याच परिसरात प्रसाधनगृहाची बांधणी सुरू झाली आहे. बाजार समिती प्रशासनाने सदर प्रसाधनगृह चालवण्याचा मक्ता प्रसिद्ध केला आहे. त्याचे बांधकाम देखील अंतिम टप्प्यात आहे.

# कृत्रिम वाळूसाठी आले ७५ ऑनलाईन प्रस्ताव, रॉयल्टी शुल्कात मिळणार सवलत

### शासनाकडून मागविले ऑफलाईन प्रस्ताव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

राज्य शासनाने कृत्रिम वाळू निर्मितीसाठी प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेतला असून, त्यासाठी रॉयल्टी शुल्कातही सवलत मिळणार आहे. सोलापूर जिल्ह्यात कृत्रिम वाळू तयार करण्यासाठी ७५ जणांचे ऑनलाईन प्रस्ताव दाखल झाले असून, या सर्वांना कागदपत्रासह ऑफलाईन प्रस्ताव करण्याच्या सूचना जिल्हा महसूल प्रशासनाने दिली दिला आहे. त्यासाठी डिसेंबर अखेरची अंतिम मुदत देण्यात आल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोलापुरच्या दौऱ्यातच राज्यात कृत्रिम वाळू तयार करण्यासाठी मान्यता देणार असल्याची घोषणा केली होती. पहिल्या टप्यात प्रत्येक जिल्ह्यात ५० ठिकाणी कृत्रिम वाळू तयार करण्यासाठी एम सॅन्ड युनिट उभारली जाणार आहे.

सोलापूर जिल्ह्यातील भिमा, सीना, माण नदीसह ओढे नाल्यांच्या पात्रातील नैसर्गिक वाळूचा अतिरेकाने उपसा झाल्याने पाणी प्रदुषित होण्याबरोबरच पर्यावरणाचा ऱ्हास होऊ लागला होता. त्यामुळे शासनाने नैसर्गिक वाळूला कृत्रिम वाळु निर्मितीचा पर्याय आणला आहे. सोलापूर जिल्ह्यातील वाळूची मागणी पाहता आता जिल्हास्तरीय मर्यादा ५० वरून १०० युनिटपर्यंत वाढवण्यात आली असून, त्याबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार आता जिल्हाधिकारी यांना देण्यात आला आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी पूर्वीच्या प्रस्तावांना स्थगिती देत नव्याने प्रस्ताव मागवले आहेत.

#### प्रति ब्रासला २०० रुपये शुल्क आकारले जाणार

सध्या ६०० रुपये प्रति ब्रासला रॉयल्टी आकारली जात आहे. एमसॅण्डसाठी रॉयल्टी शुल्कात सवलत देण्यात आली असून, त्यासाठी प्रति ब्रासला २०० रुपये शुल्क आकारले जाणार आहे. आधी खाणपट्टे निश्चित केल्यानंतर त्यासाठी महाराष्ट्र प्रदुषण महामंडळाकडून ना हरकत प्रमाणपत्र घेतले जाणार आहे. त्याचे काम सुरु असल्याची माहिती गौण खनिज विभागाकडून देण्यात आली.



### दमाणी नगर : नवीन पूलाची रुंदी ६ तर उंची २ मीटरने वाढणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ डिसेंबर-**

दमाणी नगरच्या रेल्वेचा नवीन पूल चारपदरी असणार आहे. या पुलाची रुंदी ६ मीटरने तर उंची २ मीटरने वाढविण्यात येणार आहे, असे सांगण्यात आले.

सीएनएस हॉस्पिटल जवळून शहरात येणारा ५४ मीटर रस्ता शुक्रवारपासून वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. तो रस्ता जुना पुना नाका येथील छत्रपती संभाजी महाराज चौक येथे जातो. मंगळवेढा रोडवरून शहरात येणारी वाहने व दमाणी नगरातून शेटे नगर रेल्वे बोगद्याकडे जाणाऱ्या रिक्षा, चारचाकी ५४ मीटर रस्त्यावरुन वळविले जाणार आहेत.

वाहतूक नियमनासाठी १५ पोलीस अंमलदार नेमले जाणार आहेत. मरिआई चौक, दमाणी नगर, सिटी नगर, मोदी बोगदा या पर्यायी रोडवरही वाहतूक अंमलदार नेमले आहेत. रेल्वे पूल पाडकामामुळे या रस्त्यावरील वाहतूक मरिआई चौक, नागोबा मंदिर, शेटे नगर, मोदी बोगदा या रोडवरुन वळविण्यात आले. ५४ मीटर रोडवर ज्या ज्या ठिकाणी अंधार होता त्या ठिकाणी पथदिवे लावले आहेत. बोगद्यात ही दिवे लावण्यात आले आहेत.



### हरे श्रीनिवासाच्या गजरात महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या उत्तरादी मठाच्या छत बांधकामास प्रारंभ

#### डॉ.सुजित जहागिरदार यांच्या हस्ते पूजन : तळ मजल्यावर होणार भव्य श्री बालाजी मंदिराची उभारणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

श्री विष्णुसहस्त्रनामाच्या उच्चारात आणि हरे श्रीनिवासा च्या गजरात विजयपूर रस्त्यावरील पाटील नगर येथे उभारण्यात येत असलेल्या महाराष्ट्रातील सर्वात म ोठ्या उत्तरादी मठाच्या छत बांधकामास शुक्रवारी प्रारंभ झाला. यावेळी डॉ. सुजित जहागिरदार आणि कर्नाटकातील मणुर येथील पंडित अनंत आचार्य अकमंची यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. शुक्रवारी सकाळी प्रारंभी श्री विष्णुसहस्त्रनामाचा पाठ करण्यात आला. यानंतर छत बांधकामाचे पूजन करून प्रारंभ करण्यात आला. यानंतर श्री सुंदरकांड, श्री वेंकटेश्वर स्तोत्र, श्रीसूक्त, श्री राघवेंद्रस्वामी अष्टोत्तर यांचेही पाठ झाले. यावेळी विश्व मध्व महापरिषदेचे सोलापूर शहराचे अध्यक्ष बी. जी. कुलकर्णी म्हणाले, माध्व संप्रदायाचा महाराष्ट्रातील सर्वात मोठा उत्तरादी मठ आणि श्री बालाजी मंदिर सोलापुरात विजयपूर रस्त्यावर बांधण्यात येत आहे. श्री श्री १००८ श्री सत्यात्मतीर्थ महास्वामीजी यांच्या मार्गदर्शनाखाली १६ हजार ७०० चौ. फूट जागेत मे २०२४ पासून भव्य मठाचे आणि श्री बालाजी मंदिराचे बांधकाम सुरू आहे. डिसेंबर २०२७ मध्ये हे बांधकाम पूर्ण होणार आहे.

या मठाच्या तळमजल्यावर भगवान श्री बालाजी मंदिर निर्माण करण्यात येणार आहे. पहिल्या मजल्यावर भक्त निवासासाठी १० खोल्या आणि एक मोठे सभागृह तर दुसऱ्या मजल्यावर ७ हजार ५०० चौ. फुटांचे भव्य सभागृह बांधण्यात येणार आहे. याशिवाय मठामध्ये गोशाळा, वेद पाठशाळाही तयार करण्यात येणार आहे, असेही बी. जी. कुलकर्णी यांनी सांगितले. यावेळी सोलापुरातील विविध भजनी मंडळाकडून भजने सादर करण्यात आली. याप्रसंगी उत्तरादी मठाचे शेकडो भक्त उपस्थित होते.

### भरतनाट्यम्, कोळीगीत, 'ऑपरेशन सिंदूर'ने गाजला बटरफ्लाय फेस्टिवल

#### घरात सुसंवाद साधण्यासाठी प्रयत्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**



भरतनाट्यम, कोळीगीत अन 'ऑपरेशन सिंदूर' च्या सादरीकरणाने शनिवारी बटरफ्लाय फेस्टिवल गाजला. बटरफ्लाय इंग्लिश मिडियम स्कूलचे बटरफ्लाय फेस्टिवल हे वार्षिक स्नेहसंमेलन हुतात्मा स्मृती मंदिरात मोठ्या जल्लोषात आणि सोलापूरकरांच्या तुडुंब गर्दीत संपन्न झाले. बटरफ्लाय फेस्टिवलचे उद्घाटन उद्योगवर्धिनी संस्थेच्या संस्थापिका चंद्रिका चौहान यांच्या हस्ते झाले. व्यासपीठावर श्री सिद्धेश्वर वुमन्स पॉलीटेक्निक महाविद्यालयाचे प्राचार्य गजानन धरणे, श्री सिद्धेश्वर शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष व्ही. जे. देवणीकर, खजिनदार शंकर पाटील, विश्वस्त राजेंद्र मायनाळ, कॉलेज ऑफ आर्किटेक्चरचे प्राचार्य निरंजन संगावार, बटरफ्लाय इंग्लिश मीडियम स्कूलच्या माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका रश्मी कुंभार, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका रश्मी पुरवत उपस्थित होते.

उद्योगवर्धिनी संस्थेच्या संस्थापिका चंद्रिका चौहान म्हणाल्या, शाळेमधून विद्यार्थ्यांना संस्कारांची शिदोरी मिळते. तर स्नेहसंमेलनातून विद्यार्थ्यांमधील नेतृत्व गुण विकसित होतात. पालकांनी मुलांना मोबाईलपासून दूर ठेवावे. घरात सुसंवाद राखण्यासाठी पुढाकार घ्यावा. जगात नव्याने येणाऱ्या ज्ञानाची माहिती मुलांना द्यावी. श्री सिद्धेश्वर वुमन्स पॉलीटेक्निक महाविद्यालयाचे प्राचार्य गजानन धरणे यांनी मनोगत व्यक्त केले.

विद्यार्थ्यांनी भरतनाट्यम तसेच 'हे गणराया', रेन डान्स अशा गीतांवर नृत्यांचे सादरीकरण केले. 'मी हाय कोली', या पारंपरिक गीतावर झालेल्या समूहनृत्याला सोलापूरकरांनी टाळ्यांचा कडकडाट करून प्रतिसाद दिला. तर 'अंबाबाई गोंधळाला ये', 'लल्लाटी भंडार...' अशा गोंधळगीतांनाही आई भवानीचा गजर करीत उपस्थित सोलापूरकरांनी हुतात्मा स्मृती मंदिर सभागृह दणाणून सोडले. गरबा, दहीहंडी असे पारंपारिक नृत्यांसह 'चंदा मामा सो गया', 'धडक धडक', 'मोबाईल थीम', 'हंगर थीम' या सादरीकरणांचेही उपस्थितांनी कौतुक केले. 'छावा', 'ऑपरेशन सिंदूर' अशा विषयांवरील सादरीकरणही सोलापूरकरांना भावले. 'वंदे मातरम' ने बटरफ्लाय फेस्टिवलची सांगता झाली. वैष्णवी पोलू हिने प्रास्ताविक केले. प्रिया कुमावत आणि वैष्णवी पोलू यांनी सूत्रसंचालन केले. कार्तिकी अंबुरे हिने आभार मानले. साधना पाटील, प्रीती सानक अपर्णा कुलकर्णी, आशा कस्तुरे यांनी मार्गदर्शन केले.

### भाजपा कार्यालय आजी-माजी पदाधिकाऱ्यांनी गजबजले

#### १०२ जागांसाठी आजतागायत ८२५ अर्ज गेले

#### १२५ अर्ज जमा; आज अर्ज घेण्याचा शेवटचा दिवस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

महापालिका निवडणुकीसाठी शेवटच्या क्षणी योग्य उमेदवार निवडीसाठी धावपळ होवू नये यासाठी भारतीय जनता पार्टीच्या शहर कार्यालयातून सध्या इच्छुकांना फॉर्म देण्यास सुरूवात केली आहे. गेल्या ४ दिवसात पालिकेच्या २६ प्रभागातील १०२ जागांसाठी आजतागायत तब्बल ८२५ अर्ज इच्छुकांनी घेवून गेल्याची माहिती भाजपा शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांनी दिली.

या अर्जाच्या छाननीनंतर स्थानिक कोअर कमिटीकडून तयार करण्यात आलेली यादी प्रदेश पातळीवर जाईल आणि उमेदवारांच्या तिकीटांवर प्रदेश श्रेष्ठींकडूनच शिक्कामोर्तब होईल. दिलेले अर्ज जमा करण्यासाठी उद्या १३ डिसेंबर ही शेवटची तारीख आहे. या तारखेपर्यंत अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. सध्या १२५ अर्ज कार्यालयात भरून आले आहेत. पक्षश्रेष्ठींनी ठरवून दिल्याप्रमाणे नियोजनबध्द मनपा निवडणूक कार्यक्रम आम्ही राबविणार आहोत. अर्ज घेवून गेलेल्यांमध्ये दिलीप कोल्हे, पद्म ाकर नाना काळे, बिज्जू प्रधाने, नरेंद्र काळे, श्रीकांचना यन्नम, शशिकला बत्तूल आदींसह माजी नगरसेवक व भाजपा पदाधिकाऱ्यांचा समावेश आहे, असेही त्यांनी सांगितले.



सोलापूर : शुक्रवारी सायंकाळी शेळगी परिसरात जैन मुनी आचार्य कुंतूसागरजी महाराजांचे जैन बांधवांनी उत्साहाने स्वागत केले. यावेळी नगरसेवक डॉ.किरण देशमुख यांनीही त्यांचे स्वागत केले. त्याप्रसंगी शुक्रवारी टिपलेले छायाचित्र.

### एक तपाच्या संघर्ष पर्वात शिवसेनेशी एकनिष्ठ राहणारा सुजीत खुर्द

*राजकीय आणि सामाजिक जीवनात केवळ चमकोगिरी न करता प्रत्यक्ष ग्राऊंड लेव्हलला उतरुन काम करणारा कार्यकर्ता म्हणजे पक्षाची खरी ताकद असते. सोलापूरमध्ये २०१४ पासून शिवसेनेशी एकनिष्ठ राहून, वंदनीय स्व.बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर स्व.आनंद दिघे, उपमुख्यमंत्री ना.एकनाथजी शिंदे साहेब, खा.डॉ. श्रीकांत शिंदे साहेब, युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक साहेब यांचे विचार तळागाळापर्यंत पोहोचवणारे युवा नेतृत्व म्हणजे सुजीत दत्तात्रय खुर्द. युवा सेनेचे महाराष्ट्र राज्याचे कार्यकारणी सदस्य म्हणून कार्यरत असलेल्या सुजीत खुर्द यांचा प्रवास हा खऱ्या अर्थाने एक संघर्ष पर्व आहे.*

आपत्तीत धावून जाणारा कार्यकर्ता : होटगी रोडवर सिमेंट कारखान्याच्या वाहनामुळे झालेल्या अपघातात मृत पावलेल्यांच्या नातेवाईकांना मुख्यमंत्री सहायता निधीतून मदत मिळवून देण्यासाठी त्यांनी तत्परतेने हालचाली केल्या. स्वतः घटनास्थळी जाऊन गावकऱ्यांची समजूत काढली आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून पीडितांना आर्थिक मदत मिळवून दिली. आरोग्यमंत्री तानाजीराव सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी महाआरोग्य शिबिरांचे आयोजन करून हजारो रुग्णांना सेवा दिली आहे.

हिंदुत्व आणि पक्षनिष्ठा : हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांचे विचार पुढे नेत असताना त्यांनी सोलापुरात हिंदुत्वाचा आवाज बुलंद केला. प्रभू श्रीरामांच्या मूर्तीची विटंबना करणाऱ्या जितेंद्र आव्हाड यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यासाठी त्यांनी पोलीस ठाण्यात धाव घेतली. अयोध्येतील राम मंदिर सोहळ्याच्या निमित्ताने सोलापुरात महाआरती आणि दीपोत्सवाचे भव्य आयोजन करून त्यांनी शिवसैनिकांमध्ये उत्साह निर्माण केला.



य ा योजनांची प्रभावी अंमलबजावणी : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या लाडकी बहीण योजनेचा लाभ सोलापुरातील महिलांना मिळावा यासाठी त्यांनी विशेष शिबिरांचे आयोजन केले. त्यांच्या या उपक्रमास महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला, ज्यामध्ये ५६०० हून अधिक महिलांची नोंदणी करण्यात आली.

गेल्या दशकाभरापासून (२०१४-२०२५) पक्षात निष्ठेने काम करणारे सुजीत खुर्द हे केवळ पदावर बसणारे नेते नसून ग्राउंड लेव्हलला काम करणारे कार्यकर्ते आहेत. युवक, महिला आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी शासन दरबारी आवाज उठवणारा आणि प्रसंगी रस्त्यावर उतरून संघर्ष करणारा हा तरुण नेता सोलापूरच्या राजकारणात नक्कीच लंबी रेस का घोडा ठरेल, यात शंका नाही.

**शब्दांकन : प्रा.सदाशिव शिंदे**




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांची ७६ वी जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१२ डिसेंबर -**

वाशी तालुक्यातील सारोळा येथे (दि.१२) डिसेंबर रोजी स्वर्गीय लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या ७६ व्या जयंतीनिमित्त कार्यक्रम उत्साहात पार पडला.



गावातील मुख्य चौकात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमास सरपंच वसंत मोरे, उपसरपंच सुनील नवनाथ मोरे, ग्रामपंचायत सदस्य राजेश मोरे, बिभीषण शिंदे, हनुमंत मोरे, गुलाब डोईफोडे, सुनील डोईफोडे, विशाल डोईफोडे, दिनेश दराडे, सुजित मोरे, बंटी दराडे यांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुंडे साहेबांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या लोकाभिमुख राजकारणाची आठवण उपस्थितांनी जागवली. त्यांच्या विकासदृष्टीतून प्रेरणा घेत गावाच्या प्रगतीसाठी एकजुटीने काम करण्याचा संकल्पही व्यक्त करण्यात आला.



## शोक संदेश...




### माणुसकी जपणारा नेता आपण गमावला...

शिवराज पाटील चाकूरकर साहेबांच्या निधनाची बातमी अत्यंत वेदनादायी आहे.



निवडणुकीत आम्ही एकमेकांच्या विरोधात उभे राहिलो, परंतु व्यक्तिगत नात्यातील आपुलकी, स्नेह आणि परस्परांचा मान हे बंध नेहमीच अबाधित राहिले. मतभेदांच्या पलीकडेही ते माणुसकी जपणारे, सर्वांना जोडून ठेवणारे आणि प्रेमाने वागणारे नेते होते. त्यांच्या मार्गदर्शनाची, मोठेपणाची आणि सौजन्याची कमतरता सदैव जाणवेल. चाकूरकर कुटुंबीयांना आणि त्यांच्या अनुयायांना या दुःखातून सावरण्याचे बळ मिळो. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, हीच आई तुळजाभवानीच्या चरणी प्रार्थना.

**- डॉ. पद्मसिंह पाटील**

### चाकूरकर यांच्या निधनाने एक आदर्श व्यक्तिमत्त्व हरपले...

कौटुंबिक स्नेही तथा देशाचे माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर साहेब



यांच्या निधनाची बातमी अत्यंत दुःखद आहे. राजकारणातील सभ्यता, विनयशीलता आणि तत्त्वनिष्ठ आचारधर्माचा आदर्श त्यांनी आपल्या कार्यातून उभा केला. दीर्घ राजकीय कारकीर्दीत त्यांनी देशासाठी अनेक प्रतिष्ठित पदांवर कार्य करत संवैधानिक प्रक्रियेत मोलाचे योगदान दिले. चाकूरकर साहेब आमच्यासाठी केवळ ज्येष्ठ नेता नव्हते, तर सतत मार्गदर्शन करणारे, आपुलकीने आधार देणारे आणि आशीर्वाद देत साथ करणारे वडीलधारी व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या शांत, संयमी आणि दूरदृष्टीपूर्ण सल्ल्यामुळे अनेक प्रसंगात योग्य दिशा मिळत असे. त्यांची माया, स्नेह आणि योग्य वेळी मिळालेला हृदयस्पर्शी आधार सदैव स्मरणात राहील. त्यांच्या जाण्याने सुसंस्कृत, प्रामाणिक आणि लोकभावना ओळखणारा एक मोठा आधारस्तंभ आपण हरपला आहे. आई तुळजाभवानी त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो आणि चाकूरकर कुटुंबियांना या दुःखातून सावरण्याचे बळ मिळो, हीच प्रार्थना.

**- आ. राणाजगजितसिंह पाटील**

### एक संयमी व दूरदर्शी नेतृत्व हरपले...

माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज सिंह पाटील चाकूरकर यांच्या निधनाने



राज्याचे तसेच राष्ट्रीय राजकारणातील एक सभ्य, संयमी आणि दूरदृष्टी असलेले नेतृत्व हरपले आहे. दीर्घकाळ सार्वजनिक जीवनात राहून त्यांनी लोकसंपर्क, प्रशासकीय कौशल्य आणि प्रामाणिक कार्यशैलीच्या बळावर स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली होती. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात कधीही भरून न येणारी पोकळी निर्माण झाली आहे. सौम्य स्वभाव, संवादकुशलता आणि लोकांसाठी सतत उपलब्ध राहण्याची त्यांची वृत्ती अनेकांसाठी प्रेरणादायी ठरली. धाराशिव आणि लातूर परिसराशी त्यांचे जिव्हाळ्याचे नाते नेहमीच कायम राहिले. धाराशिव राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार गट) पक्षाचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी श्रद्धांजली अर्पण करून शोकसंवेदना व्यक्त केल्या.

**- डॉ. प्रतापसिंह पाटील**

### लोकहिताचे नेतृत्व हरपले...

भाजपाचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ



कुलकर्णी यांनी माजी केंद्रीय मंत्री शिवराज पाटील चाकुरकर यांच्या निधनावर दुखः व्यक्त केले. लोकहितासाठी अखेरपर्यत कार्यरत राहिलेले नेतृत्व हपरल्याची भावना त्यांनी यावेळी व्यक्त करून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

**- दत्ताभाऊ कुलकर्णी**

# हैदराबाद अधिनियम क्रमांक ८ मध्ये सुधारणा; धाराशिवसह मराठवाड्यातील ७० हजार प्लॉट आणि घरे नि:शुल्क वर्ग-१

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ डिसेंबर -**

हैदराबाद अधिनियम क्रमांक ८ मध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा करून पाच टक्के नजराणा रद्द करण्यात आला आहे. या ऐतिहासिक निर्णयामुळे मराठवाड्यातील आठही जिल्हे आणि विदर्भातील चंद्रपूरमधील राजोरा येथील रहिवासी क्षेत्रातील सर्व भोगवटदार वर्ग-२ मालमत्ता आता निःशुल्क वर्ग-१ करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यामुळे तब्बल ७० हजार घरं व प्लॉटांना स्वच्छ मालकीचा दर्जा मिळणार असून, धाराशिव जिल्ह्यातील २,१६२ मालमत्ताधारकांना थेट फायदा होणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.

मराठवाड्यातील वर्ग-२ निवासी जमिनींचा गुंतागुंतीचा प्रश्न अनेक वर्षे प्रलंबित होता.



निवासी जमिनी मदतमाश दाखविल्याने घर बांधकाम परवाना, बँक कर्ज, मालमत्ता हस्तांतरण अशा अनेक अडचणी नागरिकांना भेडसावत होत्या. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत जाहीर केले की, निवासी प्रयोजनासाठी असलेल्या सर्व मदतमाश वर्ग-२ जमीनी कोणतेही शुल्क न आकारता वर्ग-१ केल्या जाणार आहेत.

हैदराबाद अधिनियम क्रमांक ८ (१९५५) मध्ये करण्यात आलेल्या सुधारणेमुळे हा मार्ग सुकर झाला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तत्कालीन महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील आणि शासनस्तरीय बैठकीत या निर्णयास तत्वतः मंजुरी देण्यात आली होती. या सुधारणेमुळे धाराशिव, लातूर, नांदेड, हिंगोली, जालना, छत्रपती संभाजीनगर, बीड आणि चंद्रपूर या जिल्ह्यांतील निवासी मालमत्तांना थेट फायदा प्लॉट/घर निःशुल्क वर्ग-१, मालमत्ता हस्तांतरणासाठी कोणत्याही परवानगीची गरज नाही, बांधकाम परवाना, बँक कर्ज यासंबंधीच्या अडचणी दूर होणार, नाममात्रही शुल्क आकारले जाणार नाही.

बक्षीसपत्र, भाडेपट्टा, खरेदीखत किंवा ग्रामपंचायत/नगरपालिका नोंदी असल्यास वर्ग-१ प्रक्रिया त्वरित पूर्ण होणार आहे.

### धाराशिवसह मराठवाड्याचा ऐतिहासिक विजय : आमदार राणाजगजितसिंह पाटील

मराठवाड्यातील इनामी आणि देवस्थान जमिनींच्या वर्ग-२ प्रश्नासाठी आपण सतत पाठपुरावा केला. मुख्यमंत्री फडणवीस यांनी आणि महसूलमंत्री बावनकुळे यांनी सर्वसामान्यांना न्याय दिला. हा निर्णय धाराशिव शहरासाठी विशेषतः महत्वाचा आहे, असे आमदार पाटील यांनी सांगितले. तसेच, धाराशिवातील २,१६२ नागरिकांना आता त्यांच्या घराची स्वच्छ मालकी मिळणार आहे. सर्वांनी ही प्रक्रिया लवकर पूर्ण करावी. कोणाला अडचण असल्यास माझ्याशी संपर्क साधावा, असे आवाहनही त्यांनी केले. तसेच सात दशकांपासूनचा प्रश्न अखेर निकाली निघाला. यासाठी मुख्यमंत्री फडणवीस आणि महसूलमंत्री बावनकुळे यांचे जिल्ह्याच्या वतीने मनःपूर्वक आभार मानतो, असे आमदार पाटील यांनी सांगितले.

## परंड्यात चाकुरकर यांना श्रद्धांजली; स्व. मुंडे यांची जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१२ डिसेंबर -**

भारत देशाचे माजी गृहमंत्री तसेच महाराष्ट्राचे माजी राज्यपाल शिवराजजी पाटील-चाकुरकर यांचे आज अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाची बातमी समजताच भाजपाच्या वतीने त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

उपस्थित कार्यकर्त्यांनी २ मिनिटे स्तब्ध राहून त्यांना आदरांजली वाहिली. संघर्ष योद्धा, राज्याचे माजी उपमुख्यमंत्री आणि लोकनेते स्व. गोपीनाथजी मुंडे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन भाजपा नेते माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांच्या कार्याचा स्मरण करून अभिवादनही करण्यात आले.

या कार्यक्रमाला भाजपाचे अरविंद रगडे, ॲड. गणेश खरसडे, विकास कुलकर्णी, ॲड. जहीर चौधरी, अविनाश विधाते, समरजीतसिंह ठाकूर, तानाजी पाटील, बाबासाहेब जाधव, डॉ. अमोल गोफणे, श्रीराम देवकर, बिभीषण हांगे, तुकाराम हजारे, अजित काकडे, श्रीकृष्ण शिंदे, सतिश देवकर, फारुख मुलाणी, श्रीमंत शेळके, रामदास गुडे, अर्जून कोलते, सुजित परदेशी, राहुल खोत, तानाजी घोडके, संतोष शिंदे, तुषार नेटके, पांडुरंग मुसळे, संपत्ती भोळे, रामकृष्ण घोडके, गौरव पाटील, अजिम हन्नुरे, सुरज काळे, आकाश मदने, तुषार कोळेकर, समाधान कोळेकर, किरण कवटे, अकिब पठाण, जोती भातलवंडे तसेच इतर मान्यवर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुरूममध्ये शिवराज पाटील चाकूरकर यांना विविध संघटनांकडून श्रद्धांजली



**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.१२ डिसेंबर -**

देशाचे माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराजजी पाटील चाकूरकर यांच्या दुःखद निधनामुळे मुरूम शहरात हळहळ व्यक्त होत असून, आज महात्मा बसवेश्वर चौक येथे विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना, पत्रकार संघ तसेच मुरूम व्यापारी संघटनेच्या वतीने अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

सकाळी नगर शिक्षण विकास मंडळ संचलित प्रतिभा निकेतन विद्यालयात त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून शाळेला सुट्टी जाहीर करण्यात आली. त्यानंतर सायंकाळी महात्मा बसवेश्वर चौक येथे सर्व संघटनांच्या वतीने श्रद्धांजली कार्यक्रम पार पडला. स्व. शिवराजजी पाटील चाकूरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विविध मान्यवरांनी त्यांना अभिवादन केले. यावेळी उपस्थित होते.

गणेश अंबर, राहुल वाघ, जाधव, व्यंकट जाधव, श्रीकांत बेंडकाळे, रमेश चव्हाण, राजू मुल्ला, गौरीशंकर बोगरगे, उल्हास घुरघुरे, शिवशरण तांबडे, विवेकानंद परसाळगे, नदीम इनामदार, सुरेश मंडले, मुन्ना मासुलदार, मल्लिनाथ सगरे, निर्मलकुमार लिमये, किरण गायकवाड, राजकुमार अंबुसे, मुर्गेन्द्र स्वामी तसेच विलास वाडीकर, महेश निंबरगे, रवी अंबुसे, रामलिंग पुराणे आदी मान्यवर उपस्थित होते. शहरातील विविध घटकांनी एकत्र येत स्व. शिवराजजी पाटील चाकूरकर यांच्या सार्वजनिक जीवनातील योगदानाचे स्मरण करून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

## लोकनेते गोपीनाथ मुंढे यांच्या जयंतीनिमित्त येरमाळयात विविध उपक्रम



**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.१२ डिसेंबर -**

येरमाळा येथील अभिषेक मंगल कार्यालयात शुक्रवारी (ता.१२) लोकनेते गोपीनाथ मुंढे यांची जयंती विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली. कीर्तन, रक्तदान शिबीर, सामाजिक बांधिलकीचे उपक्रम आणि मोठ्या प्रमाणातील उपस्थिती या सर्वांमुळे जयंती कार्यक्रमाला विशेष उत्साह दिसला.

कार्यक्रमाची सुरुवात हभप. श्रीराम चोले महाराज (बीड) यांच्या कीर्तन सेवेमुळे झाली. त्यांनी आपल्या प्रभावी कीर्तनातून गोपीनाथ मुंढे यांच्या राजकीय वाटचालीचा उज्ज्वल प्रवास सांगत त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील खास गुणांवर प्रकाश टाकला. कीर्तनादरम्यान उपस्थितांचा जोरदार प्रतिसाद लाभला. या जयंती कार्यक्रमासाठी बांगरवाडी, रत्नापूर, मलकापुर, उपळाई, दुधाळवाडी या परिसरातील वंजारी बांधवानी जयंतीचे आयोजन केले. राजकीय, सामाजिक संस्थांचे विविध पदाधिकारी, युवक, महिला वर्ग तसेच ज्येष्ठ नागरिकांनी मानाचे ठिकाण असलेल्या या जयंती कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. जयंतीनिमित्त आयोजित रक्तदान शिबिराला उल्लेखनीय प्रतिसाद मिळाला. एकूण ६५ रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत समाजासाठी आपली बांधिलकी दाखवली. आयोजकांनी सर्व रक्तदात्यांचा प्रशस्तिपत्र देऊन सन्मान केला. गोपीनाथ मुंढे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ कीर्तन व जागृतीपर उपक्रम, समाजातील सर्व घटकांचा उत्साही सहभाग, सामाजिक बांधिलकी जपणारे रक्तदान शिबिर, शिस्तबद्ध आणि भावनिक वातावरणात जयंती साजरी करण्यात आली.

### आंबी पोलीसांकडून गावठी दारू जप्त

**वाशी, दि.१२ डिसेंबर -** आंबी पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध दारूविक्रीविरोधात कारवाई करताना पोलिसांनी १५ लिटर गावठी दारू जप्त केली आहे. आरोपी अभिमान जाधव (वय ५०) यांनी दि.११ डिसेंबर रोजी दुपारी सुमारे ३.३० वाजता आपल्या घराच्या आडोशाला अंदाजे १ लाख ३५० किंमतीची १५ लिटर अवैध गावठी दारू विक्रीसाठी ठेवली होती.

## विद्यार्थ्यांची मंगरूळ कंचेश्वर साखर कारखान्यास क्षेत्रभेट

**एकलव्य विद्या संकुलातील विद्यार्थ्यांनी जाणून घेतली साखर निर्मिती प्रकिया...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ डिसेंबर -**

तालुक्यातील मंगरूळ यमगरवाडी एकलव्य विद्या संकुलातील इयत्ता सातवीच्या वर्गाचे विज्ञान विभागाअंतर्गत विज्ञान परिक्रमा आयोजित केली जाते, या उपक्रमांतर्गत नुकतेच सातवीच्या वर्गातील विद्यार्थ्यांनी कंचेश्वर साखर कारखाण्यास सदिच्छा भेट दिली.

या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी साखर कारखान्यातील वजन काटा,गव्हाण,ज्यूस विभाग, सेटिंग टाक्या, साखर पॅकिंग आणि ग्रेडिंग व्यवस्था आणि कान्वेयर बेल्ट च्या माध्यमातून गोडाऊन पर्यंत ची वाहतूक यांचे निरीक्षण केले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना नुकतीच तयार झालेली गरमागरम साखर ही खायला मिळाली. त्यानंतर जलशुद्धीकरण आणि पुनर्वापर प्रक्रिया, मोलासेस



साठवणूक यंत्रणा आणि बगॅस वर निर्माण होणारी वीज निर्मिती यांची प्रक्रिया जाणून घेतली.

एकलव्य विद्या संकुलातील दरवर्षी इयत्ता ७ वी चा वर्ग हा कंचेश्वर साखर कारखान्याला भेट देत असतो. मांजरा शुगर व कंचेश्वर साखर कारखान्यांच्या व्यवस्था प्रमुखांचे तसेच कर्मचारी यांचे यावेळी सहकार्य लाभले. क्षेत्रभेटीस अनिल घुगे कोंडिबा देवकर आणि रमेश पवार यांचे सहकार्य लाभले. क्षेत्रभेटीचे नियोजन दयानंद भडंगे यांनी केले.

## खामसवाडी जि.प. शाळेजवळील अवैध दारु विक्रीवर पोलिसांची कारवाई

### दै. 'तरुण भारत'च्या वृत्ताला तत्काळ प्रतिसाद...

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.१२ डिसेंबर -**

कळंब तालुक्यातील खामसवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शेजारी सुरू असलेल्या अवैध दारू विक्रीवर शिराढोण पोलिसांनी मंगळवारी रात्री धडक छापेमारी करत मोठा मुद्देमाल जप्त केला असून दोघा विक्रेत्यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

शुक्रवार, ९ डिसेंबरच्या दैनिक तरुण भारत मध्ये खामसवाडी जिल्हा परिषद शाळेजवळ अवैध दारू विक्री या शीर्षकाखाली प्रसिद्ध झालेल्या विशेष वृत्ताची तात्काळ दखल घेत शिराढोण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक कोळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली ह ी



कारवाई करण्यात आली.

पोलीस पथकाने रात्री खामसवाडीत अचानक धाड टाकत देसी दारू तसेच इतर कंपन्यांच्या दारूचा साठा जप्त केला.

विक्रेत्यांना गु.र.नं. कलम ३०६, ३०७/२५ नुसार अटक करून पुढील तपास सुरू आहे.

छापेमारीदरम्यान पोलिसांनी परिसरातील वडापाव विक्रेत्यांच्या हॉटेलमध्येही झाडाझडती घेतली तसेच त्या ठिकाणी बसणाऱ्या टवाळखोर मद्यपींना कडक सूचना देत शाळेजवळ थांबू नये, असा इशारा दिला.

दैनिक तरुण भारतच्या बातमीमुळे जिल्हाधिकारी आणि पोलिस प्रशासनाने त्वरित लक्ष देऊन कारवाई केली. जिल्हा परिषद शाळेतील पालकांनीही फोनवरून दैनिक तरुण भारतचे आभार व्यक्त केले.

### खाकीधारींच्या कारवाईने टवाळखोरांत दहशत...

शाळेजवळील तसेच साठे चौकातील अवैध दारू विक्रेत्यांवर केलेल्या कडक पोलिस कारवाईमुळे सध्या तरी परिसरात टवाळखोरांची वर्दळ थांबली आहे व गावात दिलासा निर्माण झाला आहे. खामसवाडीकरांकडून पोलिसांचे तसेच माध्यमांचे कौतुक होत असून गावात सुरक्षित वातावरण निर्माण व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## मांजरा शुगर इंडस्ट्रीजचा तिसरा गाळप हंगाम यशस्वी

**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.१२ डिसेंबर -**

महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा सहकारमहर्षी दिलीपराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली तुळजापूर तालुक्यातील मंगरुळ येथील मांजरा शुगर इंडस्ट्रीज (कंचेश्वर) कारखान्याचा तिसरा गाळप हंगाम २०२५-२६ उत्साहात व यशस्वीपणे सुरू आहे. १० डिसेंबरपर्यंत १,५८,६७० मेट्रिक टन ऊस गाळप करून कारखान्याने उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

मांजरा शुगर इंडस्ट्रीज यांनी दैनंदिन ४५ केएलपीडी क्षमतेचा आसवनी प्रकल्प उभारून इथेनॉल निर्मिती सुरू केली आहे. केंद्र शासनाच्या ऑइल कंपन्यांकडून २०२५-२६ या वर्षासाठी जाहीर केलेल्या निविदेनुसार कारखान्याने १ कोटी ६ लाख लिटर इथेनॉल पुरवठ्यासाठी प्रस्ताव सादर केला होता. त्यापैकी विविध तिमाहींसाठी ५७ लाख ९४ हजार लिटर इथेनॉल पुरवठ्याची मंजुरी मिळाली आहे. यातील पहिल्या तिमाहीसाठी सोलापूर येथील पाकणी डेपोकडे रवाना करण्यात आला. राज्य उत्पादन शुल्क विभागाचे दुय्यम निरीक्षक नागेश नडमशेटवार यांच्या हस्ते संपन्न झाले.

# जिल्हाधिकाऱ्यांनी साधला विद्यार्थ्यांशी संवाद

**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, १२ डिसेंबर :** निलंगा नगर परिषद निवडणूक प्रक्रियेचा आढावा, स्ट्रॉंगरुम व मतदान बूथ पाहणीच्या निमित्ताने निलंगा दौऱ्यावर आलेल्या जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा घुगे ठाकूर यांनी जिल्हा परिषद कन्या प्रशाला निलंगा येथील मतदान केंद्राला भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी शाळेत उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांशी संवाद साधत शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेतला.

गुरुवार दि. ११ डिसेंबर रोजी निलंगा नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या अनुषंगाने पाहणीच्या निमित्ताने निलंगा दौऱ्यावर आलेल्या जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा घुगे ठाकूर यांनी निलंगा शहरांत विविध ठिकाणी भेट दिली. तसेच तहसील कार्यालय निलंगा येथील स्ट्रॉंग रूम ला भेट देऊन पाहणी



केली आणि अधिकारी व कर्मचारी यांची बैठक घेऊन मार्गदर्शन केले.

यावेळी त्यांनी लातूर रोडवरील स्थिर निगराणी पथकास भेट देऊन तपासणी केली. तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अशोक नगर व जिल्हा परिषद कन्या प्रशाला निलंगा येथील मतदान केंद्रास भेट देऊन पाहणी केली. निवडणूक बूथची पाहणी करून विद्यार्थ्यांशी संवाद साधत शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेतला. तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांना विचारपूस करून निवडणूक परिस्थितीचा आढावा घेतला.

जिल्हाधिकारी श्रीमती घुगे ठाकूर यांनी शाळेतील पहिली ते चौथीच्या वर्गांना भेट देऊन विद्यार्थी-विद्यार्थिनींशी थेट संवाद साधला. त्यांनी मराठी, गणित आणि इंग्रजी विषयांवर आधारित प्रश्न विचारून विद्यार्थ्यांना बोलके केले. तसेच, काही विद्यार्थ्यांकडून पाढे म्हणून घेतले. विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर त्यांनी समाधान व्यक्त केले, तसेच शाळा व्यवस्थापनाला आवश्यक त्या शैक्षणिक सूचना केल्या.

यावेळी जिल्हाधिकारी यांच्यासमवेत जिल्हा सह आयुक्त अजितकुमार डोके, उपविभागीय अधिकारी शरद झाडके, निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार प्रसाद कुलकर्णी, मुख्याधिकारी संतोष लोमटे, नायब तहसीलदार कुलदीप देशमुख, गट विकास अधिकारी एस जी पाटील, पोलिस उपविभागीय अधिकारी डूमे पाटील, पोलिस निरीक्षक सुधीर सूर्यवंशी आणि इतर अधिकारी उपस्थित होते.

प्रथमत उपविभागीय अधिकारी शरद झाडके व निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांच्या हस्ते जिल्हाधिकारी महोदयांचा स्वागत करण्यात आले. तसेच जि.प कन्या प्रशालेच्या वतीने मुख्याध्यापिका श्रीमती सरस्वती नागमोडे यांनी जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा घुगे ठाकूर यांचा ग्रंथ भेट देऊन सत्कार केला.यावेळी शाळेतील शिक्षक-शिक्षिका श्रीमती अर्चना माने, एम एम जाधव, श्रीमती आर एम सगरे, वाघमारे सर, अरविंद गुंजीटे आणि सुंदर बोंडगे उपस्थित होते.

# घरकुलाच्या हप्त्यासाठी लाच स्वीकारताना दोघे रंगेहाथ

**त.भा. वृत्तसेवा,**

**शिरूर अनंतपाळ, १२ डिसेंबर :** लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने रचलेल्या सापळा कार्यवाहीत पंचायत समिती शिरूर अनंतपाळ येथील ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यासह खाजगी इसमास २५ हजाराची लाच स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आल्याची कार्यवाही गुरुवारी करण्यात आली.

तक्रारदाराने १० डिसेंबर रोजी दिलेल्या तक्रारीत स्वतःच्या व भावाच्या प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुलाच्या दुसऱ्या हप्त्यासाठी ४० हजार रुपयांची लाच मागितले जात असल्याची तक्रार लाच लुचपत प्रतिबंधक विभागाला दिली होती. पडताळणी दरम्यान अन्वर आयुब शेख वय ३१ वर्षे राहणार तुरुकवाडी याने लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार आरीमोड येथे सापळा रचण्यात आला. त्यात आरोपी अन्वर शेख यांच्या सांगण्यानुसार खाजगी इसम चाँद नवाज पटेल यांनी पंचा समक्ष पंचवीस हजार रुपये स्वीकारले त्याच क्षणी कर्तव्यदक्ष लाच लुचपत प्रतिबंधक अधिकारी यांनी या दोघांना झडप घालून पकडण्यात आले. व त्यांना ताब्यात घेऊन त्यांची अंगझाडती घेण्यात आली. चांद पटेल यांच्याकडून लाचेची रक्कम पंचवीस हजार व मोबाईल जप्त करण्यात आला. तर अनवर शेख यांच्याकडून मोबाईल जप्त करण्यात आला. याप्रकरणी गुन्हा दाखल करून पुढील तपास पोलीस निरीक्षक बहात्तरे करीत आहेत.

# महावितरण क्रांतिकारी लाईनस्टाफ सेना लातूर जिल्हाध्यक्षपदी घटकार

**त.भा. वृत्तसेवा,**

**देवणी, १२ डिसेंबर :** सन २०२५ ते २०२६ साठी लातुर मंडळ कार्यकारणी अशोक धोंगडे लातुर परिमंडळ अध्यक्ष, महादेव पाटील



लातुर परिमंडळ सचिव, शिवाजी डोंबाळे लातुर परिमंडळ उपाध्यक्ष यांच्या सहमतीने दि.८ डिसेंबर २०२५ रोजी जाहीर करण्यात आली.

यावेळी सर्वानुमते लातूर जिल्हा अध्यक्ष पदी दयानंद गोरोबा घटकार यांची निवड करण्यात आली. यांच्या कामाच्या प्रति निष्ठा व सर्वाना सोबत घेऊन काम करण्याची व सर्वा सोबत मिळून मिसळून राहणे या मुळे यांची जिल्हा अध्यक्ष पदी निवड झाली आहे. यांचे प्रथमिक शिक्षण जि प प्रा शाळा नळगीर ता. उदगीर मुळ गावी झाले. माध्यमिक शिक्षण उदगीर येथील अहिल्यादेवी होळकर विद्यालयात झाले. व २००९ ते २०११ या दोन वर्षात शासकीय आईटीया केला व चडएइ मध्ये २०१२ ला उदगीर येथे नोकरीला लागले तीन वर्षा नंतर दोन वर्ष वडवळ नागनाथ येथे व जळकोट येथे पाच वर्ष व पाच वर्षा पासुन देवणी चडएइ उपविभाग वलांडी येथे कार्यरत असुन यांच्या कामाची दखल घेऊन यांची लातूर जिल्हा अध्यक्षपदी निवड झाली आहे. २०१२ तंत्रज्ञ म्हनून २०१५ ला वरीष्ठ तंत्रज्ञ म्हनून पदोन्नती झाली. उर्वरित कार्यकारिणी अशी आहे. अर्जुन बिरादार (उपाध्यक्ष), रफिक सय्यद (सचिव), विठ्ठल यमुलवाड (सहसचिव), किरण पाटील (कार्याध्यक्ष), राम सूर्यवंशी (प्रसिद्धी प्रमुख), किरण शिंदे (संघटक) याची निवड करण्यात आली. सदर कार्यकारणी लातुर परिमंडळ चे औद्योगिक संबंध अधिकारी चुनारकर व लातुर मंडळचे अधिक्षक अभियंता दानी यांना लातुर परिमंडळ व मंडळ पदाधिकारी यांच्या उपस्थित देण्यात आली.

# माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांना चाकूरवासियांच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली

**त.भा. वृत्तसेवा,**

**चाकूर, १२ डिसेंबर :** चाकूरचे भूमीपुत्र मा.केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांना शहरातील सोसायटी चौक येथे चाकूर वासियांच्या वतीने ता.१२ डिसेंबर रोजी दुपारी बारा वाजता जड अंतकरणाने

## चाकूर येथील शाळा, महाविद्यालय राहणार बंद

श्रध्दांजली अर्पण करण्यात आली असून यावेळी चाकूर शहरातील विविध शाळा व महाविद्यालय बंद ठेवून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

महाराष्ट्राच्या राजकीय क्षेत्राच्या शालीनता, सुसंस्कृततेचा लौकिक जपणारे नेतृत्व म्हणून चाकूरचे सुपुत्र ज्येष्ठ नेते कै.शिवराज पाटील चाकूरकर हे सदैव स्मरणात राहतील अशा शब्दांत चाकूर येथील सोसायटी चौकामध्ये श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

शिवराज पाटील चाकूरकर यांच्या जाण्याने चाकूरचे नव्हे तर संपूर्ण भारताच्या राजकरणात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. काँग्रेसचा सुसंस्कृत, धर्मनिरपेक्ष आणि सर्वसमावेशक चेहरा आपण हरवला आहे अशा शब्दांत विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी मनोगत व्यक्त केले.चाकूरकरांनी मंत्रीमंडळात वेगवेगळ्या खात्याची राजकीय पदे भुषवली होती. तसेच चाकूरचे भुमिपुत्र, लातूरचे नगराध्यक्ष, आमदार, खासदार, देशाचे गृहमंत्री, लोकसभा अध्यक्ष, पंजाबचे राज्यपाल, मूल्याधिष्ठित, तत्त्वनिष्ठ आणि एकनिष्ठ




राजकारणाचे मूर्तिमंत उदाहरण आणि चाकूरचे लाडके नेते शिवराज पाटील चाकूरकर आज काळाच्या पडद्याआड गेले.

चाकूरकर यांच्या जाण्याने काँग्रेसच्या उदात्त परंपरेचा एक मजबूत प्रतिनिधी हरपला आहे. धर्मनिरपेक्ष मूल्यांचे ते बुलंद प्रतीक होते, ज्यांनी आयुष्यभर लोकशाही, समानता आणि सौहार्द यांची मशाल उंच ठेवली. त्यांची संवादाची शैली, सौजन्य, संयम आणि आदराने राजकारण करण्याची पद्धत त्यांना कायम स्मरणात ठेवेल.

आदरणीय साहेब, तुम्ही देहाने आमच्यात नाही परंतु तुम्ही घालून दिलेली परंपरा, तुमचं प्रेम, आणि काँग्रेसच्या विचारधारेवरील तुमची अपार श्रद्धा, ही सदैव लातूरकरांच्या मनात जिवंत राहील.तुमचं कार्य, तुमची विनम्रता आणि लोकांसाठीची निस्सीम बांधिलकी आम्ही पुढच्या पिढ्यांना सांगत राहू. तुम्ही दिलेल्या प्रत्येक मूल्याला मान देत, आम्ही तुमची परंपरा चाकूरसह सपूर्ण देशात अभिमानाने पुढे नेत राहू.हीच तुमच्यासाठी खरी आदरांजली आहे.यावेळी चाकूर शहरातील समस्त चाकूर वाशियांच्या वतीने सोसायटी चौक येथे श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी नगराध्यक्ष करीम गुळवे, साई हिप्पाळे, भागवत फुले, विठ्ठल माकणे, राधाकिशन तेलंग, बालाजी सुर्यवंशी, राजाराम माने, अनिल वाडकर, निलेश देशमुख, नितीन रेड्डी, युवराज पाटील, सिध्देश्वर पवार, पपन कांबळे, मिलिंद महालिंगे, राम कसबे, विष्णू तिकटे, सजंय पाटील, किशन रेड्डी, डॉ.चंद्रप्रकाश नागीमे, सलीम तांबोळी,गंगाधर केराळे, रविंद्र निळकंठ, बिलाल पठाण, संदिप शेटे, चंद्रशेखर मुळे, सागर होळदांडगे, मच्छिंद्र नागरगोजे, ॲड.धनंजय कोरे, कदीर शेख, सचिन चाकूरकर, बाबुराव शेटे, शिवकुमार गादगे, घुडु पटेल, युसुफ शेखसह चाकूर शहरातील नागरिक उपस्थित होते.चाकूर नगरपंचायत येथे व कॉंग्रेसच्या वतीनेही श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

# जन्म-मृत्यू प्रमाणपत्राबाबत महानगरपालिकेचे आवाहन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर ,१२ डिसेंबर :** महाराष्ट्र शासनाने सप्टेंबर २०२३ ते जानेवारी २०२५ या कालावधीत तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी या पदापेक्षा कमी दर्जाच्या अधिकाऱ्याने विलंबीत जन्म-मृत्यूच्या घटनेची नोंद घेण्यासाठीचे दिलेले सर्व आदेश व या आदेशाच्या आधारे दिलेले जन्म-मृत्यू प्रमाणपत्र रद्द केलेले आहेत.

लातूर मनपा क्षेत्रात या कालावधीत एकूण १६७७ विलंबीत जन्म-मृत्यू प्रमाणपत्रे निर्गमीत करण्यात आली होती. या कालावधीत सदरील विलंबीत जन्म-मृत्यू प्रमाणपत्रे रद्द करण्यात आली असल्याचे व सदरील जन्म-मृत्यू प्रमाणपत्र मनपा कार्यालय कींवा तहसील कार्यालय येथे जमा करणे बाबत यापूर्वी वेळोवेळी सूचन देण्यात आल्या आहेत तसेच तहसील कार्यालय, मनपा कार्यालयाचे कर्मचारी यांनी घरोघरी जावून भेटी देवून माहिती दिलेली आहे. तथापि अद्याप बऱ्याच नागरिकांनी त्यांची मुळ जन्म-मृत्यू प्रमाणपत्रे अद्याप जमा केलेली नाहीत. तसेच कांही नागरिकांनी झेरॉक्स प्रत जमा केलेली आहे.

शासन निर्णय दि.१६ सप्टेंबर २०२५ नुसार प्रमाणपत्र वापस जमा करण्यासाठी ३ महिन्याची मुदत देण्यात आली होती व सदरील मुदत मंगळवार १६ डिसेंबर २०२५ रोजी संपत आहे. ज्या नागरिकांनी त्यांची रद्द झालेली मूळ जन्म-मृत्यू प्रमाणपत्रे वापस जमा केलेली नाहीत अश्या प्रमाणपत्रधारकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे शासनाकडून सुचना प्राप्त झाल्या आहेत. तरी ज्या नागरिकांनी त्यांची रद्द झालेली मूळ जन्म-मृत्यू प्रमाणपत्रे अद्याप वापस जमा केली नाहीत तसेच ज्या नागरिकांनी यापूर्वी फक्त झेरॉक्स प्रत सादर केली आहे अश्या सर्व संबंधीत नागरिकांनी मंगळवार दि.१६ डिसेंबर २०२५ पूर्वी रद्द मूळ प्रमाणपत्रे तहसील कार्यालय येथे जमा करावी व कायदेशीर कार्यवाही टाळावी असे आवाहन लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

# कव्हेकरांकडून शिवराज पाटील चाकूरकरांना आदरांजली

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १२ डिसेंबर :** लातूर नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष, विधानसभा सभागृहाचे माजी सभापती, लोकसभेचे माजी अध्यक्ष तथा माजी केंद्रीय गृहमंत्री तथा पंजाबचे माजी राज्यपाल शिवराज पाटील चाकूरकर यांचे शुक्रवारी पहाटे अल्पशा आजाराने निधन झाले. या घटनेची माहिती मिळताच भाजपा नेते तथा किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर व जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ.प्रतिभाताई पाटील कव्हेकर यांनी त्यांच्या औसा रोड येथील देवघर निवासस्थानी जाऊन त्यांच्या पार्थिवाचे दर्शन घेऊन भावपूर्ण आदरांजली वाहिली.

मा.चाकूरकर साहेबांनी जागतिक व देश पातळीवरील राजकारणात उत्कृष्ट काम केलेले आहे. राजकीय क्षेत्रामध्ये काम करताना आम्हाला त्यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभलेले आहे. अशा महाप्रभावी व ऋषितुल्य नेतृत्वाचे अचानक निधन झाले. त्यांच्या निधनामुळे संपूर्ण देशात आणि राज्यांमध्ये एक मोठी पोकळी निर्माण झालेली आहे. त्यांच्या आत्म्यास शांती मिळो, अशी प्रभू चरणी प्रार्थना. या दु:खद आणि कठीण प्रसंगी चाकूरकर कुटुंबियांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत.

या दु:खातून सावरण्याचे बळ चाकूरकर परिवारांना मिळो अशी प्रार्थनाही भाजपा नेते तथा किसान मोर्चा गुजरात गोवा राज्याचे प्रभारी माजी आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी व्यक्त केली.



# उदगीर शहरात वाहतुकीची कोंडी कायम

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर,११ डिसेंबर :** सेवा शहरातून दोनचाकी, चारचाकी तसेच अवजड वाहनांची वाहतूक एकाच मुख्य रस्त्यावरून

## चारही बाजूंनी वळण रस्त्याची गरज

होत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. दिवसेंदिवस वाढणारी वाहनांच्या संख्येमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे शहराच्या चारही बाजूंनी वळण रस्ते निर्माण करण्याची मागणी नागरिकांमधून करण्यात येत आहे.

महत्त्वाचे शहर आहे. येथून हैदराबाद, बंगळुरू, विशाखापट्टणम, तिरुपती, बिदर, कलबुर्गी, नांदेडला जाणारी वाहने मोठ्या प्रमाणात शहरातूनच जातात. अडत बाजारामुळे कर्नाटकासह परिसरातील गावांमधून शेतकरी सोयाबीन, तूर विक्रीसाठी छोटी व मोठी वाहने घेऊन उदगीरमध्ये येतात. तसेच पुणे, मुंबई, छत्रपती संभाजीनगर आदी



ठिकाणी दररोज शंभर ते दीडशे ट्रॅव्हल्स बस शहरातून धावत असतात. दुचाकी, चारचाकी, अवजड वाहनांची वाहतूक मुख्य रस्त्यावरून होत असल्याने वाहतुकीची कोंडी होत आहे.

मलकापूर-बिदर वळण रस्त्याची अवस्था दिवसेंदिवस गंभीर होत असून, खड्ड्यांमुळे वाहतुकीची गती पूर्णपणे मंदावली आहे. अनेक ठिकाणी खड्डे इतके खोल झाले आहेत की दोनचाकी व हलक्या वाहनांसाठी मार्ग काढणेही कठीण झाले आहे. परिणामी प्रवाशांचे हाल होऊन अपघातांचा धोका वाढत आहे. याकडे प्रशासनाने लक्ष देण्याची मागणी होत आहे.

चारचाकी वाहनांसह बाहेरून येणाऱ्या वाहनांची गर्दी झाल्यामुळे सतत वाहतुकीची समस्या वाढत आहे. त्यामुळे शहराच्या चारही दिशांनी वळण रस्ते निर्माण करण्याची मागणी होत आहे. शहरात एकच मुख्य मार्ग असल्यामुळे शिरूर ताजबंद, जळकोट, नळेगाव, देगलूर आणि कर्नाटककडून येणारी सर्व वाहने याच रस्त्यावरून जातात. त्यामुळे स्थानिक दोनचाकी,

अनेक दिवसांपासून मलकापूर रेल्वे उड्डाणपुलाचे काम पूर्ण झालेले नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उदासीनतेमुळे हे काम सध्या बंद आहे. उड्डाणपुलाचे काम झाल्यास काही प्रमाणात वाहतुकीचा प्रश्न सुटणार आहे. मात्र, याकडे बांधकाम विभाग लक्ष देणार का असा प्रश्न वाहनधारकांमधून उपस्थित केला जात आहे.

नागरिकांनी केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली आहे. या मागणीवर लोणी-पिंपरीमार्गे देगलूरकडे जाणारा वळण रस्ता मंजूर झाल्याची माहिती मिळत असून, लवकरच त्याचे सर्वेक्षण होणार असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, हा प्रकल्प प्रत्यक्षात मार्गी कधी लागणार, हा प्रश्न अद्यापही नागरिकांना पडलेला आहे.

# भाजप तालुका चिटणीसपदी भुसागरे

**त.भा. वृत्तसेवा,**

**शिरूर अनंतपाळ, १२ डिसेंबर :** शिरूर अनंतपाळ तालुक्यातील मौजे हिप्पळगाव येथील भारतीय जनता पक्षाचे निष्ठावान कार्यकर्ते माजी सरपंच रामदास भुसागरे यांची तालुका चिटणीस पदी निवड करण्यात आली. ही निवड त्यांच्या कार्याची दखल घेऊन माजी मंत्री तथा आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांच्या सुचनेनुसार शिरूर अनंतपाळ येथे पार पडलेल्या महत्वाच्या बैठकीत तालुका अध्यक्ष माधव बिराजदार यांनी लेखी पत्र देऊन अरविंद पाटील निलंगेकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

गेल्या अनेक वर्षांपासून रामदास भुसागरे हे भारतीय जनता पक्षाचे एकनिष्ठपणे काम करत आसतात.निष्ठावान कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख आहे.भारतीय जनता पक्षाचे उल्लेखनीय कामगिरी बद्दल भारतीय जनता पार्टी कडुन दखल



प्रामाणिकपणे काम करुन त्यांनी पक्ष परिवारात एक वेगळा ठसा उमटविला आहे. पक्षाच्या कामातील सातत्य, एकनिष्ठता आणि पक्ष वाढीसाठी अहोरात्र मेहनत करत असतात. त्यांच्या घेऊन माजी मंत्री आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांच्या सुचनेनुसार अरविंद पाटील निलंगेकर व तालुका अध्यक्ष माधव बिराजदार यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन गौरविण्यात आले.

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, धाराशिव,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# सैनिकांच्या प्रश्नांसाठी प्रशासन कटिबद्ध : जिल्हाधिकारी पुजार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ डिसेंबर -**

देशाची सुरक्षितता ही सैनिकांच्या हाती असून त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करणे हे आपले आद्यकर्तव्य आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी केले.



जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती सभागृहात जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या वतीने आयोजित सशस्त्र सेना ध्वज दिन २०२५ निधी संकलन शुभारंभ कार्यक्रमात त्या अध्यक्षस्थानावरून बोलत होत्या. पुजार यांनी सांगितले की, भारतीय प्रशासकीय सेवेत असताना जम्मू-काश्मीरमधील सीम ेवर सैनिकांसोबत दहा दिवस घालविल्याने त्यांच्या कठोर जीवनाची जाणीव झाली. उणे तापमानात देशाची रक्षा करणाऱ्या सैनिकांना ध्वजदिनातून मदत करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे, असे त्या म्हणाल्या.

कार्यक्रमाला अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव न्या. भाग्यश्री पाटील, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश काळे, पोलीस उपाधीक्षक (गृह) डी.पी. पारेकर, जिल्हा कोषागार अधिकारी अर्चना नरवडे, एसटी विभाग नियंत्रक अजय पाटील आणि जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले.कर्नल शरद पांढरे उपस्थित होते. दीपप्रज्वलनानंतर शहीद जवानांच्या प्रतिमेस पुष्पचक्र अर्पण करून बिगुल वाजवण्यात आला. वीर पत्नी, वीर माता, वीरबंधू यांचा म ान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी ज्ञानेश्वर मोरे (माजी सैनिक पाल्य) २०,००० रु. धनादेश, आर्या कुलकर्णी व आदित्य वाघ शैक्षणिक गुणवत्तेचा गौरव, हरिकेश गाडेकर - आर्मी ट्रेनिंग गया येथे निवड याबद्दल सत्कार करण्यात आला.

मागील वर्षी जिल्ह्यास ५७ लाखांचे उद्दिष्ट असूनही तब्बल १ कोटी ३४ लाख ८४ हजार रुपये निधी जमा करून धाराशिव जिल्ह्याने राज्यात तिसरा क्रमांक मिळविला. यावर्षीसुद्धा ५७ लाखांचे उद्दिष्ट जाहीर करण्यात आले. मंदिर संस्थानचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी पुजार यांनी १० लाखांचा धनादेश जिल्हा सैनिक कल्याण अधिकाऱ्यांकडे सुपूर्द केला. सचिन ढेपे, चंद्रकांत गुंड व रेखा सोनटक्के यांनी देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन विशाल सूर्यवंशी यांनी केले.

कार्यक्रमाला माजी सैनिक, त्यांचे कुटुंबीय, वीर पत्नी व विविध विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने झाला.

# नूतन न्यायालयीन इमारतीचे २० डिसेंबर रोजी उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१२ डिसेंबर -**

येथे बांधण्यात आलेली भव्य नूतन न्यायालयीन इमारतीचे उद्घाटन २० डिसेंबर शनिवार रोजी सायंकाळी सहा वाजून पंधरा मिनिटांनी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्न वराळे यांच्या हस्ते तर मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश चंद्रशेखर यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

याप्रसंगी मुंबई येथील उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती रवींद्र घुगे, न्यायमूर्ती श्रीमती विभा कंकणवाडी आणि न्यायमूर्ती शैलेश ब्रम्हे, धाराशिव जिल्हा सत्र न्यायाधीश अभिश्री देव यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.



नुतन न्यायालयीन इमारतीच्या उद्घाटनाचे निमंत्रण तुळजापूर दिवाणी न्यायाधीश श्रीमती स्वाती अवसेकर आणि विधीज्ञ मंडळाचे अध्यक्ष ॲड. दत्तात्रय घोडके यांनी दिले आहे.

# आत्मनिर्भर भारतासाठी स्वदेशीचा अंगीकार अनिवार्य : रामदास कोळगे

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ डिसेंबर -**

देशाची प्रगती साधायची असेल, तर स्वदेशी उत्पादनांना चालना देऊन देशांतर्गत वस्तूंचा वापर वाढवणे अत्यावश्यक आहे. स्वदेशीचा प्रसार झाल्यास देश मजबूत बनेल आणि भारताला आत्मनिर्भर होण्यापासून कोणतीही अडथळा रोखू शकणार नाही, असे प्रतिपादन माजी जिल्हा परिषद सदस्य रामदास कोळगे यांनी केले.



जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे आयोजित हुतात्मा दिन कार्यक्रम ाचे अध्यक्ष म्हणून ते बोलत होते. ते पुढे म्हणाले, हुतात्मा बाबू गेनू यांनी विदेशी मालवाहू ट्रकसमोर उभे राहून प्राणाची आहुती दिली. दिवसा गिरणीत काम आणि रात्री स्वातंत्र्य आंदोलन असा समतोल साधत त्यांनी स्वदेशीचा प्रसार व परदेशी वस्तूंचा बहिष्कार करण्यास तरुणांना प्रेरित केले. परदेशी वस्तूंवर बहिष्कार करून स्वदेशी स्वीकारल्यासच खऱ्या अर्थाने आत्मनिर्भर भारताची निर्मिती होईल, असेही त्यांनी नमूद केले.

मान्यवरांच्या हस्ते हुतात्मा बाबू गेनू यांच्या प्रतिमेस पुष्पहार व श्रीफळ अर्पण करुन अभिवादन केले. तसेच विद्यालयातील सहशिक्षक अभिषेक घोळवे यांनी हुतात्मा बाबू गेनू यांच्या जीवनपटाचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले.

कार्यक्रमाला डॉ. आंबेडकर बाल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व शिक्षणमहर्षी सुभाष कोळगे, राजनारायण कोळगे, प्राचार्य जयप्रकाश कोळगे, प्रशासकीय अधिकारी शिवकन्या साळुंके, प्राचार्य संतोष कपाळे, मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गणेश शेटे यांनी केले, तर आभार काकासाहेब डोंगरे यांनी मानले.

# समर्थांच्या पादुका आई तुळजाभवानीच्या भेटीला

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ डिसेंबर -**

श्री समर्थ रामदास स्वामी सज्जनगड यांच्या पादुका महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानीच्या मंदिरात भेटीसाठी दाखल झाल्या होत्या.

चारशे वर्षांपूर्वी समर्थांनी आई तुळजाभवानीची कुलस्वामिनी म्हणून दर्शन घेतले होते. त्यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांसाठी तुळजाभवानीला प्रार्थना केली होती.

समर्थांच्या पादुका श्री समर्थ रामदास स्वामी मठ श्रीक्षेत्र खतगाव (ता. कर्जत जि. अहिल्यानगर) यांच्या वतीने समर्थ रामदास स्वामींच्या व श्रीधर स्वामींच्या पादुका आई तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी आल्या होत्या. तुळजाभवानी देवस्थानच्या वतीने मंदिर समितीच्या अधिकाऱ्यांनी पादुकांचे स्वागत करून समर्थ भक्त आणि या श्री समर्थ मठाचे कार्यकारी विश्वस्त मोहन बुवा रामदासी यांचा यथोचित याप्रसंगी सत्कार केला.



यावेळी मोहन बुवा रामदासी धनंजय जेवळीकर यांच्यासह अनेक समर्थ भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तुगाव येथे २५ डिसेंबर रोजी दहावी अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषद

**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.१२ डिसेंबर -**

ग्रामस्थांच्या पुढाकाराने आणि गेल्या नऊ वर्षांपासून यशस्वी परंपरा असलेल्या अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषदेचा दहावा सोहळा यंदा २५ डिसेंबर २०२५ रोजी तुगाव येथे आयोजित करण्यात आला आहे.

## तयारीसाठी त्रिरत्न बुद्ध विहारात बैठक

या परिषदेच्या पूर्वतयारीसाठी त्रिरत्न बुद्ध विहारात महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली.

बैठकीला तुगावम धील नागरिक, मागील कार्यकारिणीतील पदाधिकारी, समता सैनिक दलाचे पदाधिकारी, तसेच महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

धम्म परिषदेचे मुख्य प्रवर्तक प्राचार्य डॉ. कमलाकर कांबळे यांनी मागील नऊ परिषदा, त्यांची उपयुक्तता, धम्म जागृतीमध्ये त्यांची भूमि का तसेच यावर्षीच्या परिषदेची उद्दिष्टे आणि संकल्पना यावर सविस्तर मार्गदर्शन केले. नवीन सूचना, आयोजनाची रूपरेषा, तसेच ग्रामस्थांचा सहभाग वाढविण्यासंदर्भात चर्चा व विचारविनिमय करण्यात आला.

बैठकीत आगामी परिषदेकरिता समिती गठीत करण्यात आली. त्यामध्ये स्वागताध्यक्ष : भालचंद्र लोखंडे, अध्यक्ष : शाहूराज भोसले, खजिनदार : नंदकुमार गायकवाड तसेच दत्ताभाऊ कांबळे, धर्मेंद्र कांबळे, राजकुमार कांबळे, सचिन बनसोडे, संकल्प कांबळे, छाया बागडे, बलभीम गायकवाड यांच्यासह अनेक जणांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली.

याप्रसंगी रेखा गायकवाड, संगीता गायकवाड, पार्वती गायकवाड, इंदुबाई भालेराव, अश्विनी नागटिळे, मंगल कांबळे, जितेंद्र कांबळे, बलभीम गायकवाड, सचिन बनसोडे, संकल्प कांबळे, भालचंद्र लोखंडे आदीजण उपस्थित होते.

# धाराशिवमध्ये प्रथमच 'श्री. ब्रह्म भूषण' सन्मान सोहळा

## ब्राह्मण समाजातील मान्यवरांचा गौरव

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ डिसेंबर -**

धाराशिव येथील ब्राह्मण कल्याण ट्रस्टतर्फे प्रथमच 'श्री. ब्रह्म भूषण' सन्म ान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. ब्राह्मण समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना या सन्मानाने गौरविण्यात येणार आहे. हा सोहळा रविवार, १४ डिसेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता परिमल मंगल कार्यालयात पार पडणार आहे.

ब्राह्मण कल्याण ट्रस्ट मागील काही वर्षांपासून सामुदायिक आणि सामाजिक उपक्रम राबवत आहे. यामध्ये सामुदायिक उपनयन संस्कार, गुणवंत विद्यार्थी सत्कार, भांडी बँक, अन्नसेवा यांसह सम ाजहिताचे अनेक कार्यक्रम सातत्याने राबवले जात असून त्याला समाजाकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

यावर्षीपासून समाजातील उल्लेखनीय कार्यकर्त्यांना 'श्री. ब्रह्म भूषण' सन्मान देण्याची ट्रस्टने घोषणा केली आहे. या सोहळ्यासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून खातगाव येथील समर्थ रामदासस्वामी मठाचे श्री. समर्थ भक्त मोहनबुवा रामदासी, अध्यक्षस्थानी परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष कॅप्टन आशिष दामले, तर विशेष उपस्थिती म्हणून परशुराम आर्थिक विकास महामंडळासाठी उपोषणकर्ते दीपक रणनवरे उपस्थित राहणार आहेत.

ट्रस्टच्या वतीने सर्व समाजबंधूंना या सन्मान सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### या मान्यवरांचा होणार सन्मान

या सन्मान सोहळ्यात पुढील मान्यवरांचा सत्कार समारंभ होणार आहे. यात डॉ. उर्मिला गजेंद्रगडकर, रंगनाथ कुलकर्णी, डॉ. राघवेंद्र डंबळ, भारत मसलेकर, राजेंद्र अत्रे यांचा समावेश आहे.

# मानवी हक्क आबादित ठेवणे काळाची गरज : गोपाळ आष्टे

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१२ डिसेंबर -**

श्री राष्ट्रीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर मध्ये १० डिसेंबर, जागतिक मानवी हक्क दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमास मुख्याध्यापिका सविता लोहार अध्यक्षस्थानी उपस्थित होत्या, तर सहशिक्षक गोपाळ आष्टे गुरुजी बोलत होते.

गोपाळ आष्टे यांनी आपल्या भाषणात प्रतिपादन केले की, माणसाला जन्मजात स्वातंत्र्याचा हक्क, समानतेचा हक्क आणि प्रतिष्ठा पूर्वक जगण्याचा हक्क प्राप्त होतो. भारतीय घटनेने हे हक्क स्पष्टपणे व्यक्त केले आहेत.

त्यांनी सांगितले की, आपल्याला देशाप्रती हक्क तसेच कर्तव्ये आहेत, तसेच संविधानाने सर्वसामान्य नागरिकांना जीवन जगण्यासाठी आणि प्रगती साधण्यासाठी हक्क दिले आहेत. या हक्कांचा योग्य वापर करून समाजात ठोस निर्णय घेणे आणि व्यक्तिगत प्रगती साधणे ही काळाची गरज आहे. कार्यक्रमात इयत्ता पहिली ते सातवी पर्यंतचे विद्यार्थी आणि सर्व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख समीर देशपांडे यांनी केले, तर आभार व्यंकट वचने यांनी मानले.

# नागझरवाडी येथे माती-पाणी तपासणी मार्गदर्शन कार्यशाळा उत्साहात




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ डिसेंबर -**

श्रीसिद्धीविनायक परिवार धाराशिव यांच्या वतीने कळंब तालुक्यातील नागझरवाडी येथे माती-पाणी तपासणी मार्गदर्शन कार्यशाळा घेण्यात आली. खाम सवाडी येथे सुरू असलेल्या माती व पाणी परीक्षण संकलन केंद्राच्या म ाध्यमातून ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली. श्रीसिद्धीविनायक परिवाराचे संस्थापक व भाजप जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमाचा अनेक शेतकऱ्यांना मोठा लाभ होत आहे.

अल्प दरात माती-पाणी तपासणीची सुविधा उपलब्ध झाल्याने शेतकऱ्यांना वैज्ञानिक पद्धतीने शेती करण्यास मोठा आधार मिळत आहे. नागझरवाडी येथील कार्यशाळेत बलराम कुलकर्णी आणि गजानन पाटील यांनी माती परीक्षणाचे फायदे शेतकऱ्यांसमोर मांडले. मातीतील पोषकद्रव्यांची अचूक स्थिती कळल्यामुळे रासायनिक खतांचा अनाठायी वापर टाळता येतो, खत खर्चात बचत होते, उत्पादन वाढीस मदत होते, जमिनीची सुपीकता दीर्घकाळ टिकून राहते, असे त्यांनी स्पष्ट केले.

ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणारे उद्योजक म्हणून दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी गूळ पावडर प्रकल्पाद्वारे ऊस उत्पादकांना बाजारपेठ उपलब्ध करून दिली असून, माती-पाणी परीक्षण केंद्राद्वारे शेतकऱ्यांच्या समृद्ध शेतीसाठी महत्त्वपूर्ण पुढाकार घेतल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

कार्यशाळेस नागझरवाडी व परिसरातील शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विठ्ठल साळुंके, सयाजी साळुंके, नानासाहेब यादव, राम महाजन, कुमार साळुंके, प्रकाश साळुंके, मनोज साळुंके आदींसह अनेक शेतकरी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आभार विजय पोफळे यांनी मानले.



**तुळजापूर :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांचे थोरले बंधू आशिष फडवणीस यांनी तुळजापूर येथे येऊन आई तुळजाभवानीचे दर्शन घेतले. याप्रसंगी भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, ज्येष्ठ नेते बाळासाहेब शामराज, मंदिर व्यवस्थापक तहसीलदार माया माने, देवीचे पुजारी सचिन अमृतराव, भाजपा नेते चे उमेश गवते, प्रदेश कार्यकारिणी सदस्य गुलचंद व्यवहारे, विकास मलबा, जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी बोधले आदी उपस्थित होते.

# खंडोबाच्या दरबारातूनच पुढील वर्षाची ऊर्जा मिळते : आशिष फडणवीस


## श्रीक्षेत्र मैलारपुरात आशिष फडणवीस यांचे सहकुटुंब दर्शन

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१२ डिसेंबर -**

आई तुळजाभवानी आणि श्री खंडोबा देवाचे दर्शन घेऊन आम्ही पुढील एक वर्ष काम करण्याची ऊर्जा इथूनच सोबत घेतो, असे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे बंधु आशिष फडणवीस यांनी श्रीक्षेत्र मैलारपुर येथे श्री खंडोबा देवाचे दर्शन घेतल्यानंतर व्यक्त केले.

दि.१२ डिसेंबर रोजी दुपारी सुम ारे १२ वाजता आशिष फडणवीस हे सहकुटुंब नळदुर्ग येथील श्रीक्षेत्र मैलारपुरातील श्री खंडोबा देवाचे दर्शन घेण्यासाठी आले होते.

त्यांच्या आगमनानंतर परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. आगमनानंतर आशिष फडणवीस व त्यांच्या कुटुंबियांचे विविध संस्थांच्या वतीने भव्य स्वागत करण्यात आले. श्री खंडोबा देवस्थान ट्रस्टच्या वतीने अध्यक्ष बालाजी मोकाशे यांनी फ ेटा बांधून आणि श्री खंडोबा देवाची प्रतिमा देऊन सत्कार केला.





नळदुर्ग शहर भाजपच्या वतीने अध्यक्ष बसवराज धरणे, नेते सुशांत भुमकर, बबन चौधरी, धीमाजी घुगे, पप्पू पाटील, विशाल डुकरे, पत्रकार विलास येडगे यांनी सत्कार केला. भोई समाजाच्या वतीने पांडू पुदाले, माजी नगरसेवक सचिन डुकरे, समाजसेवक आकाश पुदाले, विशाल डुकरे यांनी स्वागत केले.

अप्पर तहसील कार्यालयातर्फे अप्पर तहसीलदार प्रमोद गायकवाड, तर नगरपालिकातर्फे कर्मचारी सुरज गायकवाड यांनी सत्कार केला.

दर्शनानंतर बोलताना आशिष फडणवीस म्हणाले की, दरवर्षी आम चे कुलदैवत नीरा नरसिंहपूर येथील नरसिंह महाराज, तुळजापूर येथील आई तुळजाभवानी, नळदुर्ग-अणदुर येथील श्री खंडोबा आणि अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या दर्शनासाठी आम्ही कुटुंबासह येतो. या सर्व देवांचे दर्शन घेतल्यानंतर नवीन उर्जा मिळते. मैलारपुरात आले की मन प्रसन्न होते.

खंडोबाचे दर्शन घेतल्यावर शरीरात एक वेगळी ऊर्जा निर्माण होते. याप्रसंगी भाजपचे कार्यकर्ते, श्री खंडोबा देवस्थान ट्रस्टचे पदाधिकारी, पुजारी, नगरपालिका कर्मचारी, अप्पर तहसील कार्यालयातील कर्मचारी, तसेच पोलिस कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्रीक्षेत्र मैलारपुरातील हा धार्मिक व सामाजिक कार्यक्रम अत्यंत आनंदात आणि भक्तिभावात पार पडला.

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## शिवराज पाटील चाकूरकरांच्या निधनाने लातूरवर शोककळा

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १२ डिसेंबर :** भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, लातूरचे सुपुत्र माजी केंद्रीय गृहमंत्री यांच्या निधनाने लातूर शहरावर शोककळा पसरली आहे. शुक्रवारी सकाळी चाकूरकरांच्या निधनाची वार्ता समजल्यापासूनच शहरातील वातावरणात एक प्रकारचा उदासपणा दिसून येत होता.चाकूरकरांच्या पार्थिवावर शनिवारी सकाळी लातूरपासूनजवळच असलेल्या वरवंटी शिवारातील त्यांच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. अंत्ययात्रेसाठी विविध राजकीय पक्षांचे महत्वपूर्ण नेते लातुरात येणार असल्याने सकाळी सहा ते दुपारी एक वाजेपर्यंत शहरातील वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात आले आहेत. शहराच्या मुख्य रस्त्यावरील वाहतूक अन्य मार्गावरून वळविण्यात आली आहे. आपल्या दिवंगत नेत्याच्या अंत्यदर्शनाला लोक मोठी गर्दी करतील अशी अपेक्षा आहे. त्यामुळे प्रशासनाने अगोदरपासूनच सर्व उपाय योजना केल्या आहेत. शहराच्या जवळपास सर्वच भागात शिवराज पाटील चाकूरकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली, विनम्र अभिवादनाचे मोठमोठे फलक लावण्यात आले आहेत. एकंदर संपूर्ण लातूर शहरावर शोककळा पसरली आहे. शिवराज पाटील चाकूरकर यांनी लातूरच्या नगराध्यक्षपदापासून आपल्या राजकीय जीवनाची सुरुवात केली होती. नगराध्यक्ष पदापासून सुरु झालेला त्यांचा राजकीय प्रवास देशाच्या केंद्रीय गृहमंत्र्यांपर्यंत जाऊन पोहोचला.



# राजकारणातील 'रत्नपारखी'- ऋषितुल्य व्यक्तिमत्व हरपले!

दि. १२ डिसेंबर २०२५ च्या शुक्रवारची सकाळ केवळ संपूर्ण लातूर जिल्हावासियांसाठीच नव्हे तर तमाम महाराष्ट्रवासियांसाठी अनपेक्षित घटनेने उगवली. लातूरचे नगराध्यक्ष, आमदार, खासदार, राज्यमंत्री, लोकसभा अध्यक्ष, केंद्रीय मंत्री, पंजाब-चंदीगडचे राज्यपाल अशा विविध पदांवर अत्यंत सक्षमपणे कार्य केलेले भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शिवराज विश्वनाथ पाटील चाकूरकर यांचे वार्धक्यामुळे लातुरातील 'देवघर' या निवासस्थानी निधन झाले. त्यांनी वयाची नुकतीच ९० वर्षे पूर्ण केली होती. दि. १२ ऑक्टोबर २०२५ रोजी त्यांचा ९० वा जन्मदिवस कौटुंबिक पातळीवर साजरा करण्यात आला होता. एक उत्तुंग दूरदृष्टी लाभलेले आदर्श नेतृत्व, राजकारणातील 'रत्नपारखी' - ऋषितुल्य व्यक्तिमत्वाचे धनी अशी मराठी सारस्वतातील सारी बिरुदे कमी पडतील, असे हे व्यक्तित्व होते. त्यांच्या जाण्याने राजकारणातील एक अजातशत्रू व्यक्तिमत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. आयुष्यात पक्षाच्या विचारांपेक्षाही तत्वनिष्ठेला महत्व देणाऱ्या देशातील मोजक्या नेत्यांत शिवराज पाटील चाकूरकर अग्रस्थानी होते, असे म्हटल्यास ते अतिशयोक्तीचे ठरणार नाही.

शिवराज पाटील चाकूरकर यांनी आपल्या सहा दशकांहूनही अधिकच्या राजकीय-सामाजिक-सार्वजनिक जीवनात यशाची अनेक शिखरे पादाक्रांत केली. यश-अपयशाचा प्रखरपणे सामना केला. पण, आपल्या विचारांपासून ते तसूभरही ढळले नाहीत. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये दिवंगत पंतप्रधान भारतरत्न इंदिरा गांधी, राजीव गांधी यांच्या पंतप्रधान पदाच्या काळात चाकूरकर यांनी संरक्षण राज्यमंत्री म्हणून तर डॉ. मनमोहनसिंह यांच्या कार्यकाळात त्यांनी केंद्रीय गृहमंत्री म्हणून जबाबदारी सांभाळली आहे. देशाच्या पंतप्रधान पदावर पी.व्ही. नरसिंहराव विराजमान असतानाच्या काळात चाकूरकर यांनी दि. १० जुलै १९९१ ते दि. २२ मे १९९६ पर्यंत त्यांनी लोकसभेचे सभापती म्हणून काम पाहिले होते. दि. १२ ऑक्टोबर १९३५ रोजी लातूर जिल्ह्यातील चाकूर या ठिकाणी एका सधन शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला होता. कोणतीही राजकीय कौटुंबिक पार्श्वभूमी नसतानाही त्यांनी स्वकर्तृत्वावर राजकारणात कमालीचे यश संपादन केले. कायद्याची पदवी संपादन केल्यानंतर त्यांनी काही काळ लातुरात विधिज्ञ म्हणून कामही केले. लातूर नगर परिषदेचे नगराध्यक्ष म्हणूनही त्यांनी १९६७ ते ६९ च्या दरम्यान काम पाहिले. दोनवेळा लातूरचे आमदार म्हणून तर तब्बल सात वेळा लातूर लोकसभेचे खासदार म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे.



एक उच्च विद्याविभूषित राजकारणी, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय प्रश्नांची चांगली जाण असणारे नेते अशीही त्यांची ओळख होती. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसशी असलेली त्यांची नाळ जीवनाच्या अखेरच्या श्वासापर्यंत कायम होती. काँग्रेसच्या पहिल्या फळीतील गांधी घराण्याशी एकनिष्ठ असणाऱ्या प्रमुख नेत्यांपैकी ते एक नेते होते. इंदिरा गांधी, राजीव गांधी, सोनिया गांधी त्यानंतर राहुल गांधी या सर्वांशी त्यांचे अतिशय निकटचे, विश्वासाचे संबंध होते. राजकारणात अनेक नेत्यांबद्दल उपहासात्मक, विरोधात्मक प्रतिक्रिया व्यक्त केल्या जात असल्याचे पाहावयास मिळते. मात्र, शिवराज पाटील चाकूरकर हे एकमेव नेते या बाबीला अपवाद असावेत की, त्यांच्याबद्दल कोणाकडूनही टीका-टिपण्णी केली गेली नाही. स्वपक्षीयच नव्हे तर विरोधकांच्याही मनात त्यांच्याबद्दल कायम आदराची भावना होती, ही बाब अत्यंत समाधानजनक आहे. म्हणूनच त्यांना अजातशत्रू व्यक्तिमत्वाचे धनी असेही संबोधले जाते. राजकीय, सामाजिक, अध्यात्मिक, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय असा कोणताही विषय नाही, ज्याविषयी त्यांनी आपले सखोल विचार प्रकट केलेले नाहीत. आपल्या संपूर्ण राजकीय जीवनात त्यांनी कोणत्याही नेत्याबद्दल अपशब्द उच्चारल्याचे किंवा जहाल टीका केल्याचे स्मरत नाही.

आपल्या राजकीय जीवनातील पहिल्या आणि अखेरच्या पराजयाचा सामना त्यांनी २००४ च्या लोकसभा निवडणुकी दरम्यान केला. त्या पराजयाबद्दलही त्यांनी कधी खंत व्यक्त केली नाही. त्या निवडणुकीच्या प्रचारादरम्यान त्यांनी एकदाही स्वतःला मतदान करण्याचे आवाहन मतदारांना केले नव्हते, हे विशेष. ते म्हणत असत, मतदान हा प्रत्येक मतदाराचा अधिकार आहे. तो अधिकार प्रत्येक मतदाराने आवर्जून बजावला पाहिजे, असेही ते म्हणत असत.

**- श्रीधर स्वामी**

लातूरच्या मतदारांनी त्यांचे नेतृत्व अगदी अंतःकरणापासून स्वीकारले होते, हे अनेक बाबींवरून स्पष्ट होते. स्वतः लिंगायत समाजातून आलेले असतानाही त्यांनी कधीही स्वतःला एका समाजापुरते मर्यादित ठेवण्याचे काम त्यांनी कधीही केले नाही. लिंगायत समाजातील मतदार हक्काने चाकूरकर आपले नेते असल्याचे कबूल करत असत. समाजातील अशी अनेक कुटुंबे होती आणि आजही आहेत, ज्यांनी कधीही शिवराज पाटील चाकूरकर यांच्याशिवाय अन्य कोणालाही आला नेता मानले नाही. एखाद्या नेत्यांबद्दलची मतदारांच्या मनात एवढी आपुलकीची, आस्थेवाईकपणाची भावना असणे ही गोष्ट आजच्या काळासाठी खूपच महत्वाची, प्रेरणादायी आहे, असेच म्हणावे लागेल.

लोकनेते विलासराव देशमुख यांनीही चाकूरकरांप्रमाणे आपल्या गावच्या प्रथम नागरिक पदापासून राजकारणात यश संपादन केले. देशाच्या-राज्याच्या राजकारणाचा उल्लेख निघाला की, तो शिवराज पाटील चाकूरकर आणि विलासराव देशमुख या दोन नेत्यांच्या नावांशिवाय पूर्ण होऊच शकत नाही. शिवराज पाटील चाकूरकर यांच्या दूरदृष्टीपणामुळेच विलासराव देशमुख यांच्यासारखा उमदा नेता राज्याला-देशाला पर्यायाने भरतीत राष्ट्रीय काँग्रेसला मिळाला होता, ही बाब कोणीही मान्य करेल. म्हणूनच त्यांना 'रत्नपारखी' अशीही उपमा दिली गेल्यास ते वावगे ठरणार नाही. त्यांच्या या प्रतिभेमुळेच विविध राजकीय पक्षातील ज्येष्ठ नेत्यांशी त्यांचे कायम विश्वासाचे, मित्रत्वाचे संबंध राहिले. विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदीच नव्हे तर दिवंगत पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्याशीही त्यांचे अत्यंत चांगले संबंध होते. म्हणूनच लातुरात भाजप उमेदवाराच्या प्रचार सभेला आलेले असतानाही अटलजींनी 'शिवराज पाटील चाकूरकरजी मेरे अच्छे मित्र हैं' असे वक्तव्य केल्याची बाब लातूरकर अद्यापही विसरलेले नाहीत.

शिवराज पाटील चाकूरकर यांच्या जाण्याने जणू एका विचारधारेचा अस्त झाल्याच्या भावना विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून व्यक्त होत आहेत. अशा या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाबद्दल जेवढे लिहावे, तेवढे कमीच आहे.. स्व. शिवराज पाटील चाकूरकर यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन !!

# डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामी, पंकजा मुंडे, आ. अमित देशमुख यांनी घेतले अंत्यदर्शन

## 'देवघर' निवासस्थानापासून सकाळी ९.३० वा. निघणार अंत्ययात्रा; लातूर जिल्ह्यावर शोककळा







**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १२ डिसेंबर :** ज्येष्ठ नेते शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निधनाबद्दल काशी पीठाचे जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी व राज्याच्या पर्यावरण आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी त्यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेऊन शोक प्रकट केला.

काशी पीठाचे जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांनी शिवैक्य शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त करताना ते राजकारणातील संत व्यक्ती होते, असे सांगितले. चाकूरकरांच्या आकस्मिक निधनाचे वृत्त समजताच डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजींनी देवघर निवासस्थानी भेट देऊन पार्थिवाचे अंत्यदर्शन घेतले. राजकारणात कार्यरत असतानाही त्यांनी सदैव सद्सद्विवेक बुद्धीला अनुसरून समाज हिताच्या दृष्टीने राजकारण केले. देशाच्या अनेक महत्वपूर्ण निर्णयामध्ये त्यांचे मौलिक योगदान राहिले आहे. जगद्गुरुंनी त्यांना राजकारणातील संत पुरुषाची उपमा देऊन ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती प्रदान करो, अशी प्रार्थना केली. यावेळी त्यांच्यासमवेत पंढरपूरच्या श्री विठ्ठल रुक्मिणी देवस्थानचे सहअध्यक्ष हभप गहिनीनाथ महाराज औसेकर यांचीही उपस्थिती होती. औसेकर महाराजांनीही यावेळी आपल्या भावना व्यक्त केल्या. राज्याच्या पर्यावरण आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनीही शुक्रवारी शिवराज पाटील चाकूरकर यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेऊन तीव्र दुःख व्यक्त केले. चाकूरकर यांच्या जाण्याने आपण एका ज्येष्ठ तत्वनिष्ठ नेत्याला कायमचे मुकलो असल्याची भावना व्यक्त केली. पंकजा मुंडे यांनी डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर व शैलेश पाटील चाकूरकर यांचे सांत्वन केले.

**पालकमंत्री भोसले यांची श्रद्धांजली**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, लोकसभेचे माजी अध्यक्ष, देशाचे माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निधनाने देशाच्या राजकारणातील एक सभ्य,सुसंस्कृत आणि अभ्यासू व्यक्तिमत्व आपण गमावले आहे, अशी शोकसंवेदना सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोंसले यांनी व्यक्त केली आहे. आपल्या शोक संदेशात शिवेंद्रसिंहराजे भोसले म्हणतात की, शिवराज पाटील चाकूरकर यांनी देशाच्या तसेच राज्याच्या राजकारणात, समाजकारणात लोकसेवेचा नवा आदर्श निर्माण केला होता. साधेपणामुळे आणि नैतिक मूल्यांच्या जपनुकीने त्यांनी आपली वेगळीच ओळख निर्माण केली होती. प्रचंड अभ्यास, मराठी, इंग्रजी, हिंदी भाषेवर असलेले प्रभुत्व तसेच प्रभावी मांडणी हे शिवराज पाटील चाकूरकर यांच्या राजकीय प्रवासाचे विशेष गुण राहीले त्याच्या निधनाने एक अभ्यासू, लोकनेत्याला आपण मुकलो आहोत अशा भावना पालकमंत्री मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी व्यक्त केल्या.

**राजकीय क्षेत्रात मोठी पोकळी : ना.पाटील**

माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निधनाने राजकीय क्षेत्रात पोठी पोकळी निर्माण झाली आहे अशा भावना राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी व्यक्त केल्या. सहकार मंत्री पाटील म्हणाले की, ज्येष्ठ काँग्रेस नेते, देशाचे माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांचे आज निधन झाल्याचे समजले. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांचे मला राजकीय आणि सामाजिक जीवनात कायमच मार्गदर्शन लाभले. राजकीय क्षेत्रातील यशस्वी वाटचालीत त्यांनी मोलाची साथ दिली. सुमारे सहा दशकांचा संसदीय आणि प्रशासकीय अनुभव, विविध मंत्रालयातील कामकाज आणि लोकसभा अध्यक्ष म्हणून त्यांनी दिलेले योगदान अतुलनीय आहे असे ना. बाबासाहेब पाटील म्हणाले.

**सुसंस्कृत, गांधीवादी ऋषीतुल्य नेतृत्व गमावले : आ. अमित देशमुख**

माजी केंद्रीय गृहमंत्री, लोकसभेचे माजी सभापती, काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दुःखद आणि मनाला वेदना देणारे आहे. त्यांच्या निधनामुळे आपण सुसंस्कृत, पारदर्शक, बुध्दीवंत, सृजनशिल, अभ्यासू गांधीवादी चारित्र्यसंपन्न, शिस्तप्रिय, ऋषीतुल्य नेतृत्व गमावले असल्याची प्रतिक्रिया माजी मंत्री आ. अमित देशमुख यांनी व्यक्त केली. शिवराज पाटील चाकूरकर यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेतल्यानंतर आ. देशमुख यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. केंद्रीय गृहमंत्री, लोकसभेचे सभापती त्याचबरोबर पंजाबचे राज्यपाल म्हणून चाकूरकर यांनी केलेले कार्य आणि महत्वाच्या क्षणी त्यांनी घेतलेल्या निर्णयामुळे संपूर्ण देशात आदरणीय व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ओळख निर्माण झालेली होती. त्यांचे विचार आणि कार्य राजकीय क्षेत्रात येणाऱ्या प्रत्येक पिढीसाठी ते मार्गदर्शक ठरणारे आहेत. शिवराज पाटील चाकूरकर, डॉ.शिवाजीराव पाटील निलंगेकर साहेब आणि विलासराव देशमुख यांच्यामुळे लातूरची देश पातळीवर ओळख निर्माण झाली. या तिन्ही नेत्यांच्या सुसंस्कृत राजकारणामुळे या जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळाली, असेही आ. अमित देशमुख यांनी सांगतले.

**निष्कलंकपणे कार्याचा आदर्श चाकूरकरांनी घालून दिला : आ. कराड**

लातूरचे भूमिपुत्र अभ्यासू, शांत, संयमी, सुसंस्कृत, इस्तबद्ध, अध्यात्मिक आणि तत्वनिष्ठ राजकारणातील निष्कलंक व्यक्तिमत्व देशाचे माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या दुःखद निधनाची बातमी वेदनादायी असून त्यांच्या निधनाने लातूरच्या राजकारणातील पित्रतुल्य व्यक्तिमत्व आपल्यातून निघून गेले आहे. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून निघणार नाही.

# ग्रंथालय मागण्या संदर्भात मुख्यमंत्री सकारात्मक : सदाशिव बेडगे

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १२ डिसेंबर :** महाराष्ट्र राज्य सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे अध्यक्ष सदाशिव बेडगे यांनी ११ डिसेंबरला मोर्चात सहभागी होण्यासाठी या ऐतिहासिक इतिहासचे साक्षीदार होण्यासाठी महाराष्ट्रातील ग्रंथालय कर्मचारी यांना दिलेल्या हाकेला ३००० पेक्षा जास्त संख्येने सहभागी झाले. यासाठी परिषदेचे गंगाधर पोतंगले, विद्यासागर हणमंते, संतोष करमले, सौ.उमा पुदाले, निलेश क्षिरसागर मनोहर गायकवाड,केशव वनंजे, बालाजी कांगणे आदीने खूप परिश्रम घेतले. ग्रंथालय प्रलंबित मागण्या सोडविण्यासाठी मुख्यमत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यासाठी यशवंत स्टेडियम येथून विधान भवन वर मोर्चा काढण्यात आल्याचे महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे अध्यक्ष सदाशिव बेडगे यांनी सांगितले.

या मोर्चात नाशिक येथील ग्रंथालय चळवळीतील उदध्व ठाकरे शिवसेना उपनेत्या शुभांगी पाटील यांनी मोर्चात येऊन पाठिंबा देऊन सहभागी झाल्या. यावेळी त्यांनी ग्रंथालय कर्मचारी यांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडे पाठपुरावा करणार असल्याचे सांगितले.

आमच्या मागण्या संदर्भात मागण्यांचे निवेदन कुणाला द्यायचे आहे हे प्रशासनातील अधिकारी यांनी विचारले असता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाच निवेदन देण्यात येईल असे सांगितले. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्याशी चर्चा केल्यानंतर आम्हाला निरोप आला. आपण ना.चंद्रकांत दादा पाटील यांना

**मोर्चास शिवसेना उपनेत्या शुभांगी पाटील यांचा पाठिंबा**

निवेदन देण्यास तयार आहात का? आम्ही हो म्हटल्यावर सदाशिव बेडगे, सिद्राम मुद्देबिहाळ, मनोहर गायकवाड, श्रीधर स्वामी, विनोद गायकवाड हे पाच जणांचे शिष्टमंडळ विधानभवन मध्ये निवेदन देण्यास गेले असता मंत्री चंद्रकांतदादा पाटील अतिशय चांगल्या मूडमध्ये होते.



यावेळी त्यांनी सांगितले की, आपले निवेदन शासनास अगोदर पोहोचल्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या मागण्या संदर्भात सकारात्मक आहेत. त्याबाबत आपल्या शिष्टमंडळासोबत लवकरच बैठक आयोजित करण्यात येईल. ४० टक्के अनुदान वाढ, दर्जा बदल लवकरच आदेश काढण्यात येतील, असे सांगितले असल्याचे सदाशिव बेडगे यांनी मोर्चातील उपस्थितांना सांगितले.

यावेळी सुनिलदत्त पाटील, धोंडिराम जेवूरकर, नरसिंह मिसालोलू, रामचंद्र वग्गे, गिरीश मठपती, सौ.वैशाली दुरुगकर, महाराष्ट्रातून बहुसंख्येने कर्मचारी महिला व बंधू उपस्थित होते.

आ. सुधीर मुनगंटीवार व आ. अभिजित वंजारी यांच्या नेतृत्वात मोर्चा काढण्यात येणार होता. पण विधानभवन मध्ये महत्वाच्या कामकाजामुळे येता आले नाही. त्यांनी मला अगोदरच पूर्व सूचना दिलेली होती. ११ डिसेंबर तारीख बदलण्याबाबत चर्चा केली होती, पण ११ डिसेंबरची मोर्चाची परवानगी घेतली होती आणि काही जणांनी रेल्वे रिझर्वेशन केल्यामुळे तारीख बदलली नाही. दोघांनी मला शब्द दिला आहे की, शासन स्तरावर सर्वतोपरी सहकार्य करून आपणांस आपल्या मागण्या संदर्भात न्याय मिळवून देण्यात येईल, असे सांगितले असल्याचे सदाशिव बेडगे यांनी म्हटले आहे.